साप्ताहिक

# माणूस

२ मार्च ८५/२ रुपये



## धाडसी सफर

## ७८ च्या 'पुलोद'नी काय दिलं?



साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : चोविसावे

अंक : चाळिसावा

□

२ मार्च १९८५

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अकान व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

□

: पत्ता

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

राजू देशपांडे

# तरुण रक्त....दिल्ली मुंबई

श्री. ग. मा.

दिल्लीत नवी राजीव राजवट येऊन दोन महिने झाले. या दोन महिन्यात या राजवटीने बरेच चांगले निर्णय घेतले, आपली सुरुवात तर दमदारपणे केली. पक्षांतरबंदी विधेयक हे या नव्या राजवटीचे पहिले यश. गेली वीस वर्षे या रोगावर नुसत्या चर्चा झडत होत्या या नव्या राजवटीने प्रथमच कृती केली. ही कृती, हे विधेयक व त्यानंतरची घटनादुरुस्ती अगदी निर्दोष आहे असे कुणी म्हणणार नाही, या घटनादुरुस्तीत काही त्रुटी असतीलही; पण प्रत्यक्ष अनुभव जसा येईल तशा त्रुटी सुधारून घेण्याचे आश्वासन नव्या पतप्रधानांनी दिले आहे. शिवाय घटनादुरुस्ती सर्वसंमतीने, विरोधकांचाही पाठिंबा मिळवून झालेली आहे. यामुळे पक्षाची, एखाद्या व्यक्तीची हुकुमशाही येईल असा या घटनादुरुस्तीवर आक्षेप घेण्यात आलेला आहे; पण भारतात पक्षपद्धती रूढ व्हायची तर पक्षनिष्ठा अशा काही कडक उपयांनी रुजवणे आवश्यक होते आपल्याकडे अतिरेक कशाचाही होऊ शकतो; पण तो होईलच असे गृहीत धरून चालणे म्हणजे चर्चेचा घोळ वाढवणे. असा घोळ घालत राहण्यापेक्षा थोडा धोका पत्करून कृती करण्यानेच प्रगती साधता येते पक्ष बदलला तर पक्षाच्या नावावर मिळवलेले खासदार-आमदारपद सोडावे, हा साधा राजकीय प्रामाणिकपणाही आपल्याकडे नव्हता. ज्याना सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य हवे आहे त्यानी या स्वातंत्र्यासाठी काही किमतही अवश्य मोजली पाहिजे. नाही तर व्यक्तिगत स्वार्थ आणि नैतिकता यांच्यात काही फरकच करता येणार नाही. गेल्या वीस-पंचवीस वर्षात आपल्याकडे घडलेली बहुसंख्य पक्षांतरे स्वार्थप्रेरित होती, नैतिकतेचा मुलामा त्यांना उगाचच चढवण्यात येत होता. कर्नाटकातील हेगडे सरकार पाडण्यासाठी जी पक्षांतरे कॉंग्रेस (आय) कडून घडविण्यात आली ती अनैतिकच म्हटली पाहिजेत. काश्मिरमध्ये, आंध्रमध्ये जे पक्षांतराचे नाटक झाले, आमदारांची जी उघडउघड खरेदी विक्री झाली ती लोकशाहीची अगदी बेअब्रू होती. अमलात येणाऱ्या पक्षांतर बंदी घटनादुरुस्तीमुळे असल्या प्रकाराना आळा बसणार आहे. म्हणून उपाय–योजना जरी थोडी कडक व कठोर वाटली तरी ती स्वागतार्ह आहे. आपल्याकडे पक्षपद्धती स्थिरावण्यासाठी या घटनादुरुस्तीचा चांगला उपयोग होऊ शकेल.

या दोन महिन्यात एक हेरगिरी प्रकरणही उघडकीस आणले गेले. या प्रकरणातला फारच थोडा तपशील बाहेर आलेला आहे. पण जो काही आला आहे, त्यावरून हे एक व्यापारी हेरगिरी प्रकरण असावे असे दिसते. महत्त्वाची लष्करी गुपिते फुटलेली नसावीत. हा लोकशाही देश आहे. आपला भोंगळपणा, आपली वैयक्तिक स्वार्थसाधन-

वृत्ती इतिहासकुप्रसिद्धच आहे. तेव्हा व्यापारी असो, लष्करी असो, हेरगिरी ही मोडून काढलीच पाहिजे, गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हायला हव्यात, यात दुमत असण्याचे कारण नाही. पण उगाच सापसाप म्हणून भुई बडवण्याची, संशयाची पिशाच्चे उभी करण्याचीही गरज नाही. जगभर हेरगिऱ्या चालू असतात, आपणही इतर देशातून हे करतच असतो, करत नसू तर तो आपला बावळटपणाच ठरेल. आपल्याही देशात परकीयांची हेरगिरी चालू असणार हे गृहीत धरायला हवे. शिवाय नव्या अंतराळ विज्ञानामुळे, शास्त्रीय प्रगतीमुळे आपल्या देशाची खडा न् खडा माहिती अमेरिका-रशियाला, हवी तेव्हा मिळतेच आहे. गुजराथेतील मोरवीजवळचे मच्छु हे मातीचे धरण फुटले तेव्हा ही घटना अमेरिकेत टी. व्ही. वर प्रथम लोकांनी पाहिली आणि नंतर ती आपल्या दिल्लीला समजली. महत्त्वाच्या शस्त्रास्त्रांची, उपकरणांची खरेदी आपण परदेशांकडून करीत असतो. तेव्हा आपल्याजवळ काय आहे, काय नाही याबाबत हे देश अज्ञानी कसे असतील? म्हणून असे वाटते की, हे हेरगिरी प्रकरण बाहेर आले हे चांगले झाले, अधूनमधून अशी साफसफाई होत राहणे आवश्यकही असते. पण डोंगर पोखरून उदिर तरी हाती लागतो की नाही कुणास ठाऊक ? आताच हे प्रकरण विज्ञत चालले आहे. राजीव गांधींना नोकरशाहीवर वचक बसवण्या साठी जो काही या प्रकरणाचा उपयोग झाला किंवा यापुढे होईल तो भाग मात्र वेगळा ! इंदिरा गाधींचे एक धक्कातंत्र होते. राजीव गांधींचे धडकी तंत्र असावे, असे दिसते. वरिष्ठ बँक अधिकाऱ्यांची हकालपट्टी हा या तंत्राचा आणखी एक आविष्कार.

पंजाब, आसाम हे प्रश्न इतक्या अल्पकाळात सुटतील अशी कोणीच अपेक्षा बाळगली नव्हती. पण या बाबत हालचाली तरी सुरू आहेत व आसाम प्रश्नात काही तडतोड दृष्टिपथात आलेलीही असावी. मिझोंचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे-मिझो नेत्यांशी चालू असलेल्या वाटाघाटी शेवटच्या टप्प्यापर्यंत आलेल्या आहेत. श्रीलंकेतील तामिळींचा प्रश्न मात्र अधिकच उग्र बनलेला आहे व भारताला यापुढे किती काळ तटस्थ राहता येईल हे सांगवत नाही. कारण अमेरिका, इस्त्राईल, पाकिस्तान यांनी श्रीलंकेत चंचुप्रवेश केलेला आहे. एवढा लहानसा देश भारताची आगळिक काढतो, आपल्या मच्छिमारांना पकडण्याएवढी धिटाई दाखवतो, याचा दुसरा-तिसरा काही अर्थ नाही. तो कुणाकडून तरी चिथावला जातो आहे. मिझोंना परकीय मदत होती; पण त्यांचे तळ देशातच होते. तसे येथे नाही. परराष्ट्रनीतीचा हा प्रश्न होऊन बसला आहे. राजीव गांधींचे धडकीतंत्र येथे उपयोगी ठरणार नाही. मुत्सद्देगिरीची, आपल्या अलिप्ततावादी धोरणांची कसोटी पाहणारा हा प्रश्न आहे, एवढेच तूर्त म्हणता येईल.

दोन महिन्यातील राजीव गांधी सरकारची ही कामगिरी तशी भरीव आहे. ताज्या, तरुण दमाची साक्ष पटवणारी आहे. विधानसभा निवडणूक तिकिट वाटपातही तरुण रक्ताला भरपूर वाव देण्यात आलेला आहे, भ्रष्टाचारी व्यक्तींना किंवा ज्यांची जनमानसातील प्रतिमा डागाळलेली आहे त्यांना वगळण्यात आलेले आहे.

हे सगळे ठिकच आहे. पण हत्तीला जसा अंकुश लागतो तसा काँग्रेसरूपी या महाकाय ऐरावतालाही तो यापुढे लागणार आहे. सर्व देशावर, दिल्लीत तसे गल्लीतही एकाच पक्षाचे शासन असणे, इतके केंद्रीकरण होणे लोकशाही व्यवस्थेच्या, अनुशासनाच्या दृष्टीने घातक आहे. काही राज्यात विरोधी पक्षांची सरकारे आली तर लोकशाही मजबूत राहील व जनतेलाही तुलना करण्यासाठी काही पर्याय उपलब्ध असतील. काँग्रेस (आय) सरकारची कामगिरी चांगली की वाईट हे शेवटी ठरवणार कसे ? महाराष्ट्रात पुलोदचे म्हणा, आंध्रप्रदेशात रामारावाचे सरकार कसे काम करते यावरूनच काँग्रेस (आय) ची कामगिरी चांगली की निराशाजनक हे ठरणार. म्हणून विरोधी पक्षांच्या राजवटी किंवा निदान बलवान विरोधी पक्ष काही राज्यात अस्तित्वात असले तर आपल्या लोकशाहीच्या दृढीकरणाला त्यांचा चागलाच उपयोग होईल. पर्यायी व्यवस्था नेहमी तयार असणे ही व्यवस्थापन कौशल्याची एक खूण आहे. कारखान्यात, कचेऱ्यातून आपण Stand by ठेवतो, हेच तत्त्व व्यापक सामाजिक-राजकीय क्षेत्रात अनुसरले जायला हवे. एक टोपलीत सगळी अंडी कधीही ठेवत नाहीत. सुव्यवस्था एकखांबी नसते. केंद्र बळकट हवे हे खरे, यासाठी राज्येही बळकट हवीत हेही तितकेच खरे. पण बळकट राज्ये विरोधी पक्ष किंवा विरोधी आघाड्या देऊ शकत असतील तर मतदारांनी त्यांनाही संधी द्यायला हवी. कर्नाटकात रामकृष्ण हेगडे यांचे शासन आले किंवा आंध्रात एन. टी. रामाराव यांचे कडे सत्ता गेली म्हणून दिल्ली कोणत्या अर्थाने कमजोर झाली ? उलट केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण या दोन प्रवृत्तींचा योग्य मेळ अशा सत्ताविभा-

जनामुळे घातला जातो व जनतेचे काहीच नुकसान होत नाही. नुकसान होणार कसे ? कॉंग्रेसचा काय, किंवा महाराष्ट्रात पुलोदचा काय, जाहीर-नामा मतदारांना भरपूर व भरघोस आश्वासने देतो आहे. दोन्ही जाहीर-नाम्यांचा तोंडावळाही सारखाच आहे. कोणीही सत्तेवर आले तरी शेत-कऱ्यांना रास्त भाव मिळणार आहेत ! मुलींना मॅट्रिकपर्यंत मोफत शिक्षण ! स्वच्छ कारभार देण्याची तर नुसती अहमहमिका लागली आहे. प्रत्येकाला काम तर मिळणारच आहे; पण काळा पैसा, काळा बाजारही नाहीसा होणार आहे ! लोकसभेच्या निवडणुकाच्यावेळी विरोधी पक्ष महागाईबद्दल ओरडा करीत होते. यावेळी हा विषय कोणीच काढत नाही, त्यावरून महागाई कमी झालेली असावी ! कोणी महाराष्ट्राचा स्वाभिमान राखणार तर कोणी देश एकविसाव्या शतकात नेणार ! कोणीही सत्तेवर आला तरी अशी सगळी खाण्यापिण्याची, सुखसोयीची चंगळच आहे ! लोकांनी प्रामाणिक कष्ट केले पाहिजेत हे कोणीच सांगत नाही. त्यामुळे काही ठिकाणी 'अ' कडे तर काही ठिकाणी 'ब' कडे सत्ता गेली तरी फारसा फरक पडत नाही. एक से दो केव्हाही भला. महाराष्ट्रात पुलोदची पूर्वीची कारकीर्द चांगली झाली. कर्नाटकात, आंध्रात विरोधी पक्षांनी पूर्वीच्या कॉंग्रेस सरकारांपेक्षा चागला कारभार केला. तेव्हा विकासाच्या दृष्टीने, कारभाराच्या दृष्टीने, निदान महाराष्ट्रापुरते तरी नक्की असे म्हणता येईल की, पुलोदचे सरकार वसंतराव दादांच्या किंवा कॉंग्रेस आयच्या सर-कारपेक्षा निश्चितच उजवे ठरेल. जो दमदारपणा, जो तडफदारपणा तरुण असल्यामुळे राजीव गांधी अखिल भारतीय स्तरावर दाखवू शकतात तोच महाराष्ट्रात तरुण शरद पवार किंवा त्यांचे सहकारीही दाखवू शक-तील. त्यांना संधी देणे न देणे शेवटी मतदारांच्या हाती आहे; पण लोक-सभेप्रमाणेच आताही निश्चित असे म्हणता येईल की, विरोधकांनी एकत्र येऊन या एकाधिकारशाहीच्या प्रचंड गजालीश्रेष्ठाशी मुकाबला तर चागला केला. लोकसभेच्या निवडणुकीत दारूण पराभव झाल्यानंतर विरोधकांना अनेकांनी अनेक तऱ्हेचे डोस पाजले, दूषणे दिली. 'एकच प्याला'तल्या आजारी तळीरामासारखी विरोध-कांची स्थिती झाली. तापाने शरीर फणफणले आहे असे एक म्हणतो तर थंडीने ते गोठत आले आहे हे दुसऱ्याचे निदान ! विरोधी पक्षांनी तरी कोणा-कोणाचे, कायकाय ऐकायचे ? त्यातल्या त्यात जे शक्य होते, चटकन जमण्या-सारखे होते ते त्यांनी केले, निदान महाराष्ट्रात तरी मतदारांसमोर एक समर्थ पर्याय उभा केला. या पुलोद पर्यायाची तुलना संयुक्त महाराष्ट्र समितीशी केली जात आहे; पण ती तितकीशी बरोबर नाही. कारण त्या वेळी सगळेच समितीच्या छत्राखाली एकत्र आले होते. या वेळी शिवसेना, दत्ता सामंत हे प्रमुख विरोधी गट पुलोदमध्ये नाहीत. शिवाय त्या वेळी अन्यायाची चीड सार्वत्रिक होती. सी. डी. देशमुख यांच्यासारख्यांनी आपल्या केंद्रीय मंत्रीपदाचा राजिनामा दिलेला होता. तशी काही भावनिक लाट या वेळी नाही. असली तर ती राजीव गाधींच्या बाजूची असणार. त्यामुळे महाराष्ट्राचे चित्र आज, निवड-णुकीच्या या आदल्या दिवशी अस्पष्टच आहे. चुरस चागली आहे. वसतराव दादांना ही निवडणूक चांगलीच जड जातेय, विरोधक चागलेच 'सावरले' आहेत एवढे नक्की. किती प्रमाणात सावरले आहेत, केवळ उभे राहतात की झेप घेऊ शकतात, हे चार दिव-सात कळेलच.

☐


## साप्ताहिक माणूस

**मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन**
**( अधिनियम ४ व नियम ८ अन्वये )**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | पुणे |
| २. | प्रकाशन काळ | : | साप्ताहिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : | श्री. ग. माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० |
| ४. | नागरिकत्व | : | भारतीय |
| ५. | प्रकाशन सस्थेचे नाव व तिच्या मालकांचे नाव व पत्ता | : | राजहस प्रकाशन<br>श्री. ग. माजगावकर<br>दिलीप माजगावकर<br>१०२५ सदाशिव पेठ, पुणे |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.
दिनाक : १ मार्च १९८५

प्रकाशकाची सही
श्री. ग. माजगावकर

# 'पुलोद' कारकिर्दीचा ताळेबंद

ॲड. रमन् देशपांडे

विधानसभा निवडणुका जाहीर होताच महाराष्ट्रात शरद पवारानी २८८ पैकी २८५ जागा वाटपाचा यशस्वी समझोता जाहीर करून जणू काही 'चमत्कारच' घडवला! 'व्हाइट ऑफ कॉन्फिडन्स' या विनोदी सदरात आतापर्यंत विरोधकांची एकजूट ही कल्पना फिट्ट बसली असताना आणि इंदिरा कांग्रेसचे रहस्यमय, सनसनाटी तिकिट नाटय रंगात आले असताना पुलोदचा पुनर्जन्म ही एक लक्षणीय बाब ठरली. भुरळ घालणारा, धडाकेबाज असा १५ कलमी कार्यक्रम जाहीर झाला. भाजपच्या प्रमोद महाजनानी १६ व्या कलमाची पुस्ती जोडली की पुढील पाचही वर्षे एकच मुख्यमंत्री व तेही फक्त शरद पवार!

'पुलोद' च्या नव्या सरकारची 'हवा' असताना, त्या २२ महिन्यात पुलोदने काय काय केले, कसे केले, खरंच केले का आणि वाईट का योग्य याचा पंचनामा करणे फार महत्त्वाचे आहे. अर्थात त्या काळातील 'पुलोद' ची पार्श्वभूमी आजच्या पुलोदपेक्षा खूपच वेगळी होती. १८ जुलै ७८ ला 'पुलोद' सत्तारूढ झाली, तेव्हा जनता पक्षातील उखाळ्या-पाखाळ्यांना ऊत आला होता. दुहेरी निष्ठेच्या प्रश्नावर रान उठवले जात होते. पराभूत कांग्रेसची दुफळी झाली होती; परंतु महाराष्ट्रात मात्र दोन्ही कांग्रेसचे संयुक्त सरकार दादाचे नेतृत्व व तिरपुड्यांच्या दादागिरीखाली चालू होते. दोन्ही कांग्रेस एकत्रीकरणाच्या घाईगर्दीच्या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी 'राहुरी' च्या सभेत जाहीर केले की, वेळ आल्यास शेती करीन; पण कांग्रेस (आय) मध्ये जाणार नाही!

**पुलोदचा ४० कलमी कार्यक्रम :** ४० कलमी कार्यक्रम पायाभूत धरून पुलोदचा कारभार सुरू झाला. २६ जुलै ७८ रोजी कापूस एकाधिकार खरेदीची घोषणा एन. डी. पाटलांनी केली. कापूस एकाधिकार खरेदी ही विदर्भातील शेतकऱ्याच्या दृष्टीने एक महत्त्वाची योजना ठरली. त्यानंतर विहिरीवरील विजेचा दर कमी केला. लहान शेतकऱ्यावरील सोसायट्यांची थकबाकी रद्द केली. नाला-बंडिंग व इतर कारणासाठी अल्पदराने कर्ज सवलतीची योजना सुरू केली. सुमारे ११७ कोटी रु. ची कर्जे व १६ लक्ष शेतकऱ्यांना फायदा हा पुलोदचा अधिकृत दावा! याशिवाय आदिवासी भागात गवत व भात एकाधिकार खरेदी राबवण्यास सुरुवात केली.

आदिवासी बहुसख्य विभागात जगल–जमीन अतिक्रमणाचा प्रश्न तीव्र होता. ३१ मार्च ११७८ पर्यंतची अतिक्रमणे रीतसर करण्याची घोषणाही याच कालखडात झाली. मात्र ही घोषणा करण्यापूर्वी समाजवाद्यांचा घोळ, मार्क्सवाद्यांचा आग्रह, जनसघाची अलिप्तता यांचीही प्रकर्षाने जाण जनतेला झाली. कोयना धरणग्रस्त पुनर्वसनासाठी १ कोटी रु. मंजूर करण्यात आले. महाराष्ट्रात बद पडलेल्या सुमारे १५० उपसा जलसिंचन योजना परत चालू करण्यात आल्या व त्यासाठी ३० कोटी रु. चे स्टेट बँकेचे कर्ज सरकारने भरले. शेतमजुराचे किमान वेतनात वाढ केली. ठळक बाब म्हणजे रोजगार हमी योजनेअंतर्गत अत्यंत स्वस्त दरात गहू शेतमजुरांना देण्यात आला.

या सर्वात 'ग्यानबाची मेख' एवढीच होती की, रोजगार हमीचा दर किमान वेतनाशी जोडला खरा; पण किमान वेतन समितीने सुचविल्याप्रमाणे ३ 'झोन' न पाडता ४ झोन पाडले व किमान वेतनातील सर्वात कमी वेतनाच्या चौथ्या झोनशी याची सांगड घातली. याशिवाय नवीन मार्केटयार्ड उभारणी, उदा. पुणे. अशा बऱ्यापैकी अनेक स्थानिक योजनाही राबविल्या. अनेक योजना घोषित केल्या, धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे घेताना त्यातील घटकपक्षाची ओढ व झोड जाणवत नव्हती असे नाही. सर्वांना रोजगार मिळाला, रो. हू. योजनेत भ्रष्टाचार कमी झाला किंवा एकाधिकार योजनेमुळे शेतकऱ्याना तातडीने पैसा मिळाला असे नाही. थोडाफार तात्पुरता फरक पडला एवढे मात्र निश्चित!

**उद्योग आघाडीवर :** 'बॉबे हाय' च्या कामाला गती दिल्याचा दावा पुलोदचा आहे उरण केमिकल कॉम्प्लेक्स आणि आसपासच्या ३५० सबंधित युनिट्सच्या स्थापनेचे श्रेयही पुलोद स्वत कडे घेते. अनेक उद्योगधंद्यात किमान–वेतनाची निर्मिती किंवा पुनर्मुल्याकनाची प्रथा पुलोदने पाडली हे मात्र सर्वांनी मान्य केले. त्या वेतनाच्या दराबद्दल मात्र पुन्हा मतभेद आहेतच! लघुउद्योजकाना कर्ज, साखरेवरील नियत्रण दूर करण्यासाठी केंद्राशी चर्चा, भूमिगत पाईप लाईन हा विदर्भातील प्रकल्प इ. योजनाबद्दलही हालचाली व वादळे पुलोद कालखंडात उठली. पुणे–मुबई नॅशनल हायवेचा प्रश्नही 'पुलोद' ने लावून धरला. मुबईतील गिरणी कामगारांना अत्यल्प असा ४५ रु. चा वाढावा पवार–फर्नांडिसांनी मध्यस्थीने मंजूर करून दिला.

मात्र पुण्यातील 'बजाज ऑटो' चा प्रश्न व त्यानंतरचा गोळीबार हे 'पुलोद' वरील एक गालबोटच ठरले. उद्योगक्षेत्रात याशिवाय फारशी भरीव कामगिरी मात्र पुलोदच्या नावे जमा होऊ शकणार नाही. ओव्हरसीज एम्प्लॉयमेंट एक्सचेंजसारख्या बाबीचे महत्त्व तसे मर्यादित आहे व त्याचा फायदाही मुठ-

भरांनाच मिळाला; पण ते सुरू केले हे खरे !

**कुंपणाला वंगण ? :** 'पुलोद' खऱ्या अर्थाने गाजले ते 'पोलिसी' पॉलिसीतील निर्णयामुळे. हाफ–पँटची फुल–पँट यासारख्या वरवरच्या बदलापासून ते वीकली ऑफला मंजुरी व पोलिसांना संघटनेचे स्वातंत्र्य 'पुलोद' ने दिले. राज्य–कर्मचाऱ्यांना पगार-वाढ देऊन, केंद्रीय दराने महागाईभत्ता मंजूर केला. पोलीस व सेवानिवृत्तांसाठी घरबांधणी योजना जाहीर करून ६ कोटी रु ची रक्कम घोषित केली. सेवानिवृत्तांचे निवृत्तीवेतन व महागाईभत्याचा स्वागतार्ह निर्णयही पुलोदने घेतला. प्राथमिक शिक्षकांना निवृत्तीवेतन सुरू केले. शिक्षण, राज्य कर्मचारी, कृषी–विद्यापीठ, एस. टी. महामंडळ यातील हजारो हंगामी कामगारांना कायम केले. शरद पवारांनी मुख्यमंत्र्यांचा स्वतःचा सिमेंट–वाटपाचा कोटा रद्द केला. एक शिक्षकी शाळांऐवजी द्विशिक्षकीशाळा सुरू केल्या. महाविद्यालयातील फी–वाढ रद्द केली. जमीन–धारणा कायद्याखाली जमिनी ताब्यात घेण्याची अंमलबजावणी सुरू केली. थोडक्यात किरकोळ निर्णयासाठी, दिल्लीच्या संमतीसाठी अडून न राहता, किरकोळ कुरबुरी वगळता सामुदायिक जबाबदारीचे मर्यादित चित्र पुलोदने उभे केले.

पण हे सगळे घडूनही २ जुलै ८० रोजी बॅ. अंतुले मुख्यमंत्री झाले. पुलोद आघाडीस लोकमान्यता मिळाली नाही. ८० च्या इंदिरा लाटेचा तो परिणाम असावा. ८४ लोकसभा अभूतपूर्व सहानुभूती किंवा राजीव लाटेची प्रतीक ठरली आहे. याखेपेस सत्तारुढ काँग्रेस-मध्ये दुफळ्या, बंडखोरीचे चित्र आहे. याउलट पुलोद संघटित आहे. भरभक्कम १५ कलमी कार्यक्रम आहे. अगदी 'मंडल–आयोग' राबविण्याचे आश्वासन आहे. 'नामांतर' प्रकरणी घोळ घालून, झीज सोसूनही परत पुरोगामी भूमिका घेण्याची जाहीर खुमखुमी पुलोदने दाखवली आहे. सरकार कोणते आणायचे हा मतदारांचा हक्क आहे. केंद्राशी सुसंगत का महाराष्ट्राच्या गरजांशी ! महाराष्ट्राच्या गरजा केंद्राशी सुसंगत नाहीत का ? पुलोदने आव्हान उचलले आहे. त्यांना ते पेलेल काय यासाठी हा मागोवा. □

---

डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे. म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

## व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार विवेचनासह प्रकाशित झालेली पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ३०.

# मुंबापुरी

## □ निवडणुकीचा 'काला'

राजकीय पक्षानी मुबईची एकदम काशी करून टाकलीये. विनवण्या–आर्जव अगदी जोरात सुरू आहेत, पण गेल्या खेपेस म्हटलं त्याप्रमाणे मतदार ढिम्मच आहेत. जरा हूं की चू करतील तर शप्पत !

हा मजकूर एवढा लिहून होईस्तवर अटल बिहारी वाजपेयी मुबईचा झंझावाती दौरा करून जातील. त्याच्या पाठोपाठ चद्रशेखर आठ–दहा सभातून बोलणार आहेत. उन्नी-कृष्णन, अंबिका सोनी (हो, हो 'त्याच' त्या अंबिकाबाई) आणि मधू दडवतेही डझनभर मीटिंग्जमधून बोलणार आहेत. नानासाहेब गोरेंचेही कार्यक्रम ठरताहेत. थोडक्यात काय की, मुबईत पुढच्या आठवड्याभरात वक्तेच वक्ते आहेत. सवाल आहे तो फक्त श्रोत्याचा. आणि यारो, हाच तरा खरा मिलियन डॉलर सवाल आहे.

गुरुवारी मुबईच्या पुलोद नेत्यानी पत्रकार परिषद घेऊन पुलोद आणि मित्रपक्ष भाजप मुबईत चौतीसपैकी पचवीस तरी जागा मिळवील असा विश्वास व्यक्त केला. व्यक्त करायला याच काय जातय हो. लिहिताना आमचे हात थरथरतात. मागच्या खेपेला आम्हा पत्रकाराच्या वाट्याला इतक भलंमोठ अपेक्षाभगाच दुख आलं की निदान आता तरी भलताच विश्वास कोणी व्यक्त–बिक्त केला की आमच्या पोटात अक्षरश: गोळा येतो हो.

पुलोदच्या दृष्टीने मुबईच्या चौतीस जागा महत्त्वाच्या आहेत. गेल्या सात–आठ वर्षापास्नं मुबई ऑपोजिशनच्या कह्यात होती परवाच्या लोकसभा निवडणुकीने ही परिस्थिती बदलून टाकलीये लोकसभेच्या सहापैकी पाच जागा आयवाल्यानी काबीज केल्यामुळे विरोधी पक्षाच्या दृष्टीने ही विधानसभा निवडणूक महत्त्वाची आहे या निवडणुकीत जर पुलोद आघाडीने मुबईवर आपली पकड नीट मजबूत केली तर पुढच्या मुबई महानगरपालिकेच्या निवडणुकीवर त्याचा चागला परिणाम होईल आणि महानगरपालिका हातात असण म्हणजे सगळा मलईगोळाच मुठीत असण्यासारख. म्हणून हा सगळा दहिकाला जोरात सुरू आहे. आता कळल का ?

## □ दुखवणारा प्रश्न

सुरेश जैन प्रकरण सध्या आमच्या पत्रकार–वर्तुळात जाम तापलंय. कॉंग्रेस (आय) ने तिकिट नाकारल्यामुळे कॉंग्रेस (एस) च्या तिकिटावर जैन जळगावची सीट लढवतायेत. गमत म्हणजे याचा सात्विक सताप वगैरे खर तर भाऊराव पाटील, बाबूराव बेलोसे, वगैरे अतुले–अनुयायीना यायला हवा. कारण जैन हे अतुले गटाचे, पण सतापलेत आमचे बुजुर्ग पत्रकार–मित्र.

सुरेश जैन प्रकरणी आमच्या काही पत्रकार मित्रानी घेतलेली 'लाईन' ही तद्दन बालिश आणि ढोंगी वाटते. कशी ते सागतो. ज्या सुरेश जैनवर भ्रष्ट अतुल्याचे सहयोगी म्हणून विरोधी पक्षानी वेळोवेळी टीका केली, त्याच जैनना कॉंग्रेस (एस) तिकिट देते. मग पुलोद आघाडी स्वच्छ प्रशासन कस देणार, असा सूर बाय अँड लार्ज पत्रकार मडळी लावतात. आता ही लाईन किती फटर आहे पहा एरुतर पत्रकारानी हे मनात आधीच नक्की करून टाकलंय की पुलोद आघाडी स्वच्छ प्रशासन देणार. अन यात एकच 'हिच' आहे ती म्हणजे सुरेश जैन. म्हणजे उद्या जर जैन कॉंग्रेस (एस) मधून बाहेर पडले तर पुलोद एकदम स्वच्छ होईल का ? कॉंग्रेस (आय) पक्षात अतुले तेवढे एकटे भ्रष्ट नव्हते त्याच न्यायाने, पुलोदमध्ये केवळ सुरेश जैन असण्याने–नसण्याने पुलोद शासन स्वच्छ–अस्वच्छ ठरणार आहे ... पुलोद शासनातल्या (जर पुलोदच शासन आल तर, एनीवे याबाबतीत आम्हाला अजून शका आहे) सगळ्या भ्रष्ट आणि अस्वच्छ गोष्टीच खापर एकट्या सुरेश जैनवर फोडल की, पत्रकाराचं काम सोप. उद्या, यदाकदाचित पवार मुख्यमत्री झाले आणि त्याच्या कारकिर्दीत जर सोमेंट आणि एफ एस आयच्या भ्रष्टाचाराच्या केसेस बाहेर आल्या तर पत्रकार लगेच सागून मोकळे होतील की, 'नाही तरी आम्ही निवडणुकोपूर्वी सागितलं होतंच की या सुरेश जैनना घेतलय तेव्हा पुलोद सरकार स्वच्छ कारभार कसा देणार ?'

कॉंग्रेस (आय) जशी भ्रष्ट आहे तशीच पुलोद आघाडी ही देखील भ्रष्ट आहे हे जर पत्रकाराना दाखवून द्यायच असेल तर त्यात काही खास नवीन नाही. पब्लिकला हे ठाऊक आहे. कॉंग्रेस (आय) ला लोकसभेत चारशेच्यावर जागा मिळाल्या ते काही तो पक्ष स्वच्छ आहे म्हणून नव्हे. उद्या शरद पवार जर सत्तारूढ झाले तर ते स्वच्छ कारभार देतील म्हणून नव्हे. तसा विश्वास त्यानी कितीही दिला तरी पब्लिकला तो मान्य नाही. पत्रकाराना इतकंही साध कळू नये ?

कॉंग्रेस (आय) जशी भ्रष्ट तशीच पुलोद आघाडीही भ्रष्ट अन् तसेच एकूण सगळे. राजकीय पक्ष भ्रष्ट आहेत हे इतक दाखवून दिलं की, पत्रकाराच काम सपलं का ? पत्रकाराना इतकच 'लिमिटेड' समाधान हवं आहे का ? आणि जर सगळेच राजकीय पक्ष एकजात भ्रष्ट असतील तर मग सुरेश जैन प्रकरणी पत्रकार तद्दन पक्षीय भूमिका घेऊन 'लोडेड' प्रश्न का विचारतात ?

आबासासाहेब कुलकर्णी परवा बी. यू. जे. च्या पत्रकार परिषदेत म्हणाले की, गेली अनेक वर्षे महाराष्ट्राची औद्योगिक पीछेहाट होतेय. लगेच एक बाणेदार प्रश्न आला : तेव्हा तुम्ही कॉंग्रेसमध्ये होतात; पण तुम्ही तेव्हा तोड उघडल नाही.' ठीक आहे. चांगलाच झोबणारा प्रश्न आहे; पण तेव्हा आबासाहेबानी तोड उघडाव आणि महाराष्ट्राची अस्मिता जपावी म्हणून पत्रकारानी काय केल ? आबासाहेब जसे कॉंग्रेसश्रेष्ठीसमोर मूग गिळून गप्प बसले तसेच पत्रकारही गप्पच राहिले ना ? आबासाहेबांवर आता तुफानी हल्ला करण खूपच बालिश वाटतं.

असो. यासंबंधी अधिक चर्चा व्हावी म्हणून हे सगळ लिहिल. यात कोणी दुखावल गेल असल्यास ह्या पामराचा इलाज नाही. उर्दूत एक खासा शेर आहे :

'' दोपहरकी धूप है और कुछ नही
सबका पिघलता रूप है और कुछ नही'

या दुपारच्या टळटळीत उन्हात काहीचे मुखवटे (त्यात आम्हीही आलो) गळून पडल्यास आम्हाला आनंद होईल.

—विष्णू जयदेव

# पुण्यातील तीन मतदार संघ

मागील अंकात पुण्यातील डॉ. अरविंद लेले, श्री. अण्णा जोशी व श्री. विश्वास गागुर्डे या पुलोद–भाजपच्या तीन उमेदवारांच्या तीन मतदारसंघातील निवडणूकस्थितीवद्दलचे वार्तापत्र दिले होते. पुण्याच्या उरलेल्या तीन मतदार-सघातील स्थितीचे हे चित्रण.

## भवानी : भाई वैद्य सर्व थरातून पाठिंबा

मागील अंकात पुण्यातील पुलोद-भाजपच्या तीन उमेदवारांच्या तीन मतदार सघातील स्थिती पाहिली. उरलेल्या तीन भागातील स्थिती कशी आहे ?

भवानी पेठ मतदार सघातील निवडणूक ही जनतापक्ष आणि कॉंग्रेस आय याच्या दृष्टीने अत्यत महत्त्वाची असून दोन्ही पक्ष आपले सर्वबळ या ठिकाणी एकवटून आहेत. पुण्यातील सर्वात जास्त बहुभाषिक असलेला हा मतदार सघ आहे जनता–पुलोदचे भाई वैद्य विरुद्ध कॉंग्रेस आयचे शहर अध्यक्ष प्रकाश ढेरे हे प्रतिस्पर्धी आहेत. शिवसेनेच्या काका वडके याच्या उमेदवारीने तिरंगी ठरलेली निवडणूक खरी वैद्य विरुद्ध ढेरे अशीच रंगणार आहे.

परपरेने या मतदार सघातील बहुसख्य मुस्लिम मतदार कॉंग्रेस आयच्या मागे असल्याचे दिसते. गेल्या तीन–चार निवडणुकात हे प्रकर्षाने जाणवले. तरी ७७ आणि ७८ ला या मतदार सघात विरोधी पक्षानी कॉंग्रेसवर आघाडी मिळवली होती याही खेपेला त्याची पुनरावृत्ती होणार अशी चिन्हे दिसत आहेत. एकतर मुस्लिम समाजातील लोकप्रिय आमदार (आता माजी) अमिनुद्दिन पेनवाले यांना कॉंग्रेस आयचे तिकिट नाकारल्यामुळे मुस्लिम समाजात नाराजी पसरली आहे. आजवर कधी नव्हते इतका हा समाज एकत्रितपणे विरोधी पक्षांच्या उमेदवाराच्या मागे उभा राहिला असून कार्यकर्ते जोमाने काम करीत आहेत. ' पुलोद 'च्या सर्व उमेदवारांना जिंकून आणण्याचे पुलोद मुस्लिम मेळाव्यानंतर सर्वत्र वातावरण तयार झाले आहे त्याचा अधिक फायदा भाई वैद्य याना मिळणार आहे. या मतदार सघात तामिळ भाषिक तीन हजार असून तेलगू विडी कामगार महिला–पुरुष पाच हजार आहेत. आजवर ही मते विरोधी पक्षियानाच पडत आली आहेत. ज्या भागातील मते कॉंग्रेस आयला पडतात अशा झोपडपट्टी भागात येरवडा परिसरात भाजपाचे आणि स कॉंग्रेसचे काम चागले आहे. भाजपाचे मामा भोसेकर याच झोपडपट्टी परिसरातून निवडून आलेले आहेत. बोपोडी मतदार सघातील समाजवादी कॉंग्रेसचे उमेदवार रामभाऊ मोझे याचा प्रभाव असलेला मोठा भाग या मतदार सघात येतो. त्यामुळे ' पुलोद ' आघाडीमुळे ही सर्व मते भाई वैद्य यानाच मिळतील

विरोधी पक्षियातील एकजुटीचा फायदा भाई वैद्य याना अधिक होणार आहे काका वडके हे शिवसेनेचे तडफदार नेते येथूनच निवडणूक लढवीत आहेत काही प्रमाणात ते विरोधी पक्षीयाचीच मते खेचणार आहेत; परतु त्याचा निकालावर फार मोठा परिणाम होईल असे वाटत नाही

प्रकाश ढेरे याच्या प्रचाराला अद्याप म्हणावा तसा जोर आलेला दिसत नाही. स्थानिक कार्यकर्त्यांची टंचाई त्यांना जाणवते त्यामुळे कसब्यातील कार्यकर्ते त्याचे काम करताना आढळत आहेत. पक्षांतर्गत लाथाळ्यामुळे, महिला आघाडीने ऐन निवडणुकीच्या मोक्यावर पत्रके काढून वातावरण तापविण्यास मदत केल्याने, प्रकाश ढेरे यांना पक्षांतर्गत विरोधालाच मोठे तोड द्यावे लागले.


या पार्श्वभूमीवर भाई वैद्य याची भेट घेतली असता पदयात्रेतून थोडा वेळ काढून त्यांनी या निवडणुकीच्या संदर्भात आपले विचार व्यक्त केले लोकसभेच्या निवडणुका आणि विधानसभेच्या निवडणुका यामधील फरक स्पष्ट करीत असताना भाई वैद्य म्हणाले–

' लोकसभेच्या वेळची इंदिराजीच्या हत्येमुळे निर्माण झालेली सहानुभूतीची लाट आता ओसरली असून, पुलोदची हवा आता निर्माण झाली आहे. लोकसभेच्या वेळेला श्रद्धांजलीची भावना होती. आता त्यात खूपच बदल झाला आहे. शिवाय त्यावेळी विरोधकांच्यात एकी नव्हती आता 'पुलोद' आहे. पुलोदच्या निर्मितीचे लोकानी चागले स्वागत केले सर्वसाधारण माणसात पुलोद-बद्दल आकर्षण निर्माण झालय. पाच वर्षापूर्वी पुलोदने केलेल्या शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार, लिफ्टग्रस्त लोकाच्यासाठीचे कायदे सवलती याची आम्ही आठवण देत असतो त्यावेळी जो जनतेचा फायदा झाला, त्याचा अनुभव चागला आहे

' पुलोदच्या त्या कामगिरीच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस आयला स्पष्ट बहुमत मिळूनही राज्यात अस्थिरता निर्माण झाली ' असे सांगून भाई वैद्य म्हणाले–' अंतुलेंचा भ्रष्टाचार, बाबासाहेब भोसले यांचा विनोदी-कारभार आणि वसंत दादांचा केविलवाणा कारभार पाहून लोक आता स्पष्टपणे बोलू लागलेत पुलोद आले पाहिजे, अशी भावना त्यामुळे वाढली आहे. लोकसभेच्या वेळेला जनमताचा अंदाज अथवा वेध घेता आला नाही हे खरे आहे परतु पुलोद निर्मितीमुळे लोकांकडून जो उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे तो पाहता विधानसभेच्या निवडणुकीत पुलोद विजयी होईल असे वाटते.

पुलोदच्या जाहीरनाम्याचा उल्लेख करून भाई वैद्य म्हणाले, ' पुलोदने जे पूर्वी करून दाखविले आहे, त्याच धर्तीवर ह्या जाहीरनाम्यात एक प्रकारे लोकांच्या आशाआकांक्षाचे प्रतिबिंब दिसते. कॉंग्रेस आयचा जाहीरनामा रगहीन आहे '

हिंदूच्या भावना भडकवून कॉंग्रेसने लोकसभेच्या निवडणुकीत मते खेचल्याचे सागून भाई वैद्य म्हणाले, ' शिखांच्या विरुद्ध कॉंग्रेसच्या नेत्यानी जो द्वेष फैलावला त्याचा परिणाम मागच्या निवडणुकीवर झाला. पंजाबमधील समस्येचे स्वरूप शीख विरूद्ध हिंदू असे केले गेल्याने कॉंग्रेसला त्याचा



पुलोद आघाडी – पर्यायी पक्षाची गरज भागवणार ?

फायदा झाला याचा अर्थ विरोधक हिंदू द्वेष्टे बनले आहेत असे समजण्याचे काहीच कारण नाही. मात्र पंजाबबाबत विरोधी पक्ष बरोबर भूमिका घेत नाहीत अशी भावना राजीवजींनी निर्माण केली. त्याचा त्यांना फायदा झाला; परंतु याचा अर्थ कुठल्याही एका सामाजिक घटकाचा अनुनय केला पाहिजे हे खरे नाही. विधानसभेच्या वेळेस हे सर्व प्रश्न बाजूला पडले आहेत. दैनंदिन प्रश्न पुढे आले आहेत. त्यासाठी मतदार पुलोदचा निवड करतील असे वाटते.'

'पर्यायी पक्ष आज नाही याचा फायदा काँग्रेसला नेहमी होतो' असे म्हणून भाई वैद्य म्हणाले, 'पुलोद हा महाराष्ट्रात पर्याय होत आहे. आज जनता पुलोदलाच पर्याय मानीत आहे. जनतेला पर्याय हवा आहे. लोकसभेच्या वेळेला आम्ही तो देऊ शकलो असतो तर हे चित्र बदललेले दिसले असते. आज एका पर्यायी पक्षाची मागणी जनता करीत असून विरोधकांमधील सामंजस्याची मागणी करीत आहे आणि महाराष्ट्रापुरती पुलोदने ती गरज पुरवली आहे.'


भाई वैद्य यांना आज समाजाच्या सर्व थरातून पाठिंबा मिळत आहे. भाजपाचे कार्यकर्ते, पुलोदमधील इतर घटक पक्षाचे कार्यकर्ते काम करीत आहेत. म. वि. अकोलकर, सुरेश देशमुख यांनी भाईंची प्रचार आघाडी सांभाळली आहे. भवानी मतदार संघाबरोबरच इतरत्रही जनता पक्षाचे कार्यकर्ते त्या त्या 'पुलोद' उमेदवाराचे काम करीत आहेत त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये प्रचाराचा एकजिनसीपणा आल्याचे जाणवत होते.

## पुणे कॅन्टोन्मेंट : विठ्ठल तुपे शेतकरी संघटनेचे बळ

ऐंशी सालच्या इंदिरा लाटेतही दुसऱ्यांदा निवडून आलेल्या आ. विठ्ठल तुपे यांचा 'पुणे कॅन्टोन्मेंट' मतदारसंघ हा वेगवेगळ्या कारणांनी पुण्याच्या इतर मतदारसंघांपासून वेगळा आहे. बहुसंख्य शेतकरी मतदार असलेल्या या मतदारसंघावर शेतकरी संघटनेचा प्रभाव आहे. शरद जोशींच्या शेतकरी संघटनेमार्फत झालेल्या सर्व आंदोलनात त्यामुळेच या भागातील शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व चांगल्याप्रकारे दिसत असे विठ्ठल तुपे या आंदोलनात आघाडीवर असत. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्रीराम हरफळे हे आ. विठ्ठल तुपे यांच्या प्रचारात आघाडीवर आहेत. शेतकरी संघटनेने आपले बळ श्री. तुपे यांच्या मागे उभे केल्यामुळे निवडणुकीची प्राथमिक लढाई जिंकल्यासारखीच आहे.

शेतकरीवर्गाबरोबरच कामगारवर्ग मोठ्या प्रमाणात आहे. पुण्यातील मोठी झोपडपट्टी याच मतदारसंघात मोडते. पुणे कॅन्टोन्मेंटचा भाग यात समाविष्ट असल्याने 'कॉस्मॉपॉलिटन' संस्कृतीचा हा मतदारसंघ बनलेला आहे. पुलोदचे जनता पक्षाचे उमेदवार विठ्ठल तुपे यांचे विरोधात काँग्रेस आयचे महापौर चंद्रकांत शिवरकर यांना उभे केले आहे. दलितपँथरचे गंगाधर आंबेडकर हे उभे आहेत; परंतु खरी लढत श्री. विठ्ठल तुपे आणि श्री. चंद्रकांत शिवरकर यांच्यातच आहे.

निवडणुकीच्या प्रचाराचा रंग सुरुवातीपासूनच इथे वेगळा बनला आहे. काँग्रेसच्या प्रचारतंत्रामुळे माळी समाज विरुद्ध मराठा समाज अशा जातीयवादातून या निवडणुकीच्या प्रचारात वेगळाच रंग भरला गेला. पंधरा हजार माळी समाजाची मते अधिक कॅन्टोन्मेंट परिसरातील ख्रिश्चन–पारशी–मुस्लिम समाजाची मते ही आमची जमेची बाजू असे काँग्रेसच्या गोटातून बोलताना आढळतात. प्रचारावर त्याच पद्धतीने भर दिल्यामुळे शेतकरी समाज हा जनताच्या मागे उभा आहे. विठ्ठल तुपे यांचे कार्य कोणत्याही जातीला धरून नसून समाजाला



श्री. तुपे – सामाजिक कार्याचा पाया

धरून असल्याने सर्व थरातून त्यांना पाठिंबा आढळतो आहे.

विसर्जित कॅन्टोन्मेंट बोर्डात भाजपाचे बहुमत होते शंकरराव यादव हे याच भागातले. पुलोदमुळे भाजपाच्या मताचा लाभ श्री. तुपे यांना होणार आहे स्वत: तुपे याच्या व्यक्तिमत्त्वामुळे लोकांवर त्यांचा प्रभाव चांगला पडला आहे गेल्या वीस–पचवीस वर्षातील त्याचे सामाजिक कार्य हा त्यांचा पाया आहे आपल्या मतदारसंघासंबंधी बोलताना श्री. तुपे म्हणाले,

'विविध प्रकारचा हा मतदारसंघ आहे. तरीसुद्धा शेतकरीवर्ग मोठ्या प्रमाणात असल्याने शेतीविषयक प्रश्नांना प्राधान्य आहे. शेतकरीसंघटनेचे कार्य मोठे आहे आणि काँग्रेस आयचे कार्यकर्ते शेतकरीसंघटनेत, या परिसरात अभावानेच आहेत. शेतीमालाला रास्त भाव मिळावा यासाठी पुलोदचा अधिक प्रयत्न राहील. पुलोदने आपल्या जाहीरनाम्यात तसे स्पष्ट नमूद केलेले आहे. शेती उत्पादन खर्च अधिक श्रमाचे वाजवी दाम यावर आधारित शेतीमालाचे भाव असे सूत्र आहे.'

पाणी वाटपाच्या महत्त्वाच्या प्रश्नावर श्री. विठ्ठल तुपे म्हणाले, 'पाणी वाटपाच्या संदर्भात आम्ही या भागातून छोट्या कॅनॉलची मागणी करीत आलो आहोत. खडकवासला धरणापासून निघून कात्रज, कोंढवा, देवाची उरळी असा तो जाईल. पुलोद शासनाच्या वेळी तशी पहाणी झाली होती. या भागात पाऊस अत्यंत कमी पडतो. त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. या भागात पाझरतलावांची कामे भरपूर झालीत; परंतु पाऊसच नसल्याने त्याचा उपयोग झाला नाही. हा कॅनॉल झाल्यावर चित्र बदलेल; परंतु काँग्रेस शासनाने त्याकरता कोणतीच पावले उचलली नाहीत. सध्या आमची मागणी अशी आहे. या भागातून जाणारा मोठा उजवा कालवा आहे. त्यावरून लिफ्टने या गावांना शेतीला पाणी द्यावे यासाठी प्रयत्न केले; परंतु कॅनॉलच्या १०% पाण्याचाच लिफ्टद्वारे उपयोग घेता येतो. तसा नियम आहे ती मर्यादा केव्हाच ओलांडली आहे. म्हणून ती मर्यादा २५% करावी अशी आमची मागणी आहे. विधानसभेत तसा ठराव मांडला; परंतु शासनाकडून नकार मिळाला.'

लिफ्ट इरिगेशन योजनांसंबंधी बोलताना श्री. तुपे यांनी सांगितले, 'हवेली तालुक्यात अपुऱ्या,बंद पडलेल्या लिफ्टचा प्रश्न गंभीर आहे. त्यासाठी यशवंत सहकारी साखर कारखान्याने कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ज्या योजना चालू होण्याची शक्यता आहे आणि आर्थिक अडचणीमुळे ज्या अर्धवट पडलेल्या आहेत, अशासाठी 'यशवंत स. सा. कारखाना परिसर विकास समिती' स्थापन केली असून मी स्वत: त्या समितीचा चेअरमन आहे. त्या मार्फत अशा योजनांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय होऊन कोलवडी येथे योजनेची सुरवात झाली आहे अशा बंद लिफ्टपैकी कारखान्यातर्फे ९–१० योजना चालू होतील.'

जिरायत जमिनीबाबत बोलताना श्री तुपे म्हणाले, 'जिरायत भागाला लिफ्टयोजनेचा फायदा होत नाही. त्या ठिकाणी शासनाने स्वखर्चाने लिफ्टयोजना करावी अशी मागणी होती. त्या प्रकारची घोषणाही शासनाकडून करण्यात आली; परंतु अद्याप कार्यवाही नाही.'

या भागातील एका महत्त्वाच्या प्रश्नावर बोलताना श्री. तुपे म्हणाले, 'पाझरतलाव हे रोजगारहमी योजनेखाली करावेत असा शासनाचा नियम आहे; परंतु हा शहरी भाग आहे. इथं मजुरांना इतरत्र काम मिळते. अधिक मजुरी मिळते. त्यामुळे रोजगारहमी योजनेखालच्या कामांना मजूर नाही मिळत. मजूर नाहीत म्हणून कामे नाहीत. यासाठी शहरी विभागासाठी हा नियम शिथिल करून 'टेंडर' पद्धतीने ही कामे करावीत असे वाटते. या भागात ड्रेनेजचे पाणी शेतीला पुरविले जाते; परंतु बरेच पाणी नदीत सोडले जाते. पंपिंग स्टेशनची दुरुस्ती केल्यास संपूर्ण पाण्याचा वापर करता येईल.'

पुलोदबद्दल बोलताना विठ्ठलराव म्हणाले, 'पुलोद ही गरज होती आहे पुलोदचा लोकांना अनुभव चांगला आहे. शरद पवार यांचे व्यक्तिमत्त्व चांगले आहे. त्यामुळे एकीकडे काँग्रेसकडे सर्वच बाबतीत गोंधळाची परिस्थिती तर विरोधकांकडे एक नेता एक कार्यक्रम यावर आधारित असा पुलोदचा पर्याय. यामुळे विधानसभेच्या निवडणुकात पुलोदला चांगले यश मिळेल.'

हडपसरमध्ये आज सर्वत्र विठ्ठल तुपे यांचेच कार्यकर्ते हिंडताना आढळतात पुण्याला जोडून असलेल्या या मतदारसंघाची ही निवडणूक अशी वेगळी आहे. विठ्ठलरावांसारखा तरुण उमदा प्रतिनिधी या भागातून निवडून जाणार याबद्दल कुणाच्याही दुमत नाही.

## बोपोडी : रामभाऊ मोझे चुरशीची लढत

पूर्वी बोपोडी मतदारसंघ राखीव असे. नंतर पर्वती राखीव झाला. बोपोडी मतदारसंघ येरवड्यापासून औंधगावापर्यंत पसरला आहे. खडकी, बोपोडी, रेंजहिल्स, संगमवाडी, औंधगाव, दापोडी असा हा मतदारसंघ ॲम्युनिशन कारखाना, किर्लोस्कर कारखाना हे प्रमुख मोठे कारखाने. त्यामुळे कामगार वर्ग, दलित समाजाची वस्ती, इतर भाषिक, झोपडपट्टी, पोलिस चाळी, अशा भागातून हे मतदान होते. पूर्वी राखीव मतदारसंघ असल्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या सर्व गटाचे काम इथं आहे. सर्व मिळून एक रिपब्लिकन उमेदवार उभा केल्यास इतर उमेदवारांना निश्चितच जड जाईल.

आज पुलोद आघाडीचे स. काँग्रेसचे श्री. रामभाऊ मोझे उभे आहेत. त्यांच्या विरोधात काँग्रेस आयचे बळीराम सावंत हे आहेत. रिपब्लिकन पक्षाचे (प्रकाश आंबेडकर) श्री. मुरलीधर जाधव हे उभे आहेत. काँग्रेस आयचे श्री. शशिकांत कदम हे पूर्वी ८० ला या ठिकाणाहून निवडून आले होते. त्यांना तिकिट न मिळाल्यामुळे त्यांचे कार्यकर्ते नाराज आहेत बळीराम सावंत हे कॅन्टोन्मेंट बोर्डावर सरकारनियुक्त अध्यक्ष आहेत; परंतु या व्यतिरिक्त त्यांचे काम या ठिकाणी काही नाही. त्यांना उमेदवारी मिळाल्याचे जाहीर झाल्यावर काँग्रेस आयचे अनेक कार्यकर्ते, रामभाऊ मोझे यांचा प्रचार करायला लागले. पक्षांतर्गत नाराजीमुळे बळीराम सावंतांचा प्रचार हा वरवरचा असल्याचे जाणवते. त्या मानाने रामभाऊ मोझे यांना सर्वत्र पाठिंबा मिळत आहे. त्यांचा भर घराघरातून प्रचारावर आहे. मोठ्या सभा या मतदारसंघात अद्याप झालेल्या नाहीत बहु-

जन समाजाचा पाठिंबा मोझे यांना मिळेल. पुलोद आघाडीचा त्याना चागला लाभ होईल भाजपाची दहा एक हजारमते त्यांच्या बाजूने पडतील. पुलोदमुळे सर्व घटकपक्षांचे कार्यकर्ते कामाला लागलेत. खुद्द सगमवाडीतला काही भाग भवानी मतदारसघाला जोडलेला आहे. तरी सगमवाडीतले मतदान ऐंशी टक्के मोझे यांनाच पडेल. मोझे यांच्या स्वभावामुळे त्यांच्याविषयी मतदारसंघात आदर आहे. आणि त्याचा त्याना फायदा होणार आहे. रेंजहिल्स भागातील दाक्षिणात्य मतदाराची मते परपरेने कॉंग्रेस आयलाच पडतील. त्या तुलनेत खडकी, बोपोडी, दापोडीतून मोझे किती मतदान आपल्याकडे खेचू शकतात त्यावर त्याचे यश अवलंबून आहे. आज प्रचारावर ते आघाडीवर आहेत. पुलोदमुळे आणि रिपब्लिकन पक्षांमुळे त्यांचा विजय होण्यास हरकत नसावी.

## हिंदू हिताचा विचार —प्रा. श्रीपती शास्त्री

या खेपेची लोकसभेची निवडणूक वेगवेगळया कारणानी गाजली. विरोधकाचे अनपेक्षित झालेले पानिपत आणि त्यातून उद्भवलेले अनेक प्रश्न त्यापैकी एक महत्वाचा चर्चिलेला प्रश्न हिंदू हिताला मत ! चिंचवड येथील पत्रकार परिषदेत सरसघचालक बाळासाहेब देवरस यानी ‘ हिंदूहिताला प्राधान्य देणाऱ्या उमेदवाराला हिंदूनी मतदान करावे ’ असे अवाहन केले होते. त्या संदर्भात विद्यापीठातील इतिहासाचे प्राध्यापक आणि सघाचे कार्यकर्ते प्रा श्रीपती शास्त्री यांच्याशी झालेल्या गप्पागोष्टी अशा—

‘लोकसभेचे निकाल हे इंदिराजीच्या हत्येमुळे कृतज्ञता, श्रद्धाजली अर्पण करण्याच्या प्रकारातून लागलेत. भारतीय मन हे मतदानाच्या रूपाने बाहेर आले भारतीय हा अत्यत भावनाशील मनाचा असतो. त्यामुळे या प्रकारे श्रद्धाजली अर्पण करून त्या दुर्दैवी प्रकारानंतर आय कॉंग्रेसला मतदान केले गेले. ’

‘या खेपेला कधी नव्हे तो हिंदू हिताचा प्रश्न पुढे आला. पजाब समस्येने त्याला वेगळा रंग दिला गेला; परंतु हिंदुस्थानच्या वेगवेगळया प्रांतात हा प्रश्न वेगवेगळया कारणाने पुढे आलाय. तामिळनाडूमध्ये हिंदुहा शब्द उच्चारणे परवा परवापर्यंत घृणास्पद मानले जाई. त्या तामिळनाडूत हिंदुत्वाची अभूतपूर्व अशी लाट आली डीएमके नेता करूणानिधी यानी या निवडणुकीत ‘मी हिंदु आहे ’ असे भाषणातून सागितले ! तर एम. जी. रामचंद्रन् म्हणाले होते, ‘ आम्ही आदी हिंदु आहोत !’ कॉंग्रेसला आजपर्यंत बहुमत मिळत असे. या खेपेला मिळाले ते हिंदुच्याच मतामुळे राजीव गाधींनी गगा स्वच्छतेची योजना आखणे हा सर्व हिंदुत्वाच्या लाटेचाच प्रभाव आहे. ’

‘ जिथे लोकाना पर्याय मिळाला तिथे तो लोकानी स्वीकारल्याचे दिसते आध्र, प. बंगाल हे याचे उदाहरण आहे जिथे पर्याय देता आला नाही तिथे कॉंग्रेस निवडून आली. हिंदू हिताच्या सदर्भात जी हवा निर्माण होत आहे, ती एकाच बाजूने होत नसून सार्वत्रिक आहे. हिंदू हिताच्या बाजूने दोन/तीन टक्के जरी मते अधिक वळली तरी बदल घडू शकतो. तामिळनाडूत ‘ हिंदु मुन्नानी ’ चा उमेदवार निवडून आला. याच तत्त्वावर तामिळनाडूतले वातावरण त्यामुळे बदलले. कर्नाटकात पूर्वीच्या विधानसभेत ३० मुस्लिम आमदार होते. हिंदू हिताच्या विचाराने, प्रचाराने रामकृष्ण हेगडे असेंब्लीत फक्त दोन आमदार निवडून आले ! ( १ जनता, १ कॉंग्रेस) तामिळनाडूतील सर्वपक्षाचे राजकीय नेते आता संघाच्या नेत्याकडे हेलपाटे घालू लागलेत, हा बदल या ‘ हिंदु हिता ’च्या प्रचाराचाच. आजवर निवडणुका म्हटल्या म्हणजे सघावरील आरोपांची आतषबाजी होत असे. या खेपेला राजीव गाधीसकट इतर पक्षही प्रचारात सघावर टीका करताना दिसत नाहीत. संघाविषयी एक शब्द बोलत नाहीत, याचे कारण हिंदूच्या मतांची त्याना झालेली जाणीव ही होय. यापुढे ‘ हिंदु मत ’ हा ‘ फॅक्टर ’ निवडणुकामध्ये निश्चितपणे रहाणार आहे. त्याची ‘ एनकॅशमेंट ’ कोण कशी करून घेणार आहे हे त्या त्या पक्षाच्या शहाणपणावर अवलबून आहे जो करून घेईल त्याला त्याचा फायदा होईल जो मोठा आवाज करून हिंदू हित बोलतो तो फार हिंदू हिताचा विचार करणारा आहे आणि जो कमी बोलतो तो उदासीन आहे असे समजण्याएवढे हिंदू मतदार मूर्ख नाहीत. हिंदू हिताची प्रतारणा करणारे कोण हे जाणण्याचा विवेक मतदाराना असतो. ’

‘आणीबाणीनतर सघाच्या नावाने केंद्र सरकार पडले ते तेव्हापासून सघ हा निवडणुकीमधला ‘ फॅक्टर ’ बनला आहे म्हणजे सघ काय भूमिका घेणार याकडे सर्व पक्षियाचे लक्ष असते. सघामध्ये तत्वत: ‘ व्होटिंगपॅटर्न ’ म्हणजे कसे मत द्यावे याबद्दल सूचना नाहीत नुकतेच मा बाळासाहेब देवरस ‘हिंदूहित साधणाऱ्या उमेदवारालाच मत द्या ’ असे म्हणाले, त्यावेळीसुद्धा त्याना माहीत होतं की, निम्म्यापेक्षा जास्त मतदारसघात ‘ भाजप ’ उमेदवार नाहीत कमीच आहेत; परंतु सघकार्य मात्र सर्वच मतदारसघात आहे. सर्वच राजकीय पक्षानी आपल्या पक्षाची दारे सघ स्वयंसेवकाना घटनेने बद ठेवलेली आहेत. याला अपवाद फक्त ‘ भाजप ’ चा आहे. किंबहुना ‘ भाजप ’ जनतातून बाहेर पडला तो याच मुद्यावर. त्यामुळे लाखो सघ स्वयंसेवक ‘ भाजप ’ चे सदस्य आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सघाचे स्वयसेवक, जे निवडणुकीत प्रयत्नशील असतात ते भाजपचे काम करताना दिसतात, तसेच भाजपच्या मित्रपक्षाचेही काम करताना दिसतात. जसे सघ स्वयसेवक येथे जगन्नाथरावाचे काम करीत होते तसेच दिल्लीत सिकदर बख्त यांचा प्रचारही करीत होते. जॉर्ज फर्नांडिसचाही करीत होते.’

श्रीपती शास्त्री निवडणुकांच्या संदर्भात सर्वात जास्त चर्चिला गेलेल्या नानाजी देशमुखांच्या मुद्यावर म्हणाले, ‘ नानाजींनी जे म्हटले, त्याचा सदर्भ इंदिरा गाधीच्या हत्येनतरच्या परिस्थितीशी होता. त्या सदर्भात निवडणुका लगेच जाहीर झाल्यामुळे त्याचा वापर केला गेला मा रज्जू भैयानी या सदर्भात म्हटले होते— ‘ कॉंग्रेसने असे काय कार्य केलंय की सघाने त्याना पाठिंबा द्यावा आणि भाजपाने असे काय केले की, सघाने त्याचा पाठिंबा काढून घ्यावा ?’ याच सदर्भात बोलायचे झाल्यास कॉंग्रेसने तीस वर्षात सघावर तिनदा बदी आणली. ब्रिटिशानीसुद्धा ज्याचा वापर केला नाही अशा कायद्याचा वापर संघाचे दमन करण्याकरता केला. आणीबाणीत

पृष्ठ २३ वर

# भांडवल जमवण्याच्या आकर्षक योजना

भारत सरकारच्या प्रभावाखाली येणाऱ्या उद्योगांनी त्याना लागणारे भाडवल हे प्रामुख्याने जनतेतून जमा करण्याचा प्रयत्न करावा अशा तऱ्हेचा विचार सध्या सरकार करत आहे ह्या उद्योगाना लागणारे भाडवल एरवी अर्थसंकल्पाला पाय फुटवून मिळते. अशा प्रकारे भाडवल मिळवले असता अर्थसंकल्पाला फुटणाऱ्या पायात तेवढीच कमी व त्यामुळे त्यावर पडणारा ताणही कमी या उद्देशानी हे नवीन धोरण राबवण्याचा प्रयत्न दिसतो.

जनतेतून भाडवल 'अरुपांतरीत कर्जरोखे' द्वारा मिळवण्यासारखा लोकप्रिय प्रकार दुसरा कोणताच नाही सरकारने हाच प्रकार उचलून धरला आणि Bharat Earth Movers Ltd., Mazagon Dock Ltd , CCI या उद्योगांना अरुपांतरीत कर्जरोखे लोकाना देऊ करण्यास परवानगी दिली.

B. E. M. Ltd. ला ४५ कोटीचे, Mazagon Dock ला २५ कोटीचे तर C C I ला २० कोटीचे कर्जरोखे देऊ करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

भारत सरकारच्या प्रभावाखालील उद्योग सुद्धा भांडवल लोकातून गोळा करताहेत याचे मुख्य कारण म्हणजे गेल्या काही वर्षात उद्योगात गुतवण्यास उत्सुक असणाऱ्याच्या संख्येत झालेली वाढ. RBI ने आपला ८३–८४ चा चलन व अर्थ या संदर्भातील अहवाल सादर केला तो हेच दाखवतो.

८४ च्या पहिल्या अर्ध्या टप्प्यात 'New Capital Issues' मुळे ३९१ कोटी रुपये जमा झाले हे गतवर्षीपेक्षा २० कोटीने अधिक होते.

Non–goverment उद्योगांनी आपले भांडवल वाढवण्याकरता (Paid–up) देऊ केलेले शेअर व कर्जरोखे यात ५९% नी वाढ झाली आहे म्हणजे आकडेवारीच्या खोलात न जाता सुद्धा गुतवणुकदाराच्या वाढत्या सख्येची जाणीव होते.

सातव्या नियोजनाच्या पूर्ततेसाठी उद्योगधंद्याचा पसारा वाढणे आवश्यक आहे व त्यासाठी उद्योजकांना भांडवल म्हणून अठरा हजार कोठी रुपये सातव्या योजनेच्या काळात जमवावे लागतील. त्यासाठी त्याना समाधान देणारी योजना लागू केली जात आहे. इक्वीटी शेअरला जोडून अरुपांतरीत कर्जरोखे देण्याची पद्धत, जी पूर्वी समत होती ती काही काळ रद्द केली होती; परंतु परिस्थितीची जाण ठेवून त्यात जरासा बदल करून ती पुन्हा संमत करण्यात आली आहे व त्याचा निरनिराळया उद्योगाना आपापले भांडवल वाढण्याच्या कामी निश्चित उपयोग होईल.

अशा तऱ्हेने लोकामधून पैसे जमा करण्याच्या प्रयत्नांमुळे बँक व आयुर्विमा किंवा तत्सम वित्तीय संस्थांवर कितपत परिणाम होईल ? कारण अर्थकारणात आणि विकासाच्या कामात वापरल्या जाणाऱ्या पैशात त्याचाही वाटा असतो. त्यामुळे अशा वित्तीय संस्थाकडे येणाऱ्या ठेवीवर भावी काळात परिणाम होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे व त्यासाठी बँका व वित्तीय संस्थाना जास्त आकर्षक योजना जनतेपुढे माडणे आवश्यक ठरणार आहे. Corporate Sector मध्ये भांडवल गोळा करण्याच्या आकर्षक योजना बऱ्याच पुढे आल्या तेव्हा त्या स्पर्धेत टिकण्याकरता बँका व इतर वित्तीय सस्था आपल्यापुढे काय मांडून ठेवतात ते बघायचे !

## शेअर बाजाराला धक्का !

पंतप्रधान राजीव गाधी याचे सरकार जसजसे स्थिरावू लागले आहे तसतसा उद्योजकातला उत्साह वाढतो आहे आणि अशा परिस्थितीत या उद्योजकाचे भाईबंद 'शेअर बाजारवाले' हे कसे मागे पडतील, त्याच्या उत्साहाला तर सध्या काही सीमाच राहिली नाहीयें. खरं पहायचे तर सध्याचा 'सिझन' हा या लोकाच्या दृष्टीनी फारच मंद असतो, बजेट–नवी धोरणे यासारख्या कारणामुळे; पण नवीन सरकारने आल्या आल्या उचललेली पावल म्हणजे चारचाकी वाहनाच्या 'मुक्त - उत्पादनाला' दिलेली परवानगी आणि यासारख्या छोटयामोठया घटनामुळे 'शेअर बाजारात' सरकारबद्दलचे प्रेम जरा जास्तच आढळतंय आणि त्याचा प्रत्यय ह्या शेअर बाजारात असलेल्या तेजीतून दिसतो आहे.

टेल्को, डि. सी. एम. टोयाटा या सारखे उद्योग की ज्याच्या शेअरचा भाव त्यांना मिळालेल्या 'मुक्त-उत्पादनांच्या' परवान्यासदर्भात वाढला; पण यासारखे केवळ वाहन उद्योगच नव्हे तर सर्वच उद्योगधंद्याचे शेअर गेल्या काही आठवडयात तेजीत आहेत. टिस्को, एसीसी, कोलगेट, लॅक्मे, इंगोरसल रँड, नवीनच आलेला 'ऑर्के' आणि असे अनेक की, ज्याच्या शेअरचे भाव गेल्या काही दिवसात भरमसाठ वाढले. अर्थात प्रत्येक उद्योगाच्या शेअरच्या वाढत्या भावाचे कारण 'नवीन सरकार' हे होत नसले तरी, तरी त्याचा प्रभाव पडल्यावाचून रहात नाही.

नवीन सरकार आणि शेअर बाजार याचा सबध लावताना शेअर बाजाराचा वाढता जोम हा खरोखरच आवश्यक आहे का याचा विचार करणे आवश्यक ठरेल शेअर बाजार ही जरी एक संवेदनाशील जागा असली की, जिथे नवीन सरकारबद्दलची प्रतिक्रिया झटकन येते, तरी ती प्रतिक्रिया ही काही प्रत्येक वेळेला वस्तुस्थितीला धरून असतेच असा तला भाग नाही. राजीव गाधीची उद्योगप्रियता ही जर एक वस्तुस्थिती मानली तर त्याबरोबर दुसरी वस्तुस्थिती अशीही आहे की, एखादे बटन दाबल्यावर बदल व्हावा तसा आपल्या अर्थव्यवस्थेत पटकन बदल होणे शक्य नाही. आपले अर्थमंत्री नियोजन मडळाच्या सूचनाना चाट देऊन उद्योजकाकरता काही विशेष देतील अशी अपेक्षा नाही. शेतीच्या कार्यक्रमांना पैसा व प्राधान्य देण्याची पद्धत बदलली जाईल असे अर्थमत्र्यानी गेल्या काही दिवसात आपल्या भाषणात केलेल्या विधानांवरून वाटत नाही. आणि त्यात काही चूकही नाही एक गोष्ट खरी आहे की, उद्योगधंद्याना दिल्या जाणाऱ्या परवान्याच्या बाबतीतील धोरणात महत्त्वपूर्ण बदल होत आहेत; पण त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत निश्चित स्वरूपाचे बदल होतीलच असे खात्रीने सागता येत नाही. वर उल्लेखलेल्याप्रमाणे आपली अर्थव्यवस्था एकदम बदलण अवघड असण्याची अनेक कारणं आहेत व ती मुलभूत आहेत आणि या कारणाच्या बाबतीतला रोग ह्या फार खोलवर पसरला आहे, त्यामुळे तो बरा होण्यास काही कालावधी निश्चितच लागेल की जो जास्त असेल

उद्योगधद्याना लागणाऱ्या मुलभूत गरजेत इधन ही एक आहे. उद्योगधद्याचे इंधन मुख्यत्वे वीज आणि कोळसा. या दोघाची परिस्थिती काय आहे ? तर दोहोचा तुटवडा हा नित्याचा प्रश्न गेले कित्येक दिवस सतावतो आहे तामिळनाडू सरकारने तीस टक्के वीज कपात मोठ्या उद्योगाकरता लागू केली आहे पूर्व भारतात वीज पुरवठ्याची परि-

स्थिती फारच काळजी करण्याजोगती आहे, तर कोळसा पुरवणारी यंत्रणा वाढत्या क्रमानी बिघडत आहे. सध्याच्या उद्योगाना आवश्यक असलेले इंधन देताना असलेली काटकसर लक्षात घेता नवीन परवाने धारण करून सुरू केलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प या प्रश्नामुळे आडणार तर नाहीत ना? नुसती इंधन-समस्या ही प्रधान समस्या नसून कामगार-मालक ही सुद्धा समस्या अशी आहे की, जिच्यात नवीन सरकारने कोणता विशेष फरक पडेल असे वाटत नाही. वाढते उद्योग हे शहरातच किंवा शहराच्या जवळच वाढून शहरे फुगवणार आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या वाढवणार का शहराऐवजी शहरापासून दूर खेड्यात जाण्यास मोठे उद्योग तयार होणार? म्हणजे पुन्हा वीज, वाहतुक, पाणी आणि वाहतुक आली की योग्य रस्ते, पाणी म्हटले की...? म्हणजे पुन्हा यासारखे मूलभूत प्रश्न?

थोडक्यात काय, नवीन सरकार व त्याची थोडीशी नवी धोरणे यामुळे उद्योगधंद्याना मिळणारा 'धक्का' कितपत पुरेसा असेल याबद्दल शंका असल्याने शेअर बाजारातील वाढत्या भावाबद्दल काळजी वाटते. कोलगेट, इंगोरसल याचा अपेक्षित असलेला 'बोनस शेअर' किंवा रिलायन टेक्सटाईलची गत-वर्षी झालेली प्रगती यासारखे काही मोजक्या उद्योगाचे शेअर सोडले तर बाकीचे या 'हवेत' वाढले आहेत.

शेअर्सचे भाव वाढताहेत, सरकार खुश असण्याची शक्यता आहे. कारण अनुकूल परिस्थितीचे ते द्योतक आहे सरकारने लोकाना एक आशा लावून ठेवली आहे. शेअर बाजारातील व्यवहार हे खरे तर अंदाज–आडाखे म्हणजे थोडक्यात आशा-वादावरच असतात. या आशावादाला 'मम' म्हणण्याचे काम सरकार चोख करत आहे. या आशावादाचा वाढता फुगा विधानसभा निवडणुकीनंतर अथवा अर्थ सकल्पानतर फुटला नाही म्हणजे मिळवले.

## टेल्को, टिस्कोच्या भावी योजना

उद्योगधंद्याना अधिक सवलती देणारे सरकार अशा प्रकारची भावना जी लोकात निर्माण झाली आहे, तिला पुष्टी देणारी सवलत सरकारने नुकतीच जाहीर केली आहे. ती सवलत आहे चार चाकी वाहनाच्या उत्पादनासबंधी. 'मुक्त उत्पादन'. चार चाकी वाहन निर्मिती करणाऱ्या उद्योगाना मिळालेला 'धक्का'. सरकारने आपले पाऊल तर टाकले, आता पाळी आहे ती उद्योजकाची! सरकारी धोरणामुळे उद्योगधंद्याचा पसारा वाढत नाही अशा तऱ्हेची बोंब मारणारे ह्या 'लिबराईझ' धोरणामुळे किती प्रगती करतात ते बघायचे!

TELCO, DCM–TOYATA, बजाज Tempo आणि प्रिमियर ऑटो हे वाहन निर्मिती करणारे उद्योग नवीन धोरणाचा फायदा चटकन चाखू शकतील असे प्रथम–दर्शनी तरी वाटते. सध्या चार चाकी वाहनाची भारतातील अवस्था फारच गंभीर आहे ज्याला आपण नेहमीच्या भाषेत 'मोटार' म्हणतो तो वाहनाचा प्रकार तर गेल्या काही दशकात फारच दुर्लक्षिला गेला होता. 'मारुती–सुझुकी' ने जरा जान आणली खरी, पण ती तरी किती जणाना पुरणार? 'डॉल्फीन' आणि 'कांटेसा' या दोन नव्या गाड्या अजून तरी सरसकट दिसत नाहीत. ह्या गेल्या दोन वर्षातील सुधारणेशिवाय स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या पस्तीस वर्षात हिंदुस्थान मोटर्सची 'अॅम्बेसेडर', प्रिमियर ऑटोची 'प्रिमीयर पद्मिनी' आणि 'स्टँडर्ड' किंवा 'गॅझल' या एका हाताच्या बोटावर मोजण्याजोग्या 'गाड्या' भारतात उपलब्ध होत्या. या वाहनाची नावे काही वर्षांनी बदलली जात पण मूळ साचा तोच असे. दर्जा आणि निवड या बाबतीत अगदी खालच्या थरात असलेला हा व्यवसाय सरकारने वर काढायचा ठरवलेला दिसतो. त्याला प्रतिसाद उद्योजकाकडून काय मिळतोय?

TELCO हा जमशेटपूर व पुणे या दोन ठिकाणी वसलेला उद्योग समुह, जो वार्षीक उलाढाली बाबतीत भारतातील क्रमाक एकचा उद्योग आहे त्यानी चार चाकी 'मोटार' उद्योगात प्रवेशण्याचे योजलेले आहे TELCO च्या Install capacity पेक्षा त्याचे उत्पादन कमी असण्याचा फायदा त्याना या नवीन धोरणामुळे होण्याची शक्यता आहे. ह्या उद्योग समुहाकडे असलेले प्रचड 'अॅसेट' लक्षात घेता, वरील प्रकारच्या वाहन निर्मितीत त्याना सद्य परिस्थिती लक्षात घेता रस वाटला नाही, तर नवलच.

होंडा या जपानमधील दोन चाकी वाहन बनवणाऱ्या आणि सध्या 'मोटार' उत्पादनातसुद्धा जागतिक बाजारपेठेत वर्चस्व गाजवत असलेल्या उद्योगाबरोबर सहकार्य करून 'पेट्रोल बचत' करणाऱ्या वाहनाचे उत्पादन करण्यासबधी योजना बाधली जात आहे. टेल्कोचा आणि पश्चिम जर्मनीतील 'Daimler Benz' या उद्योगाचा सहकार्य करार काही वर्षांपूर्वी संपुष्टात आला. या काळात त्याच्या सहकार्याने मध्यम आकाराची वाहने निर्मितीची त्याची योजना सरकारी धोरणामुळे बारगळली होती. Telco प्रमाणे DCM TOYATA या उद्योगाचासुद्धा TOYATA शी असलेला सहकार्य करार लक्षात घेता त्यानासुद्धा या धोरणाचा फायदा घेता येईल.

दर्जा, पेट्रोल बचत आणि किंमत या बाबतीत मारुती–सुझुकीला व्यावसायिक स्पर्धा देऊ शकेल अशी एकमेव कपनी भारतात आहे व ती म्हणजे TELCO! आणि तिच्याकडेच सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

टाटा उद्योग समुह लवकरच उच्च तांत्रिक प्रकारात मोडणाऱ्या उत्पादनात आपले हात-पाय पसरणार आहे येत्या पाच वर्षासाठी केलेला आराखडा हा उद्योग समुहाला पसरण्यास नवीन दालने दाखवणारा आहे. टाटा समुह येत्या नजीकच्या काळात टेलीकम्युनिकेशन, सुपर कॉम्प्युटर, कॉन्टॅक्ट ऑईल ड्रिलिंग, बायो टेक्नॉलॉजी, अॅडव्हान्स मटेरिअल्स्, प्रोसेस कंट्रोल सिस्टीम यासारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा शाखाकडे आपला विस्तार करणार आहे


टाटा इंडस्ट्रीजचे अध्यक्ष श्री. रतन टाटा, जे आता TISCO चे उपाध्यक्ष आहेत. त्यांनी इकॉनॉमिक टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत वरील योजनाचा आढावा घेतला. प्रगत तंत्रज्ञानातील शाखाव्यतिरिक्त उत्तर प्रदेशातील वायूवर आधारीत असलेला खत प्रकल्प, Trombay येथे असलेल्या वीज निर्मितीत मोठ्या प्रमाणात वाढ, टेल्को येथे मोटारीचे उत्पादन यासारखे अनेक प्रकल्प कार्यरत होत आहेत येत्या पाच वर्षात या सर्व प्रकल्पाना सुमारे २००० कोटी रुपयाची गुंतवणूक आवश्यक आहे.

सरकारच्या अधिकृत माहितीनुसार टाटा समुहाखाली येणाऱ्या उद्योगाचे 'assest' ८२ साली होते २४३० कोटीचे! तर बिर्ला समुहाचे २००५ कोटी. टाटा समुहाच्या नव्या योजनेनुसार टाटा समुहाचे 'assets' ५००० कोटीचा रेषा ओलांडून जातील.

नवनवीन क्षेत्रात पदार्पण करण्यास नेहमीच उत्सुक असलेला टाटा समुह त्यांची ही ख्यानी अशीच पुढे चालू ठेवणार असे दिसते. जे आर. डी टाटाच्या निवृत्तीनंतर या समुहाचे सचालन करणारे श्री. रतन टाटा यानी सुद्धा 'हम भी कुछ कम नहीं' असे दाखवून दिले जे आर डी टाटानी टाटा समुहाला दिलेले नेतृत्व आणि त्याच्या काळात झालेली प्रगती, रतन टाटाच्या नेतृत्वाखाली, तशीच पुढे चालू राहते का ते पाहायचे.

—विनायक गोखले

# लंडन ते मुंबई
## शिडाच्या बोटीतून



● विद्याधर ताठे ●

लंडन ते मुंबई हे ७५०० मैल अंतर समुद्रमार्गे एका साध्या शिडाच्या 'यॉट' मधून (नौकेतून) यशस्वी पार करायचे म्हणजे केव्हढे धाडस आहे ना! सिंधबादच्या सफरींची क्षणकाळ आठवण व्हावी असे हे धाडस भारतीय सेनादलातील सहा तरुण अभियंत्यांनी नुकतेच पार पाडले आहे आणि आता हे तरुण दर्यावर्दी याच यॉटमधून जगप्रवासास प्रारंभ करणार आहेत.

एवढा मोठा जलप्रवास करण्याचा भारतीयांचा हा पहिलाच ऐतिहासिक प्रवास आहे. यापूर्वी सेनादलातीलच दर्यावर्दींनी मुंबई ते गोवा, मुंबई ते कोचीन, मद्रास ते अंदमान निकोबार अशा काही सफरी यशस्वीपणे केल्या आहेत; पण लंडन ते मुंबई हा जलप्रवास करून सेनादलातील दर्यावर्दींनी खरोखरीच एक दिव्य केले आहे. विशेष म्हणजे युवक वर्षामध्ये या युवादर्यावर्दींनी केलेला पराक्रम खरोखरीच कौतुकास्पद आहे.

### तृष्णा

लंडन ते मुंबई हा जलप्रवास करण्यासाठी इंग्लंडमधून खास नौका खरेदी करण्यात आली व तिला 'तृष्णा' असे नाव देण्यात आले. जलप्रवासाचे नवे नवे संकल्प पूर्ण करण्याची मनी असणारी 'तृष्णा' या नौकेद्वारेच पूर्ण होणार असल्याने तिला 'तृष्णा' असे समर्पक नाव देण्यात आले. ही यॉट ३६ फूट ६ इंच लांब असून १० फूट ९ इंच रूंद व ६ फूट १ इंच खोल आहे. तिचे वजन साडेदहा टन आहे. नौकेमध्ये जलप्रवासास लागणारी आवश्यक ती सर्व उपकरणं असून नौका मुख्य समुद्रातून बंदराकडे नेणे व परत आणणे यासाठी नौकेत २३ हॉर्सपावरचे डिझेल इंजिन बसविण्यात आलेले आहे.

दिशादर्शक, वारा–वादळ दर्शक, स्पीड लॉग रेडिओ, सॅटलाईट नेवीगेशन सिस्टीम या उपकरणांबरोबरच या नौकेमध्ये ८० गॅलन पिण्याचे पाणी ठेवता येईल एवढी मोठी टाकी आहे. पहिली ती ३० गॅलनची होती; पण प्रवासाचा विचार करता ३० ऐवजी ८० गॅलनची टाकी बसविण्यात आली. ही यॉट खरेदी करण्यास सेनादलाकडे जे बजेट होते त्यामध्ये नवी यॉट मिळणे शक्यच नव्हते. तसेच विदेशी चलन उपलब्ध होण्याचाही प्रश्न होता. यामुळे सेनादलास (सेकंडहॅंड) वापरलेली जुनीच यॉट विकत घ्यावी लागली. एका व्यावसायिक जलप्रवासपटूच्या साह्याने १९७० च्या बनावटीची 'स्वान' ही फिनलंडमध्ये बनविण्यात आलेली नौका ३०,००० पौंडाला मिळाली.

१२ ऑक्टोबर ८४ रोजी लंडनच्या 'गॉसपोर्ट' या बंदरातून 'तृष्णाच्या' धाडसी जलप्रवासास प्रारंभ झाला. तृष्णेला सदिच्छा व निरोप देण्यासाठी इंग्लीश सेनादलातील अनेक अधिकारी, जवान, भारतीय राजदूत, अनेक भारतीय नागरिक गॉसपोर्टच्या किनाऱ्यावर जमलेले होते. या जलप्रवासास आशीर्वाद देण्यासाठी लंडनचे ख्रिश्चन धर्मगुरू आवर्जून आलेले होते. भारतीय पद्धतीने नारळ फोडून तर पाश्चिमात्य पद्धतीप्रमाणे शॅम्पेनच्या बाटल्या फोडून प्रवासाचा शुभारंभ करण्यात आला ब्रिटिश व भारतीय अधिकाऱ्यांच्या दोन नौकांनी किनाऱ्यापासून काही अंतर समुद्रात जाऊन तृष्णेला सोबत केली.

गॉसपोर्टमधून सर्वांच्या सदिच्छा पाठीशी घेऊन तृष्णा ९० मैलाचा प्रवास करून दुसऱ्या दिवशी अल्डरने बंदरात आली. आता यापुढे प्रसिद्ध अशा बिस्के उपसागरातील प्रवासास प्रारंभ होणार म्हणून नौकेतील सर्व तपासणी केली, पुरेसे इंधन, पाणी, सामान घेतले व १४ ऑक्टोबर रोजी तृष्णाने अल्डरने बंदराचा निरोप घेऊन स्पेनच्या ला–कोरना बंदराकडे प्रवासास प्रारंभ केला. अटलांटिक महासागरातील या प्रवासाचे पहिले दोन दिवस फारच आनंदात व हसतखेळत पार पडले. दि. १७ आक्टोबरची रात्र म्हणजे तृष्णेला काळरात्र ठरावी अशीच भीषण ठरली. ताशी ५० मैल वेगाने वाहणारे वारे व भयानक वादळात तृष्णा सापडली. ५०-६० फुटाच्या लाटा समुद्रात उसळत होत्या व तृष्णा वरखाली–वरखाली थयथयाट करत होती. रात्र असल्याने तर वादळ वाऱ्याची भीषणता अधिकच जाणवत होती. सुमारे १४ ते १६ तास वादळाचे हे तांडव झाले. या प्रसंगाबद्दल सांगताना एक दर्यावर्दी अभियंता श्री. भारती म्हणाले की, 'हे वादळ इतके भयाण होते की नशीब म्हणूनच आम्ही वाचलो; पण या पहिल्या टप्प्यातील भीषण वादळाने आम्हाला चांगलाच धाडसी अनुभव देऊन तयार केले. आमचा आत्मविश्वास या अनुभवाने शतपटीने वाढला.

भारतीय सेनादलाच्या सहा दर्यावर्दी अभियंत्यांनी लंडनमधील गॉसपोर्ट बंदर ते मुंबई असा ११२ दिवसांचा जलप्रवास साध्या शिडाच्या बोटीतून करण्याचा धाडसी पराक्रम नुकताच केला.

या बोटीचं नाव होतं 'तृष्णा'

आजपर्यंत अशा जलप्रवासाचं धाडस भारतीयांनी केलं नव्हतं. तृष्णेच्या या पराक्रमानं जलप्रवासाच्या क्षेत्रात भारताचं नावही आता अभिमानानं घेतलं जाईल.

या दर्यावर्दींचा पुढचा कार्यक्रम आहे जगप्रवास.

दर्यावर्दींनी काही दिवसांपूर्वी पुणे भेटीत सांगितलेले हे अनुभव.

---

या वादळातून सहीसलामत सुटून पुढील वाटचाल सुरू केली आणि पुढेही तेच ताट नशिबी वाढून ठेवलेले. पुढील तीन दिवसात 'तृष्णेला' तीन वादळाना तोंड द्यावे लागले. 'ही वादळ पहिल्या वादळाच्या मानाने विशेष भयप्रद वाटली नाहीत.' असे कॅप्टन चौधरी म्हणाले. या तीन वादळातील वाऱ्याचा वेग ताशी ४० मैल होता तर लाटा २५-३० फूट उंचीच्या उसळत होत्या. या वादळामध्ये नौका एका जागी स्थिर करणे हेच कौशल्य असते व त्यासाठी डेकवर दोघे जण वादळाचा मारा खातही शिड साभाळण्यासाठी ठेवावे लागतात असेही कॅप्टन चौधरीनी सागितले. अखेर ४९९ मैलाचा प्रवास सपवून तृष्णा स्पेनच्या ला-कोरना बंदरात दि. २० ऑक्टोबर रोजी सुखरूपपणे आली.

प्रवासास प्रारंभ केल्यानंतर दि. २० आक्टोबर रोजी पहिले सूर्यदर्शन झाले. त्यामुळे आजवरच्या गोठलेल्या उत्साहास चांगलाच जोर आला. प्रवासात खाऱ्या पाण्यामुळे स्नान करणे, कपडे धुणे अशक्यच असते. त्यामुळे या स्वच्छ सूर्यप्रकाशात सर्वांनी मनसोक्त अंघोळी करण्याचा आनद लुटला. अघोळीसारखी बाबही अनेक दिवस न केल्याने आज अशी काही आनदी वाटत होती की ते सुख शब्दात सागणे अशक्य आहे असे रेडिओमन भारती म्हणाले. वादळामुळे झालेली नौकेची मोडतोड व बिघाड दुरुस्त करून इंधन, पिण्याचे पाणी, धान्य असा पुरेसा साठा घेऊन 'तृष्णा' पुढील मुक्कामाच्या दिशेने झेपावली.

## गडद धुके


'ला-कोरना' बंदरातून निघून काही अतर प्रवास करतो ना करतो तोच सूर्यप्रकाश हळूहळू नष्ट झाला व इतके गडद धुके जमले की ३०-४० फुटावरीलही काही दिसेनासे झाले. वाऱ्याचा वेगही प्रचड वाढला व २०-३० फूट उंचीच्या लाटा तृष्णेवर येऊन आपटू लागल्या धुक्यामुळे काहीच दिसेनासे झाल्यामुळे तृष्णा मासेमारी करणाऱ्या जहाजावर आदळण्याचाच प्रसंग आला होता पण नशिब बलवत्तर ठरून ती वाचली होती. या प्रसंगाबद्दल बोलताना मे. ए पी. सिंग म्हणाले अनेक वादळातून आम्ही वाचलो आणि आता या बोट अपघातामुळे आपण संपतो की काय असा क्षणकाल विचार आमच्या मनात आला.

लिस्बन बंदर सोडून तृष्णाने जिब्राल्टर बदराकडे प्रस्थान केले, तोच पोर्तुगिज तटरक्षक पोलिसानी तृष्णेला अडविले व कागदपत्रे-परवाने-ओळखपत्र पाहण्यात बराच वेळ घालविला आणि शेवटी एका परवान्यासाठी पुन्हा बंदराकडे परत फिरावे लागले. यामध्ये सुमारे ८-१० तासाचा वेळ फुकट गेला. परवाना-ओळख न पटणे- सशय वाटणे यामुळे बऱ्याच ठिकाणी तटरक्षक पोलिसांचा त्रास होत असे व बराच वेळ फुकट जात असे. अर्थात त्या त्या देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने ते अवश्यकही होते.

लिस्बन ते जिब्राल्टर या दरम्यान पोलिसामुळे बराच वेळ गेला तसाच वेळ अत्यंत घाणेरड्या अशा हवामानामुळेही गेला. तृष्णेवरील सर्व दर्यावर्दी या टप्प्यात वाईट हवामानामुळे (सी सिकनेस) सामुद्रिक अशक्तपणा येऊन आजारी पडले. 'समुद्र प्रवासात अनेकाना अशा 'सी सिकनेसचा' आजार होत असतो पण आम्हाला आजवर न झालेल्या या आजाराने येथे गाठले व त्यामुळे आमच्या प्रवासाचा वेग-उत्साह थडावला. म्हणून आम्ही जिब्राल्टर येथे अपेक्षेपेक्षा खूप उशिरा पोहोचलो' असे कॅप्टन सिंग यानी सागितले.

जिब्राल्टर बंदरावर रॉयल नेवीच्या जवानानी व अधिकाऱ्यानी तृष्णेचे भव्य असे हार्दीक स्वागत केले या जवानाच्या मदतीने तृष्णेची सर्व दुरुस्ती करून मिळाली. जिब्राल्टरमधून रॉयल नेवीच्या जवानाचा पाहुणचार व निरोप घेऊन पुढे निघताच तृष्णेला पुन्हा एका जोरदार वादळाने गाठले. वादळ-वारे-प्रचड लाटा-गडद धुके यामध्ये भर पडली ती मुसळधार पावसाची. एकेक लाट अशी येई की तृष्णेचे कॉकपीट पाण्याने भरून जात असे.

अशाप्रकारे वादळ वारा, धुके, पाऊस अशा एका मागून एक व एकासमवेत एक येणाऱ्या सकटाशी दोन हात करण्याचे थ्रिल अनुभवत तृष्णेचा जलप्रवास चालू असतानाच दि. १३ नोव्हेंबर रोजी म्हणजे तब्बल एक महिन्यानतर पहिल्यांदाच तृष्णेवरील दर्यावर्दींच्या गळाला दोन मासे लागले. एक मासा २॥ पौंडाचा व दुसरा २ पौंडाचा होता. त्यामुळे तृष्णेवर एकच जल्लोष झाला आणि त्या माशाचा फ्राय व करी करण्यात येऊन प्रवासातील पहिली मेजवानी साजरी करण्यात आली. कारण वाईट हवामानामुळे व




आपल्या दोन मुलांत
तीन वर्षांचे अंतर ठेवा
निरोध
तांबी
गोळ्या
NIRODH
कोणतीहि पद्धत स्वीकारा
davp 84/225

वादळवारे पाऊस यामुळे फारशी भूक अशी लागतच नसे आणि बळेच खाल्ले तरी ते पचतही नसे. बऱ्याच वेळा दर्यावर्दी केवळ कॉफी सूप, बिस्किटे, ब्रेड खाऊन वेळ भागवत.

दि. २३ नोव्हेंबरला असाच एक भला मोठा मासा दर्यावर्दींच्या गळाला लागला. सर्वांना आनंद झाला. गेल्या मेजवानीचीही आठवण झाली. इतक्यात त्या माशाने जोरदार उडी मारली व सर्वांच्या हातून सुटून कॉकपीटमध्ये जाऊन आदळला आणि तेथून दुसरी उडी मारली व समुद्रात गायब झाला. हातचा मासा गेला आणि दर्यावर्दींची मेजवानीची स्वप्नंही वाऱ्यावर विरून गेली.

### आता जगप्रवास

फ्रान्समधील एका बंदरामध्ये तेथील अधिकाऱ्यांना समुद्रामध्ये अशी छोटीशी शिडाची नौका पाहून कुणीतरी लफंगे–स्मगलर असावेत असाच या दर्यावर्दींचा संशय आला. तेव्हा आम्ही भारतीय आहोत असे कळावे म्हणून शिडावर फ्रान्सच्या झेंड्याबरोबरच भारताचा तिरंगी झेंडाही फडकविण्यात आला; पण त्या तटवर्ती फ्रेंच अधिकाऱ्यांना तिरंगी झेंडाही माहीत नव्हता. अखेर अनेक खटाटोप करून रेडिओ साधनावरून संवाद करून 'तृष्णेला' बंदरामध्ये येण्यास परवानगी मिळवावी लागली.



तृष्णा

असे समज–गैरसमजाचे काही किरकोळ प्रसंग वगळता बाकी सर्वत्र या दर्यावर्दींचे चांगलेच स्वागत झाले. बऱ्याच ठिकाणी भारतीय रहिवासीही स्वागतासाठी आले.

### जगप्रवासाचा संकल्प


आजवर अशा प्रकारचा जलप्रवास करण्याचे धाडस कोणाही भारतीयाने केले नसल्याने तृष्णेच्या या यशस्वी प्रवासाने जलप्रवासाच्या जगतामध्ये आता भारतीय दर्यावर्दींचेही नाव अभिमानाने घेतले जाणार आहे. तृष्णेवरील दर्यावर्दी तरुणांनी आता जगप्रवास करण्याचा संकल्प केला असून येत्या सप्टेंबरमध्ये ते या प्रदीर्घ जलप्रवासास प्रारंभ करणार आहेत.

या जगप्रवासात 'तृष्णा' मॉरिशस–केप ऑफ गुड होप–सेंट हेलिना–बारबाडोज–रॉयल पोर्ट– पनामा कॅनॉल– गॅलपगुज बेट, टाहीटी,– ऑकलंड–सिडने थर्सडे बेट–जावा सिंगापूर–कोलंबो आणि परत मुंबई असा २५००० ते २८००० मैलांचा प्रवास करणार आहे. या प्रवासाला १ वर्ष ६ महिने इतका प्रदीर्घ कालावधी लागणार आहे. या जग प्रवासानंतर जलप्रवासाच्या क्षेत्रात भारतीय दर्यावर्दींचा पराक्रम सुवर्ण अक्षरात लिहिला जाईलच, त्याचबरोबर भारत हा कोणत्याही क्षेत्रात कमी नाही हेही सिद्ध होणार आहे. युवा दर्यावर्दींचा संकल्प सिद्धीस जावो हीच सदिच्छा. ☐

## तृष्णेचा जलमार्ग

| | बंदराचे नाव | आगमन | प्रस्थान | प्रवास मैल |
|---|---|---|---|---|
| १) | गॉसपोर्ट (लंडन) | – | प्रवासाचा शुभारंभ दि. १२ आक्टोबर ८४ | – |
| २) | अल्डरने | १३ आक्टो. | १४ आक्टो. | ९० |
| ३) | ला–कोरना (फ्रान्स) | २० आक्टो | २१ आक्टो. | ४९९ |
| ४) | लिसबॉन (पोर्तुगाल) | २६ आक्टो. | २८ आक्टो | ४१६ |
| ५) | जिब्राल्टर | १ नोव्हें. | ४ नोव्हें. | ३३५ |
| ६) | इबिझा | ७ नोव्हें. | १० नोव्हें. | ३५७ |
| ७) | माल्टाबेट | १७ नोव्हें. | १९ नोव्हें. | ६४९ |
| ८) | इराक्लो | २४ नोव्हें. | २५ नोव्हें. | ५७९ |
| ९) | निकोलस | २५ नोव्हें. | २५ नोव्हें. | ४४ |
| १०) | सौद पोर्ट (इजिप्त) | १ डिसें. | ७ डिसें. | ४५८ |
| ११) | स्युझ पोर्ट | ८ डिसें. | १० डिसें. | १०४ |
| १२) | सुदान पोर्ट | १५ डिसें. | १८ डिसें. | ७३४ |
| १३) | एडन (द. यमन) | ३० डिसें. | २ जाने. ८५ | ११३७ |
| १४) | सलालाह | १० जाने. | ११ जाने. | ६५३ |
| १५) | मस्कत (मध्य पूर्व) | १९ जाने. | २३ जाने. | ७०७ |
| १६) | मुंबई | १ फेब्रु. ८५ प्रवास पूर्ण. | | ७३८ |
| | | | | एकूण मैल– ७५०० |

# कार्यकर्ता




● मेधा टेंगशे ●

नारळ गाव आलं आणि एस. टी. थांबली. स्वत:चा तोल सावरत ती उभी राहिली; पण तिला आपली पेटी खाली उतरवणं जमेना. कंडक्टरने हातभार लावला. आणि तिने ती पेटी कशीबशी खाली घेतली.

खाली उतरल्या उतरल्या तिने इकडे पाहिलं. प्रकाश तिच्याच दिशेने चालत येत होता. तिच्याकडं पाहून तो कसनुसं हसला. पेटी हातात घेतली. दोघं चालायला लागले. विजया प्रकाशला न्याहाळत होती– किती वाळलाय हा .. ! खरं तर वाढीचं वय...

'आई, अप्पा कसे आहेत रे ?'

'बरे आहेत. ' प्रकाशचा तुटक स्वर.

तिनं त्याच्याकडं आश्चर्याने पाहिलं– असा वैतागलाय का हा ? आपण इतक्या दिवसांनी आलोय आणि...

'तुझ्या नोकरीचं कुठवर आलं ?'

'चाललंय ! इथं राहून कशी मिळणार नोकरी ?'

'दादासाहेबांनी खटपट केली तर... '

'ते लाख करतील; पण अप्पांनी तर शब्द टाकायला हवा. ' पुन्हा तोच कडवटपणा.

'अरे पण !'

'अक्का, त्यांचं म्हणणं मी जयंतरावां-बरोबर काम करावं. '

'मग ?'

'मग काय ? आपलं पोट भरणं मुश्कील आणि लष्कराच्या भाकऱ्या कोण भाजेल ?'

घर जवळ आलं. तिनं बोलणंच थांबवलं.

ती एखाद्या लहान मुलीसारखी घरात शिरली. अप्पा कुठे तरी जायच्या तयारीत दिसत होते. आई पदराला हात पुसत बाहेर आली. दोघी एकमेकींकडे डोळे भरून फक्त पाहात राहिल्या.

'अरे ! आलीस का ? कसा झाला प्रवास ? जावईबापू कसे आहेत ?'

तिनं उत्तरासाठी तोंड उघडलं आणि त्याच वेळी त्यांच्याकडे पाहिलं– ते चपला घालीत होते. ती एकदम गप्प झाली.

'अक्का ! अगं, निवडणूक अगदी जवळ आली. त्यामुळे अगदी गडबड सुरू झालीय. दादासाहेबांकडं जायचंय– यंदा जयंतराव उभे आहेत. पहिल्यांदाच निवडून यायला हवेत. तुझा मुक्काम आहेच ना...' एका दमात ते बोलले आणि तिच्या उत्तराची वाट न पाहाता ते घराबाहेर पडले.

विजयाला एकदम मरगळ आली. खरं तर यात नवीन काहीच नव्हतं; पण तरी तिचं मन क्षणात कोमेजलं. तिनं मान वळवली–

आई केव्हाच स्वयंपाकघराकडे वळली होती.

आईनं दिलेला चहा पिता, पिता ती स्वयंपाकघर निरखीत होती. अवकळा आलेली भांडी, मान टाकल्यासारखी पडलेली चूल, दोरीवर लोंबणारे जीर्ण कपडे...

तिला वाटलं, अप्पा, आईबरोबर घरही म्हातारं झालं.

'अक्का !' सुभाषची हाक.

ती भानावर आली.

'कसा आहेस ?' तिचा प्रश्न.

'मजेत. सध्या आपला भाव एकदम वधारलाय. इलेक्शन आलीय. जयंतराव उभे आहेत. आपण त्यांच्या प्रचारासाठी हिंडतोय गेले महिनाभर. जेवणाचा, प्रवासाचा खर्च त्यांचाच. शिवाय रोजी पंचवीस रुपये.' त्याचे डोळे लकाकत होते.

'त्या भपक्याला हा भुलला; पण नंतर कोण पोट भरणार आहे तुझं ? का बापा-सारखी आयुष्यभर नुसती हमाली करणार ?' आईचा भडका उडाला.

'मरू दे आई. जो तो आपल्या कर्मानं मरतो. ' प्रकाशचा संताप.

'तू गप. तुला तरी काय मिळालं 'नोकरी' 'नोकरी ' करून ? त्यापेक्षा जयंतराव निवडून आल्यावर कर्ज तरी मिळवून देतील मला...'

मग त्या दोघांची त्यावरून हमरी–तुमरी तिला पाहवेना. तिची मिनतवारी. सुभाष तरातरा बाहेर निघून गेला.

तिला येऊन आठ दिवस झाले होते· निवडणूक अगदी परवावर आल्याने गावात प्रचाराचा एकच गदारोळ. त्यांच्या घरा-समोरच्या पटांगणात सभा व्हायच्या. त्यामुळं इच्छा नसली तरी दोन्ही पार्टींकडची भाषणं तिच्या कानावर पडायची. जयंतरावांची सभा झाली की देशमुखांची व्हायची. दोघांच्या भाषणात मुद्दे तेच– गावात वीज आणि नळ आणण्याची तशीच गावातल्या बेकार तरु-

णांना लघुउद्योग काढून देणार असल्याची आश्वासनं...

तिला वाटलं, आपल्याला कळतंय तेव्हा-पासून हेच ऐकतोय आपण. कधी दादासाहेब निवडून आले कधी देशमुख. गाव मात्र खगतच गेलं. त्यात पुन्हा दादासाहेब आणि देशमुखाच्या पार्टीतल्या कोंबड्याच्या झुंजी-सारख्या मारामाऱ्या. मारामारीवरून तिला एकदम आठवलं–

अशाच एका मारामारीत अप्पाचा एक डोळा निकामी झाला होता...

तिला अप्पांची कमालीची चीड आली. जे आपल्याला कळतं ते अप्पांना कळू नये ?

आईचं आणि त्याचं तर यावरून रोजचं भांडण. तिला वाटायच, अप्पांनी आपली पोस्टमास्तरची नोकरी चागली मन लावून करावी, आपण बरं की, आपलं घर बरं असं राहाव; पण अप्पानी ते कधीच ऐकलं नाही. फार वाद व्हायला लागला की ते म्हणायचे–

'हे बघ, आपण फ्रीडम फाइटर आहोत. आपल्याला नाही अस शेळपटासारख नुस्त घरचाकरी जमणार !'

कटाळून शेवटी आईनं बोलणच सोडून दिल.

एका निवडणुकीत दादासाहेब पडले आणि देशमुख निवडून आले आणि त्यानी काय गडबड गोधळ केला कोण जाणे पण अप्पाची नोकरीच गेली; पण तेव्हापासून तर अप्पाना घरबदच राहिला नाही. ते आपले सारखे दादासाहेबाच्या घरीच असायचे.

कधी दादाच्या शेताला पाणी द्यायचं काम तर कधी शेतातला भाजीपाला विकायच काम, कधी, कधी तर दादासाहेबाचा कामाचा निरोप घेऊन जिल्हापरिषदेच्या सभापतीला भेटायच अस निरोपानिरोपीचं काम.

आशाच्या, दादासाहेबाच्या मुलीच्या लग्नात तर अप्पानी पाणक्यापासून सगळी काम केली होती...

प्रत्येक निवडणुकीत तर अप्पा सावली-सारखी दादासाहेबाना सोबत करायचे. त्याच्या पाण्याची बाटली सांभाळण, वेळ-प्रसगी त्यांना पथ्याचा स्वयंपाक करून घालणं सगळंच. वहिनी तर म्हणायच्या,

'अप्पा, तुम्ही आहात ना दादांबरोबर. मग मला काळजी नाही...'

मागच्या निवडणुकीत मात्र रात्री-अप-रात्री जागरणं झाल्यानं अप्पा आजारी पडले होते. त्यात पुन्हा नेहमीप्रमाणं दुखण्याकडं दुर्लक्ष केल्यान त्याचं दुखणं खोकल्यावरून दम्यावर गेलं होतं. अगदी उठवेनासं झालं तेव्हा मात्र अप्पा निमूटपणे घरी पडून राहिले त्यावेळी दादासाहेब त्याना पाहायला आले होते, म्हणाले,

'अरे अप्पा ! तू आजारी पडून कसं चालेल ? ...तू तर आघाडीचा वीर. लौकर बरा हो. अप्पा 'नाही' 'नाही' म्हणत होते तरी त्यांनी शंभर रुपयाची नोट त्याच्या हातात कोबली. पाठीवरून हात फिरवला. अप्पा केवढे सुखावले होते !

ते गेले आणि अप्पा आईला म्हणाले, 'बघ, एवढा बडा माणूस – आपल्याकडे आला चौकशी केली. तुला कशाचच काही नाही...'

आईही दादासाहेबाच्या वागण्यानं थोडी-फार सुखावली होती– म्हणाली,

'मी कुठे काय म्हणतेय ? पण तुमची अशी दशा का झाली–त्याच्यासाठी राबण्या-नंच ना ?'

'अगं, कष्ट कुणाला चुकलेत ?...'

'पण त्याच मोल मिळायला हव. आज एक त्यानी पैसे उचलून दिले; पण एरवी शेरभर जोंधळा, भाजीपाल्याच्या दोन जुड्या दिल्यानं भागतं का ?...'

अप्पा कधी नव्हे ते गप्प झाले होते.

पण थोडं बरं वाटल आणि पुन्हा अप्पानी स्वत.ला जुंपून घेतल आणि त्या निवडणुकीत दादासाहेब निवडून आले एवढंच नव्हे तर मंत्रीही झाले.

मग मधे दोन अडीच वर्षं दादासाहेब गावाकडे फारसे फिरकलेच नाहीत. आले तरी एका रात्रीत यायचे आणि जायचे. नाही-तर कार्यकर्त्यांच्या कोंडाळ्यात अडकून पड-लेले असायचे. शिकलेल्या उत्साही तरुण जोमाच्या त्या नवीन कार्यकर्त्यांपुढं अप्पा पार बुजून जायचे आणि आईन सांगूनही मग त्यांनी प्रकाश, सुभाषसाठी तोंड उघडलं नाही.

आता मात्र आईला निभवेना. त्यातच लष्कर भरतीसाठी गावात तरुण मुलांची तपासणी सुरू झाली. आई लगेच वहिनीकडे धावली. प्रकाशचं नाव तिनं त्याच्या काना-वर घातलं.

मधे दोन तीन महिने निघून गेले. दादा-साहेबाच्या पुतण्याचा नंबर लागला पण प्रकाशचा नंबर लागलाच नाही...

मग आहे त्यात भागेना म्हणून आई दादासाहेबांच्याकडं स्वयपाकाला लागली. एकदा सहज वहिनीनीच प्रकाशच्या नोक-रीचा विषय काढला.

दादासाहेब म्हणाले,

'अग, अप्पा घरचा माणूस. त्याला काय कमी पडणार ? बघू, त्याला कर्ज मिळवून देऊ म्हणजे तो बिझिनेस सुरू करेल.'

तेवढ्या शब्दानं आई सुखावली. तिनं प्रकाशला हे सागितल; पण त्याचा त्या शब्दावर भरवसाच नव्हता त्याचं आपलं एकच म्हणणं,

'अप्पानी शब्द खर्च करावा म्हणजे मगच दादासाहेब ऐकतील.'

सुभाष म्हणाला, 'आई, त्याला नको असेल तर राहिलं. मी घेतो...'

आणि मग अप्पाप्रमाण सुभाषनं जयंत-रावासाठी स्वतःला जुंपून घेतल.

आईनं तिला सागितलेल्या या लगळ्या गोष्टी तिला आठवत होत्या. तिच्या मनात आलं–

'खरंच ! दादासाहेबांपेक्षा जयतराव वेगळे असतील ?...'

जयंतराव प्रचड बहुमताने निवडून आले आणि त्यांची त्याच रात्री मिरवणूक काढ-ण्याचे ठरले.

अप्पाच्या दम्यानं पुन्हा उसळी मारली होती. त्यामुळं त्याना मिरवणुकीत सामील होता आल नव्हत ते अंथरुणावर तसेच तळ-मळत पडले होते. त्यांच्या उशा पायथ्याशी ती आणि आई बसल्या होत्या.

मिरवणूक हळूहळू त्याच्या घरापाशी आली. गलका वाढला. घोषणांचा जोर वाढला. त्यातील सुभाषचा खडा आवाज कानावर येऊन आदळला. अप्पाच्या चेहऱ्यावर समाधान पसरल पण एक क्षणभरच. नंतर तिला जवळ बोलवून ते म्हणाले,

''अक्का, सुभाषला साग, शहाणा हो. यात अडकू नको. तुझा बाप एक फसला तू फसू नकोस...'

आणि त्याचा आवाज एकदम थांबला... □

## पुस्तके

# मुघल-मराठा संघर्षाची रोमांचकारी हकिकत

मुघल–मराठा संघर्षाविषयी आजवर विपुल असं संशोधित आणि विवेचनात्मक साहित्य प्रसिद्ध झालं आहे. अनेक भाषात ते आहे. त्यामुळे या संघर्षाविषयी आता नव्याने काही लिहिण्यासारखं नाही असा कित्येक जाणकारांचा समज आहे. पण अप्रकाशित आणि प्रकाशित संशोधित साहित्याच्या आधारे अजूनही या विषयाची व्याप्ती,खोली नि जटिलता केवढी आहे याची कल्पना आणून देणारा एक इंग्रजी ग्रंथ नुकताच माझ्या वाचनात आला आणि मला संघर्षाचे एक नवेच, किंबहुना नेमके दर्शन घडले. या ग्रंथाचे लेखक आहेत डेक्कन कॉलेजमधील व्यासंगी प्राध्यापक डॉ. जी. टी. कुलकर्णी, आणि त्यांच्या ग्रंथाचे नाव आहे **' द मुघल–मराठा रिलेशन्स-ट्वेंटीफाइव फेटफुल इयर्स (१६८२–१७०७)**

खर्ड्याच्या लढाईतील विजयाचे परखड, नेमके फलित विशद करणारा ' बॅटल ऑफ खर्डा ' नामक एक ग्रंथ १९८० साली प्रो. कुलकर्णी यांनी लिहिलेला आहे. तो वाचून ' लढाई जिंकली, पण तहात हरलो ' अशी धक्कादायक प्रचीती येते, इतकेच नव्हे तर नाना फडणिसाच्या मुत्सद्देगिरीविषयीही संभ्रम निर्माण होतो. प्रो. कुलकर्णी यांचा मुघल–मराठा संबंधाविषयीचा नवा ग्रंथ ऐतिहासिक घटना आणि व्यक्तींविषयक अनेक बऱ्यावाईट समजांना असाच धक्का देणारा आणि म्हणून नवी दृष्टी देणारा आहे. औरंगजेब, शिवाजी, संभाजी, राजाराम आणि काही प्रमाणात ताराबाई यांच्या व्यक्तित्वाचे आणि कर्तृत्वाचे वस्तुनिष्ठ आकलन होण्यासाठी, विशेषतः ज्या काळात या राज्यकर्त्यांच्या कर्तृत्वाची कसोटी लागली ती राजकीय कालस्थिती समजण्यासाठी प्रस्तुत ग्रंथ अतिशय उपयुक्त ठरणारा आहे. ज्यांना औरंगजेब आणि संभाजी या दोन वादग्रस्त व्यक्ती सत्यस्वरूपात जाणून घ्यायच्या असतील, तसेच एकूण मुघल–मराठा संघर्षामागील प्रेरणा नि त्या संघर्षाची व्याप्ती समजून घ्यायची असेल त्यांनी हा ग्रंथ अवश्य वाचावा. संभाजी वधोत्तर पंधरा सोळा वर्षाच्या काळात औरंगजेबाच्या पाशवी सामर्थ्याविरुद्ध मराठे खऱ्याखुऱ्या अर्थाने जे गनिमी लोकयुद्ध खेळले त्या युद्धाचे अतिशय तपशिलवार, उठावदार आणि प्रेरक चित्रण कुलकर्णी यांनी केले आहे आणि माझ्या मते तोच त्यांच्या ग्रंथाचा गाभा आहे. या ग्रंथाचा मराठी अनुवाद कधी होईल, न होईल, म्हणून मी फक्त त्याचा वेचक परिचय करून देतो.

ग्रंथाचे नाव ' मुघल–मराठा संबंध ' असे असले तरी विवेचनासाठी ग्रंथकाराने जो १६८२ ते १७०७ हा संघर्षमय काळ निवडला आहे तो ध्यानी घेता ' संबंध ' ऐवजी ' संघर्ष ' हा शब्द अधिक अर्थपूर्ण ठरतो. ग्रंथ पाच प्रकरणात विभागला असून शेवटी निवडक संदर्भ साहित्य आणि सूची दिलेली आहे. संदर्भसाहित्यात समकालीन अप्रकाशित पर्शियन कागदपत्रांचा जो निर्देश आहे तो विशेष महत्त्वाचा आहे. त्यामुळे बिकानेर सावंतवाडी आणि नेरली (बेळगाव) या तीन ठिकाणच्या कागदपत्रांच्या आधारे डॉ. कुलकर्णी यांना पूर्वसूरींपेक्षा पुष्कळ नवीन माहिती सांगता आली आहे. ग्रंथारंभी दोन भागात ३२ पृष्ठांची प्रस्तावना आहे. मुघल-मराठा संघर्षाची पार्श्वभूमी म्हणून ती निश्चितच पूरक ठरणारी आहे. १६८२–१७०७ या कालखंडाचा नव्याने अभ्यास करणे ही ग्रंथकाराची भूमिका असून ती वठवण्यात त्याने अभ्यासाची कसलीही कसूर केली नाही हे स्पष्ट जाणवते. मुघलांच्या, विशेषतः औरंगजेबाच्या राज्यविस्तारामागे, इस्लाम धर्माचा प्रसार हेच मुख्य धोरण होते. हे डॉ. कुलकर्णी यांनी जसे साधार स्पष्ट केले आहे, तसेच राजारामकालीन स्वातंत्र्य-लढ्याच्या मागे महाराष्ट्र धर्म आणि स्वराज्य यांचे रक्षण करण्याची प्रेरणा होती हेही त्यांनी ठामपणे सांगून टाकले आहे. त्यांच्या ग्रंथातील मुख्य संघर्षविषय १६८२–१७०७ काळातला असला तरी मुघली आक्रमणाचा मागोवा त्यांनी अगदी थेट सिंधवरील अरबांच्या टोळधाडीपर्यंत, म्हणजे सातव्या–आठव्या शतकापर्यंत घेतला आहे. मुस्लिम आक्रमणाचे नि राज्यविस्ताराचे उद्दिष्ट जगाचे इस्लामीकरण करणे आणि तेही शस्त्राच्या जोरावर करणे असे होते.

हे सांगण्यास डॉ. कुलकर्णी सांप्रतकाळी बिलकूल कचरले नाहीत, हे नवलच आहे. औरंगजेब आणि संभाजी या दोघांच्या स्वभावाचे नि कर्तृत्वाचे त्यांनी निर्भीडपणे केलेले आलोचन उभयतांच्या भाबड्या अभिमान्यांच्या डोळ्यात चरचरीत अंजन घालील असे आहे. या दृष्टीने थोडा तपशील दिला तर उद्बोधन होईल.

उत्तरेतील आपलं साम्राज्य निर्विघ्न करून औरंगजेब बलाढ्य सेनेसह दक्षिण भारतात उतरला तेव्हा त्याची साठी उलटलेली होती. कट्टर सुन्नीपंथी शासक म्हणून त्याची ख्याती होती. तो स्वतःला अल्लाचा प्रतिनिधी म्हणवून घेई. आसेतुहिमाचल भारताला इस्लामची दीक्षा देणे आणि इस्लामी–जगताचा एकमेव पातशहा बनणे अशी त्याची प्रतिज्ञा होती. इस्लामखेरीज इतर धर्म तो तुच्छ लेखी. भारतातील बहुसंख्य हिंदूप्रजेला तो किती असहिष्णु वृत्तीने वागवत असे याची अनेक उदाहरणे डॉ. कुलकर्णी यांनी दरबारी कागदपत्रांच्या आधारे दिली आहेत. सारे तपशील न देता एवढे सांगितले म्हणजे पुरे की, औरंगजेबाच्या कारकिर्दीत हिंदूप्रजेला जिझीया कराचा पराकोटीचा जाच होत होता, अनेक देवदेवतांची मंदिरे उध्वस्त होऊन तिथे मशिदी उभारल्या गेल्या, सक्तीच्या धर्मांतराचे प्रकार सर्रास होत होते, फारकाय गोवधासही उत्तेजन मिळत होते आणि ही सारी कृत्ये सरकारी हुकमाने होत होती. उदेपूर आणि चितोडमधील काही प्रकार तर खुद्द औरंगजेबाच्या साक्षीने घडल्याची नोंद डॉ. कुलकर्णी यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात देवळे पाडण्यासाठी पातशहाने एका खास अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. हिंदू राजघराण्यातील उपवर कन्या दबाव आणून वा जबरदस्ती करून बाटवायच्या व त्यांचे आपल्या सरदारांशी निके लावायचे असली दुष्कृत्येही पातशहाने केली. त्याच्या कारकिर्दीत शेकडो मराठे, ब्राह्मण बाटले जावेत यात नवल नाही; पण

संभाजीच्या 'क्रूर वधानंतर त्याची आणि राजारामाची मुलगी बाटवून त्यांची मुसलमानाशी लग्ने लावली गेली हे आज किती जणांना ठाऊक आहे ? औरंगजेबाच्या आधीचे पातशहा इस्लामचे प्रचारक नव्हते असे नाही. होतेच; पण त्यांनी हिंदूप्रजेची औरंगजेबाप्रमाणे सर्व बाजूने छळणूक केली नाही. औरंगजेब उत्तम प्रशासक आणि मुत्सद्दी होता; पण त्याची धर्मांधता आणि राज्यतृष्णा अतिरेकी असल्यामुळे उत्तरेत जाट, शीख आणि राजपूत त्याचेविरुद्ध उठले, तर दक्षिणेत तो आल्यावर मराठ्यानी त्याच्याशी चिवट झुंज देऊन त्याचे सारे विजय निष्फळ करून सोडले.

डॉ. कुलकर्णी यांनी पहिल्या दोन प्रकरणात शिवाजी, संभाजी आणि राजाराम या तीन छत्रपतीनी औरंगजेबाशी कशी टक्कर दिली आणि आपल राज्य, इतकेच नव्हे तर महाराष्ट्र धर्म राखण्याचा कसा यत्न केला त्याची सविस्तर हकिकत दिली आहे. मराठ्यांच्या स्वराज्य स्थापनेमागचे नेमके हेतु काय, हे राज्य कोणाचे, कोणासाठी, त्याचे स्वरूप नि व्याप्ती कोणती आणि मुघल पातशाहीशी राजकीय पातळीवरचे मराठ्याचे धोरण कोणते-इत्यादी प्रश्नांची नव्याने चर्चा करून डॉ. कुलकर्णी यानी जे महत्त्वाचे निष्कर्ष (माझ्यामते) काढले आहेत ते असे-

मराठ्याचे स्वतंत्र, सार्वभौम राज्य असावे अशी छ. शिवाजीखेरीज नंतरच्या एकाही राज्यकर्त्याची भावना नव्हती. उलट मुघल साम्राज्यातर्गत एक जास्तीत जास्त स्वायत्त राज्य अशीच भूमिका शिवाजीचे सारे उत्तराधिकारी (मराठे आणि पेशवे) वठवीत होते. आग्रा भेटीप्रसगी औरंगजेब शिवाजीचा योग्य तो मान राखता तर भावी काळात त्याचे वर्तन नेमके कसे घडले असते हे सागणे कठीण आहे.

मराठ्यानी खऱ्याखुऱ्या अर्थाने स्वातंत्र्यलढा दिला तो राजारामाच्या संकटमय कारकिर्दीत आणि त्याच्या अकाली मृत्यूनंतरच्या ४/५ वर्षातच होय असा डॉ. कुलकर्णी याच्या विवेचनातून निष्कर्ष निघतो. या लढ्याचे वा लोकयुद्धाचे मानकरी संताजी घोरपडे, धनाजी जाधव, नेताजी शिंदे, परसोजी भोसले इ.रणशूर मराठे होते. त्याचप्रमाणे रामचंद्रपंत, शंकराजीपंत, प्रल्हाद निराजी इत्यादी ब्राह्मण प्रभु मुत्सद्दीही होते हे विसरून चालणार नाही. छ. राजारामाने या सर्व शूर नि मुत्सद्दी लोकाचा जातीचा विचार न करता स्वातंत्र्यलढ्यात उपयोग करून घेतला, इतकेच नव्हे तर त्याच्या कर्तृत्वाला भरपूर वाव दिला. डॉ. कुलकर्णी याच्या ग्रंथाधारे राजाराम हा राज्यरक्षणाचे कामी संभाजीपेक्षा अधिक रत्नपारखी, मुत्सद्दी आणि धीरगंभीर होता असा आणखी एक निष्कर्ष निघतो.

औरंगजेबाप्रमाणे छ. संभाजीच्या एकूण कर्तृत्वाचा आलेख डॉ. कुलकर्णी यांनी निर्विकारमनाने काढला आहे. वा. सी. बेंद्रे आणि कमल गोखले यांच्यापेक्षा डॉ. कुलकर्णी याचा संभाजी त्याच्या गुणदोषासह अधिक वास्तव वाटतो. कै शेजवळकर यांच्या संभाजीविषयक आकलनाशी डॉ. कुलकर्णी यांचे बहुतांशी साम्य आहे. तथापि कुलकर्णी अधिक निर्विकार आहेत हेही जाणवते.

सगमेश्वराला मुघलांनी संभाजीवर कोणत्या अवस्थेत छापा घातला, पुढे त्याची नि कलूषाची धिंड काढून कोरेगाव-वढू मुक्कामी त्यांचा कसा अमानुष छळ केला आणि मरणोत्तर त्याच्या देहाची कशी विटंबना केली-ही सर्व हकिकत रक्त तापवणारी आहे. औरंगजेबाची 'शहेनशहा' ही प्रतिमा आकर्षक वाटणाऱ्यानी डॉ. कुलकर्णी याच्या ग्रथातील एतदविषयक सर्व हकिकत अवश्य वाचावी. संभाजीच्या वधानंतर मराठ्यांची स्वातंत्र्यलक्ष्मी जिंजी-वेलोरकडे वनवासी झाली आणि मुघली अमल स्थिर झाला अशी काही काळ स्थिती झाली होती. पण औरंगजेबाला लवकरच 'बचेंगे तो और भी लढेंगे या मऱ्हाटी बाण्याचा अनुभव येत गेला. 'But all was not over, the Marathas had only Lost a battle and not the war' अशा स्फुरणदायी शब्दात ग्रथकाराने या अवस्थेचे वर्णन केले आहे. राजारामाचे माघारी १७०० ते १७०७ या सहा-सात वर्षात मराठ्यानी खऱ्या लोकयुद्धाला साजेल असा धर्मराज्याचा जो लढा दिला त्यामुळे प्राय: सर्व किल्ले हाती येऊनही औरंगजेबाला विजयाचा आनद क्षणभरही मिळाला नाही. उलट निराशेने आणि वार्धक्याने तो २१ फेब्रुवारी १७०७ रोजी ८९ व्या वर्षी अहमदनगर नजीक पैगंबरवासी झाला. आजवर २० फेब्रुवारी ही औरंगजेबाची मृत्यूतारीख इतिहासकार मानीत आले. जदुनाथांसारखे फारसीचे अभ्यासक सुद्धा; पण डॉ. कुलकर्णी यांनी २१ फेब्रुवारी शुक्रवार (मुसलमानांचा शुभवार) ही मृत्यूतारीख चिकित्सकपणे अभ्यासून प्रकाशात आणली आहे. मुघल-मराठा संबधाचे स्वरुप हे एकूणत: सघर्षाचेच होते, औरंगजेबाच्या कारकिर्दीत त्याला भीषण रूप आले आणि त्याच्या मृत्यूमुळे हा सघर्ष 'नादा-नांदू द्या' या तत्त्वाकडे झुकून मराठे प्रबल, आक्रमक बनले हे डॉ. कुलकर्णी याच्या ग्रंथामुळे अधिक स्पष्ट होते यात शका नाही.

—म. श्री. दीक्षित

द मुगल-मराठा रिलेशन्स : ट्वेंटी फाईव्ह फेटफुल इयर्स
(१६८२-१७०७)
जि. टी. कुलकर्णी
१२५/- रु.

## साबरमती ते साबरमती

श्री. शांतिलाल भंडारी यांचे या आधीचे काश्मीरचे प्रवासवर्णन 'सी यू अगेन' काश्मीर प्रवासाचा सुखद अनुभव देऊन गेले. 'साबरमती ते साबरमती' या प्रवासवर्णनात श्री. भंडारी यांनी गुर्जरभूमीचे, विशेषत: कच्छ विभागाचे जे दर्शन घडवले आहे, ते अतिशय विलोभनीय आहे खरे तर याला केवळ प्रवासवर्णन म्हणणेही अनुचित ठरावे. कारण गुजरातची भूमी, माणसे, त्यांचा स्वभाव, लोकरीती, समाज, इतिहास, पौराणिक संदर्भ, भाषा यांचे इतके प्रत्ययकारी आणि जिवंत संदर्भ ठिकठिकाणी विखुरले आहेत की, एखादे मदिर किंवा स्थळ केवळ वर्णनातूनही साक्षात् गोचर होते.

गुर्जरभूमी ही तीर्थांची भूमी ! कच्छ, सौराष्ट्र, काठेवाड आणि गुजरात अशा चार विभागांनी मिळून बनलेला 'महागुजरात' राज्यात असंख्य जैन तीर्थे आहेत आणि वैदिक तीर्थेही जागोजागी विखुरलेली आहेत. ही 'तीर्थयात्रा' श्री. भंडारी यांनी अमूल्य माहिती देत देत अशी घडवली आहे की, हा

प्रदीर्घ प्रवास केव्हा संपतो ते लक्षातही येत नाही. या गुजरात दर्शनात गुजरात राज्याची औद्योगिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी अंगेही स्पष्ट होतात. कला आणि सस्कृतीत प्रगत अशा आधुनिक गुजरातची वैचारिक बैठक लेखकाने व्यवस्थित माडली आहे.

गुर्जरभूमी ही अनेक अर्थांनी समृद्ध भूमी. श्रीचक्रधरस्वामीपासून नरसी मेहता, महात्मा गाधीपर्यंत अनेक रत्ने तिने भारताला दिली. श्रीकृष्णाची द्वारका, गिरनार पर्वत अशीही आकर्षणे आहेतच; पण असख्य तीर्थक्षेत्रानी या भूमीला अक्षरश पावन केले आहे.

त्यापैकी अतिशय प्रेक्षणीय असे शंखेश्वर पार्श्वनाथाचे मदिर. याच ठिकाणी श्रीकृष्ण आणि जरासधाचे युद्ध झाले होते. इथल्या मदिरात जैनाचे पहिले तीर्थंकर ऋषभदेव भगवान याची जी मूर्ती आहे, ती एका कुभाराला जमिनीत पुरलेली अशी सापडली. महमूद गझनीची स्वारी झाली असताना अनेकानी अनेक प्रतिमा लपवून ठेवल्या, त्यापैकीच ही असावी. श्रीकृष्णाने तिची प्रतिष्ठापना केली असे म्हणतात. एकेका जैन मदिराचे दर्शन घडवत असताना श्री. भंडारी त्यामागे असलेला सगळा इतिहास आणि पौराणिक सदर्भ स्पष्ट करतात त्यामुळे कुठेही माहिती अपुरी राहत नाही. प्रवासवर्णनाची शैली एखाद्या निवेदकाची आहे. दर्शकाना बरोबर घेऊन प्रत्येक तीर्थाचे ते धावते वर्णन प्रत्यक्ष करत जातात. त्यामुळे हे एक प्रकारचे 'थेट प्रक्षेपण' वाटते. वर्णनात वेळोवेळी गुजराती खाद्य पदार्थ, गुजराती बसेस, राजकारण, जागतिक राजकारणावर एखादा मार्मिक शेरा, मध्येच इग्रजी किंवा मराठी साहित्यातील चपखल अवतरण यांचे सारखे उल्लेख येत राहतात. त्यामुळे एखाद्या गप्पिष्ट, जॉली मित्राबरोबर आपण सहप्रवास करत आहोत असा अनुभव येतो. त्यातून लेखकाची सूक्ष्म निरीक्षण शक्ती, त्याचे चौफेर वाचन आणि ज्ञान आणि मिळालेल्या माहितीतून स्वत:चे मन स्वत: बनवण्याची प्रकृती दिसते. प्रवासवर्णन हे किती वस्तुनिष्ठ असावे, लेखकाने त्यात स्वत:च्या प्रतिक्रियांना त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात किती प्रमाणात आणावे त्यामुळे वाचकाच्या स्थलदर्शनात अडथळा येतो की ते जास्त प्रत्ययकारी होते हा वादाचा विषय ठरू शकेल. कारण हे सर्व मुद्दे या पुस्तकात प्रकर्षाने उपस्थित आहेत. काहीना क्रिकेटच्या खेळापेक्षा कॉमेन्ट्रीच जास्त असाही प्रकार वाटण्याची शक्यता आहे.

एक मात्र खरे की, 'सी यू अगेन' काय किंवा हे प्रवासवर्णन काय, निर्जीव स्थलाच्या केवळ वर्णनात्मक पातळीवर थांबत नाही तर त्या त्या वर्ण्य स्थळाला जिवत व्यक्ती मानून त्याचा जणू मागोवा घेते. मदिराचे बाधकाम, रचना, स्थापत्य या बाह्य गोष्टीचा परिचय करून देण्याबरोबरच श्री भडारी दगडामागचा मानवी सदर्भ शोधतात. ज्या ठिकाणी अधिक सशोधनाची गरज आहे, तिथे त्याप्रमाणे आवर्जून नोद करतात.

निवेदनाच्या ओघात जैनाची व्रते, पत्रकारिता, श्रमण सस्कृती, जैन तत्त्वज्ञान, त्याचे आचार विचार, भारतातील पोटजाती, श्रद्धा आणि अधश्रद्धा आर्यांचे मूळस्थान, शब्दाच्या कुळकथा, कालगणना असे अनेक विषय हजेरी लावून जातात. पुष्कळदा त्याची उपस्थिती जाचक वाटते. माहितीपूर्ण असले तरी ते इतके होतात की, यापैकी प्रत्येकावर स्वतंत्र पुस्तकच असायला हवे या विचाराने ही विषयातराची पाने उलटून पुढे जाण्याची नकळत प्रवृत्ती होते. तसेच श्रीकृष्ण आणि जैन यांचा जवळचा सबंध दाखवण्याचा जो प्रयत्न झाला आहे, (दतकथांमधूनही त्याला पुष्टी मिळाली आहे) तो मात्र पटत नाही.

शखेश्वर परिसरातच अनेक जैन मदिरे आहेत. तसेच जगडू शहाच्या खडहरातही आहेत. जगडू शहा या निर्लोभी समाजसेवकाने आपल्या ह्यातीत अनेक मंदिरे बाधली, पण खुद्द त्याच्या वाड्याची मात्र पडझड झाली आहे. या खंडहरातच श्री भद्रेश्वरासारखी पवित्र मदिरे आहेत. भूजपूर गावातले 'मुछाला महावीर' या नावाने ओळखले जाणारे भव्य जैनमंदिर, माडवी शहराजवळील 'जैनाश्रम' या वसाहतीतील शातिनाथ मदिर, जखौ गावाजवळची रत्न–टुक–म्हणजे नऊ मंदिराची वाडी अशा अनेक मंदिराच्या दर्शनाबरोबरच, जुनागढ कच्छचे रण, कथापुराणातील चार पवित्र सरोवरांपैकी असलेले नारायण सरोवर, ऐतिहासिक 'जेसल–तोरल' या जोडप्याची समाधी, श्रीकृष्णाची द्वारका, 'दाडीयात्रा' जिथून सुरू झाली तो साबरमती आश्रम, गाधीजीचे 'पोरबदर', सिंहाची ऐट असलेला गिरनार पर्वत याची वर्णने अपेक्षापूर्तीचे समाधान देतात. कारण गुजरात म्हटल्याबरोबर काही गोष्टी चटकन आठवतात त्याचे कुतूहल अधिक.

## मनोहारी प्रवास

गुजरात आपल्याला अगदी जवळचा वाटतो. आपले अगदी शेजारी राज्य भाषा तर थोड्याशा परिचयाने सहज समजू शकणारी. महाराष्ट्रात असख्य गुजराती विखुरलेले. मुबई अर्धी अधिक त्याचीच द्वैभाषिक राज्याच्या वेळी असलेल्या अद्वैताचे सयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनतर द्वैत झाले असले तरी गुजराती माणूस फार परका वाटत नाही. मुबलक दूध–दुभते, उत्तम भुईमुगाची भरपूर पैदास, सुती कापड निर्मितीतली आघाडी, उद्योगधद्याना पूरक आणि प्रोत्साहक असे शासकीय धोरण, एकूण राजकीय स्थैर्य, सप–दगलीपासून अलिप्त असे शात वातावरण, मवाळ स्वभावाचे लोक, रगभूमीची प्रगती अशा अनेक कारणांसाठी गुजरात हे राज्य लक्षणीय म्हणावे लागेल. अशा राज्याचे जैन मदिराच्या निमित्ताने पण समग्र दर्शन श्री. भंडारी यानी घडवले आहे. पारशी लोकानीही गुजरातला बरेच दिले. गुजरातेत जे राखीव जागाविरोधी तीव्र आदोलन झाले होते, त्याचा अपवाद वगळता गुजरात सोशिक आणि सोज्वळ म्हणायला हवा. आता शाततेच्या वातावरणात औद्योगिक प्रगतीही झपाट्याने होते आहे. गुजरात्याचा पिंड आता केवळ बनियाचा राहिला नसून तो आता कारखानदाराचा होऊ लागला आहे. असे हे आधुनिक गुजरातचे चित्र आहे.

इतर राज्याप्रमाणेच याही राज्यावर अनेक मुगल स्वाऱ्या झाल्या. त्याच्याशी सघर्ष करत अनेक घराण्यानी तिथे राज्य केले. त्यापैकी सौराष्ट्रचे चुडासामा घराणे, कच्छचे जाडेजा घराणे, जामनगरचे जाम घराणे, चालुक्य घराणे अशी काही नावे सांगता येतील. या घराण्याचे काही अवशेष अद्यापही शिल्लक आहेत. 'लाखोटा तालाब' आणि 'भुजिया कोठा' ही स्थळे प्रेक्षणीय. 'लाखोटा तालाब'च्या मध्यभागी जामनगरच्या पहिल्या महाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. तसेच पचधातूचा तयार केलेला महाराजा रणजित-

सिंह यांचाही एक पुतळा आहे. 'भुजिया कोठा' हा कच्छ भूज आणि जामनगर याना जोडणारा प्रचंड लांबीचा भुयारी मार्ग आहे, पण तो काळाच्या उदरात गडप झाला आहे. त्याचा केवळ उल्लेख इतिहासात येतो. अशा अनेक गमावलेल्या ऐतिहासिक वास्तूबद्दल हळहळ वाटते.

द्वारका आणि द्वारकाधीशाच्या मदिराचे वर्णन करताना श्री. भंडारी यांची लेखणी फार रसाळ झाली आहे. श्रीकृष्ण हे व्यक्तिमत्त्वच भल्याभल्यांच्या लेखणीला पाझर फोडणारे तेव्हा श्री. भडारी त्याला अपवाद कसे होतील ? द्वारकेचा गर्ग संहितेत आलेला इतिहासही त्यांनी सांगितला आहे. या द्वारकेचे मूळ नाव 'कुशस्थली'. पाण्याने वेढलेले सुखरूप, कुशल असे स्थळ म्हणून हे नाव त्याला पडले असावे असे श्री. भडारी याना वाटते. वैदिकांच्या चार पीठांपैकी द्वारकेचे शारदा हे मूळपीठ.

मीठापूर इथली टाटांच्या मिठाच्या उत्पादनांची फॅक्टरीही पहाण्यासारखी. मिठाचा सत्याग्रह सहजी आठवणारच. पोरबंदर म्हणजे सुदामपुरी, पर्यायाने मित्रप्रेमाची गंगोत्रीच ! पोरबदर, साबरमती, चपारण्य आणि सेवाग्राम ही चार गाधीपीठे. त्यात पोरबदर हे मूळपीठ. त्याचे वर्णन करताना श्री. भडारी याची गाधीश्रद्धा काव्यफुले उधळते. त्याना पोरबंदर हे कीर्तीमंदिर वाटते. चारही गाधीपीठे ही राजकीय विद्युत् केंद्रे वाटतात. प्रभास पाटण इथले सोमनाथमदिर अतिशय प्रसिद्ध. या मदिरात शिवलिंग कोणी आणले याबद्दल अनेक आख्यायिका आहेत. स्कद पुराणात सोम या चंद्रदेवाने ब्रह्माच्या अनुग्रहाने हे मदिर बांधले अशी कथा आहे. या मदिराची पाच वेळा बांधणी झाली असे सागतात. चद्रदेवाने सोन्याने, रावणाने रूप्याने, श्रीकृष्णाने काष्ठाने, चालुक्य राजा भीमदेव याने लाल दगडाने आणि त्याचा मुलगा कुमारपाल याने पुन्हा लाल दगडाने हे मदिर बाधले. अरब, मुगल अशा अनेकांच्या स्वाऱ्यामध्ये या मदिराचा वेळोवेळी विध्वस झाला आणि ते पुन: पुन्हा उभारले गेले. सोमनाथ पाटण हे प्रभास पाटण, देव पाटण, चद्रप्रभास पाटण अशा अनेक नावानी ओळखले जाते. इथून पधरा कि. मी. अंतरावर 'प्राची' हे क्षेत्र आहे. याचे पूर्वीचे नाव ब्रह्मावर्तक्षेत्र इथे श्रीकृष्णाचे साडेपाच हजार वर्षांपूर्वीचे मंदिर आहे. या स्थानाचा हजारो वर्षांपूर्वीचा अतिप्राचीन इतिहास आहे. इथून पुढे तीस कि. मी. अतरावर दीव बेट आहे. या बेटावर श्वेतांबर जैनांचे मदिर आहे. गुजरातवर जैन धर्माचा विशेष प्रभाव आहे जागोजागी जैनांची अक्षरश: असंख्य मदिरे आढळतात. जैन धर्माचा इथे प्रचार का आणि कसा झाला, प्रभाव कसा पडत गेला, ते श्री. भंडारी यांनी चांगल्या तऱ्हेने स्पष्ट केले आहे. जैन मंदिरांची प्राचीनताही ( काही मंदिरे हजारो वर्षांपूर्वीची आहेत ) त्यांनी इतिहास आणि पुराव्यांच्या आधारे सांगून अधिक सशोधनाची गरजही प्रतिपादन केली आहे. या मंदिरांचा अनेकदा जीर्णोद्धार झाल्याने ती नवीन वाटतात.

'गिरनार' हे गुजरातचे वैभवच. या पर्वताशी चारुगात्री, लावण्यखनी राजमती, कृष्णवेडी मीरा, पार्वती, यादव कुळातील पाच हजार क्षत्रिय याच्या कथा सबद्ध आहेत. 'गिरनार' चे अनेक अर्थ आहेत. माणसांची वर्दळ असलेला पर्वत, जंगलाच्या काठावरचा पर्वत, ( नार म्हणजे काठ ) समुद्रकिनाऱ्यालगतचा पर्वत वगैरे. इथे अभयारण्यही आहे. शिखरावर श्री. नेमिनाथाचे मंदिर आहे. हे जैनांचे शाश्वत तीर्थ आहे. त्याला सात हजार पायऱ्या आहेत ! एकेक पायरी फूटभर उंचीची ! आसपासच्या पाच पर्वत शिखरांवर मंदिरे आहेत. त्यांना टुंक म्हणतात. टुक म्हणजे शिखरावरील मंदिरकोट. गिरनार ही पाचवी टुक. बाकीच्या शत्रुजयगिरी, तालध्वजगिरी, कदबगिरी, हस्तगिरी या नावाने ओळखल्या जातात. त्याची प्रदक्षिणा पूर्ण करणे हे महान् पुण्यकर्म मानले जाते.

गुर्जरभूमी अतिशय सुपीक. 'गुजरात सोनेरी टुकडा' म्हणून जो गहू आपण घेतो तो गोंडल परिसरात पिकतो. मैलो न् मैल पसरलेली गव्हाची हिरवीगार शेते, सोनसळी दाणे घेऊन सोनेरी होऊन डुलतात तेव्हा निसर्गाचा रंगपालट दृष्टी खिळवून ठेवतो. शरीरात काळीज असावे तसे गुजरातेत हा गोंडल ! तो खरोखरी 'गोडस' या नावानेच अधिक शोभेल असे श्री. भंडारी रसिकतेने सुचवतात.

श्री. भंडारी यानी गुर्जरभूमीतून घडवून आणलेला प्रवास मनोहारी वाटतो तो त्यांचे संदर्भ स्वतंत्र आणि स्वत:चे आहेत म्हणून. शेवटी त्यानी या प्रवासाचा साधा जीवनाच्या प्रदीर्घ प्रवासाशी जोडला आहे. त्या प्रवासात जो प्रवासी आहे, आतमा, त्याच्या प्रक्षालनासाठी जैन मंदिराची शुची केंद्रे त्यांना आवश्यकच वाटली असल्यास नवल नाही. ◻

साबरमती ते साबरमती
शातिलाल भडारी
चिरायू प्रकाशन
पृष्ठे : ५६०
किंमत : शभर रुपये.

---

## विभूती

साईबाबाचे भक्त, अनुयायी आज जगभर पसरले आहेत. त्याचे विभूतीमत्वही मान्यता पावले आहे; परंतु त्याचे व्यक्तीमत्व आणि आचार विचार यांच्या जडणघडणीत त्याच्या बालपणाचा फार मोठा वाटा आहे. हे फार थोड्या जणांना माहीत आहे त्याच्या बालपणाने त्याच्यावर असे काही संस्कार केले की त्यामुळे त्याच्या जीवनाला एक वेगळेच परिमाण लाभले. हिंदू आणि मुसलमान अशा दोन्ही संस्काराचे मिश्रण होऊन साईबाबा हे रसायन तयार झाले त्यांचा जन्म परभणी जिल्ह्यातील पाथरी या गावचा. या पुस्तकाचे लेखक डॉ. घनश्याम संगतानी हेही परभणी जिल्ह्यातल्या सेलू या गावचे त्यामुळे साईबाबाचे बालपण जिथे गेले, तो सगळा परिसर डॉक्टराच्या परिचयाचा. तो सगळा त्यानी पायाखाली घातला. साईबाबा हे 'शिर्डीचे साईबाबा' होण्यापूर्वीच्या त्याच्या चरित्राबद्दल अनेक वाद आहेत. त्यासबंधी डॉ. सगतानी यानी सशोधन हाती घेतले आणि त्यातून अनेक महत्वाचे धागेदोरे, पुरावे त्यांना मिळत गेले. त्यातून ही चरित्रात्मक कादबरी घडली. या कादंबरीत जे संशोधन आहे, ते साईभक्तांना वास्तवाची जाण करून देणारे आहे, असा लेखकाचा दावा आहे. या कादंबरीच्या आणखी एका परिणामस्वरूप बाजूविषयी

सागताना लेखक म्हणतो की, धर्मभिन्नतेमुळे आज पंजाब, आसाम आणि कमी–अधिक प्रमाणात सर्व देशच अस्वस्थ बनला आहे. अशा वेळी विघातक, फुटीर चळवळीपेक्षा, जोडणाऱ्या, सामजस्य निर्माण करणाऱ्या आणि दाह कमी करणाऱ्या चळवळीची गरज आहे. (त्याची प्रेरणा ही कादंबरी वाचून मिळाली तरी खूप झाले )

ही कादंबरी अनुसया, (साईबाबांची आई), फकीर (अनुसया आणि साईबाबाना आसरा देणारा), गोपाळराव ऊर्फ व्यंकूशहा (साईबाबाचे गुरू ), भिवा, चाँदभाई, म्हाळसापती आणि दासगणूमहाराज (साईबाबाचे शिष्य आणि भक्त ) या सर्वांच्या निवेदनातून आकाराला येते. साईबाबा या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे कोनच फक्त त्यातून स्पष्ट होतात असे नाही, तर प्रत्येकजण आपल्यापाशी येऊन सपलेल्या कथेचा धागा पुढच्या व्यक्तीच्या हाती देऊन कादबरीच्या वाटचालीलाही मदत करतो. त्यामुळे ती गतिमान राहते.

## सामर्थ्याची प्रचिती

साईबाबाचे बालपणीचे नाव गोविंद. (माता अनुसया) पाथरी गावच्या एका ब्राह्मण घरात त्याचा जन्म झाला. अनुसयेचे सासरे जहागीरदाराचे पौरोहित्य करायचे. दशग्रथी ब्राह्मणाचे घर; पण गावात हिंदूच्या बरोबर मुसलमानाचीही अनेक घरे होती. त्याच्याशी तिचा नित्य सबंध यायचा. जहागीरदाराचे जिवलग मित्र खाँसाहेब उमर खय्याम याच्या घरी ती गेली. त्याच्या वागण्यातली लीनता, प्रेमळपणा आणि खानदानी भाषा बघून अनुसया भारावून गेली. पाथरी गाव अतिशय प्राचीन. इथे हिंदूची मदिरे आहेत. त्याचप्रमाणे मशिदी आणि दर्गेही बरेच आहेत. पूर्वीपासून मुसलमानाचे वर्चस्व इथे जास्त होते, पण हिंदूनाही बरेच स्थैर्य होते. सगळी कुटुबे मिळून मिसळून राहत. गोविंदच्या जन्माआधीपासून अनुसया ज्या वातावरणात राहिली त्याचे महत्व लक्षात घ्यायला हवे. हिंदू मुसलमान इतके बधुत्वाने वागत की तिला ते वेगळे कधी वाटलेच नाहीत.

लग्न होऊन दहा वर्षे उलटून गेली तरी अनुसयेची कूस उजवेना. हळूहळू पुत्रप्राप्तीची तिची ओढ वाढू लागली. तिने मारुतीला नवस केला. खाँसाहेबानी तिला कंदुरी (बकऱ्याचा बळी) करायला सांगितले. पीराला नवस करायला सागितले. पुत्र व्हावा म्हणून ती त्याला तयार झाली. एकदा दुपारच्या वेळी दाराशी एक फकीर आला. त्याने तिला आशीर्वाद दिला की, तिच्या पोटी असी सतान जन्म घेईल की ज्याच्या चरणी सपूर्ण भारतवर्ष लीन होईल, त्यानतर काही दिवसानी तिला दिवस राहिले. तिला सारखा तो फकिराचा आशीर्वाद आठवायचा. यथावकाश गोविंदाचा जन्म झाला. जन्माच्या आधीपासून पोटातल्या वास्तव्यात आणि नतर त्याच्यावर हिंदू आणि मुसलमान असे उभय सस्कार झाले लहानपणापासूनच त्याची प्रगल्भ विचारसरणी दिसून येत होती एकदा एका आषाढीला घरचे सर्वजण पंढरपूरला गेले. पाऊस वाटेल तसा कोसळत होता. चद्रभागेला पूर आला होता. होडीतून जाताना चुकामूक झाली आणि अनुसया आणि गोविंद वेगळ्या होडीतून जात असता ती उलटली अनुसया बेशुद्धावस्थेत किनाऱ्याला लागली. गोविंद अयुष्य बळकट म्हणून वाचला. किनाऱ्या वरच्या एका गावात मानवतच्या फकिराने त्या दोघांना आसरा दिला. काही दिवसानी अनुसयेने पाथरी गावात जाऊन घरच्याचा शोध घेतला. सगळे पुरात मेले होते ती व गोविंदा फकीराच्या घरीच राहू लागली. मुसलमान लोक कुजबुजायला लागले पण फकिराने सर्व परिस्थिती सांगून त्यांची तोडे बंद केली; पण हिंदू चिडले. ते डूख धरून होते. फकिराने गोविंदला मुस्लिम धर्मातले सर्व शिकवले. लोकाचा रोष वाढत होता म्हणून गोविंदला गोपाळरावाच्या मठात पोचवायचे ठरवले. मठात जात असता वाटेत त्या तिघावर हल्ला झाला त्यात फकीर आणि अनुसया गभीर जखमी झाले

गोपाळराव ऊर्फ व्यंकुशहा यांच्या मठात आल्यावर गोविंदच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली. आतापर्यंत मुसलमान वातावरणात राहिल्याने त्या रीतीरिवाजाचे प्राबल्य जास्त होते; पण मूळ हिंदू सस्कारही शाबूत होते. गोपाळरावानी त्याला सर्व काही शिवकले. गीता, हिंदू तत्त्वज्ञान, श्लोक, धर्मग्रथ, यातले सर्व काही गोविंदने चटकन् आत्मसात केले बुद्धीने तो तल्लख होता आणि त्याची वाणी लख्ख होती. अनुसयेच्या मृत्यूनंतर तो अधिकच धीरोदत्त आणि गंभीर झाला. आता तो तरुण झाला होता. गोपाळरावाच्या अत करणात गोविंद ठसला होता ते त्याला क्षणभरही विसबत नसत. गावातले लोक विशेषत: पाटील मात्र नाराज होता. मुसलमानाच्या मुलाला थारा दिला म्हणून. तो मुसलमान नाही हे त्यांना पटेना. त्याला मठातून काढून टाकावे म्हणून त्यानी गोपाळरावाना सागितले; पण तोवर तो गोपाळरावाचा प्राण झाला होता. लोकांचा विरोध वाढत राहिला आणि एक दिवस चिडलेल्या लोकानी त्याच्या डोक्यात दगड घालून त्याचा जीव घेतला. या घटनेने गोविंदला अतीव दुःख झाले. आपल्या साभाळपायी जीवावरही उदार होणाऱ्या आपल्या गुरूच्या निधनाने तो जास्तच अतर्मुख झाला. आपल्याही जीवाला धोका आहे जाणून तो गोदावरीच्या काठाने तो निघाला वेष फकिराचा असला तरी बघणारा आकर्षित व्हावा असे डोळयात तेज. वाणी पटकन मध्येच रागीट होणारी पण रोकणाऱ्या व्यक्तीला मत्रमुग्ध करणारी.

साई हे नाव धारण करून गोविंद शिर्डीला पोहोचला. इथून त्याच्या आयुष्यातले नवे पर्व सुरू झाले. अगदी आता–आतापर्यंत ते मुसलमान म्हणून त्यांना हिंदूच्या देवळात प्रवेश नव्हता; पण शिर्डीत पाऊल ठेवल्यापासून त्यांच्या बोलण्याला असा ओघ आला की, त्या प्रवाहापुढे कोणाचाच टिकाव लागेना. लोकांना त्याच्यातले विभूतीत्व जाणवायला लागले आणि जनाचा ओघ त्याच्या पायाशी येऊन पडायला लागला. काही चमत्कार ते करू शकत. त्यामुळे लोकाची श्रद्धा लवकर बसली. बागकाम करणे, कुठे तरी तद्री लावून चिलीम ओढणे यामुळे प्रथम लोकांना तो वेडापीर वाटला पण हळूहळू ते लोकांच्या रोगावर अचूक औषधोपचार करू लागले. त्यामुळे त्याची ख्याती वाढत चालली. सगळे शिर्डी गाव बाबाचे झाले. मोठमोठे ऑफिसर्स, डॉक्टर्स, श्रीमत व्यापारी, देशी, परदेशी बाबाचे शिष्यत्व पत्करू लागले. या सर्वांना बाबाच्या यौगिक, गूढ सामर्थ्याची प्रचीती येत होती गीतेवरील त्याचे विश्लेषण, अहोरात्र जळणारी धुनी, त्यांचे मशिदीतले वास्तव्य, त्याच वेळी ऊर्दूवरचे प्रभुत्व यामुळे

लोक बाबा हिंदू की मुसलमान या प्रश्नाने चक्रावून जात. नऊ नाणी आणि एक वीट ते सतत जवळ बाळगीत. ती त्याच्या गुरूची स्मृती होती.

प्रौढत्व ओसरून आता वृद्धत्व आले होते. आयुष्याचा मार्ग बराच सपला होता. आजारपण वरचेवर सतावू लागले आजाराची बातमी सर्व दूर पसरली. देशाच्या कानाकोपऱ्यातून शिर्डीकडे माणसांचा लोंढा वळला दसऱ्याच्या दिवशी बाबांनी जीवनयात्रा सपवली शिर्डीवर स्मशानकळा पसरली.

शिर्डीत आता साईबाबा नसले तरी शिर्डीतले प्रत्येक घर, रस्ता, दुकान, माणसे ही सर्व साईमयत्व आहेत.

जन्मापासून ते महाप्रयाणापर्यंतचा असा हा साईबाबाचा प्रवास. आपल्या गतायुष्याबद्दल ते अजिबात बोलत नसत. कोणी काही विचारले तर ओरडत; पण त्याचे हे बालपण पाहिले म्हणजे ते विक्षिप्त आणि आत्मकेंद्री असावेत त्याचा उलगडा होतो. साईभक्तासाठी हे संशोधन मोलाचे ठरेल यात शका नाही. या पुस्तकाची लवकरच इतर भाषांमध्ये भाषांतरेही होणार आहेत.

'विभूती' असे शीर्षक असूनही साईबाबाचे विभुतीत्व अतिरेकी स्वरूपात लेखकाने रंगवलेले नाही, हे कौतुकास्पद आहे. चमत्काराचे दोन–तीन दाखले आहेत; पण त्याचबरोबर चे माणूस म्हणून कसे वागत होते, ते चितारण्यावर जास्त भर दिला आहे. ते संत होते; पण हे संतत्व त्याना अनेक मानसिक आपत्तीशी झगडून मिळाले होते. एकाच वेळी हिंदू आणि मुसलमान अशा समान प्रबळ संस्कारातून घडूनही हे व्यक्तिमत्त्व दुभंगले नाही, तर दोन्ही संस्काराना पचवून उलट अधिक एकसंध झाले.

कादंबरीची रचनाही योग्यच वाटते. कारण त्यामुळे गोपाळराव, म्हाळसापती, दासगणू, या हिंदू व्यक्तीबरोबरच चाँदभाई, फकीर या मुस्लिम व्यक्तीना त्यांचा काय आणि कसा अनुभव आला, तेही स्पष्ट होते. संशोधनाचे हे विविध पैलू ठरावेत.

श्री. संगतानी याची भाषा सिंधी. तरी त्यांनी मराठीत हे जे पुस्तक लिहिले. याची दखल घ्यावी लागेल. याआधी त्यांची चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. मात्र या कादंबरीतील अशुद्ध शब्द वाचताना फार खटकतात. कुरान, कन्हने, विश्लेषन, जानवले अशासारखे असंख्य शब्द आणि ऱ्हस्वदीर्घाच्या चुका असलेले शब्द आहेत. या चुका सहज टाळता आल्या असत्या.

या कादबरीत अनेक व्यक्ती आत्मनिवेदनातून कथाभाग पुढे नेतात. प्रत्येकाची भाषा, बोलण्याची पद्धत वेगळी आहे कथानक घडते ते सगळे मराठवाडा विभागात, तेव्हाच्या मोगलाईत. त्यामुळे हिंदीमिश्रित मराठी किंवा मराठीमिश्रित हिंदी भाषा अचूक वापरली आहे. अनुसयेची शुद्ध मराठी खाँसाहेबांची उर्दूप्रभावाची हिंदी, भिवा–म्हाळसापतीची मराठी बोलभाषा आणि सगळ्यात महत्त्वाची गोविंदच्या बालपणीच्या मराठीपासून साईबाबा झाल्यानतरच्या हिंदीपर्यंतचा बदल हे सर्व प्रकार चागले हाताळले आहेत.

–आशा कर्दळे

विभूती
डॉ. घनश्याम संगतानी
सीमा पब्लिकेशन्स
पृष्ठे : ४००, किंमत : ८० रु.

## पुण्यातील तीन मतदार संघ

पृष्ठ ९ वरून

लाखो स्वयसेवकांना केवळ सघ विचाराचे म्हणून तुरुगात विना चौकशी डांबून ठेवले. हजारोंचे संसार उध्वस्त झाले. ८० वर्षांच्या वृद्धांपासून ते सोळा वर्षाच्या तरुणापर्यंत सर्वांना पकडले. एकट्या महाराष्ट्रात डझनभर प्रमुख पूर्ण वेळ कार्यकर्ते जेलमध्ये दगावले. असा क्रूरतेचा कळस गाठला. अशा पार्श्वभूमीवर कोणत्या तरी एका घटनेवर, कोणाच्या तरी स्टेटमेंटवर, आपला मित्र कोण, अमित्र कोण हे न समजण्याइतका समाज अविवेकी नाही. त्यामुळे पुण्याच्या संदर्भात भाजपचे सर्व उमेदवार हे नुसते भाजपचे नसून सघ स्वयसेवक आहेत. त्यामुळे सघाचे लोक त्याच्यासाठीच काम करतील. एवढेच नव्हे तर त्यांच्या पुलोदमधील मित्रकुटासाठीसुद्धा कार्य करतील, हे सहज स्वाभाविक आहे. कोणत्याही कृत्रिम पद्धतीने घडवून आणण्याची अथवा न आणण्याची गरज नाही.'

पुलोदच्या प्रयोगासंबंधी प्रा. शास्त्री मोकळेपणाने म्हणाले, 'पुलोदच्या नावावर महाराष्ट्रात ही निवडणूक विरोधक लढवीत आहेत. पुलोदचे रेकॉर्ड चागले आहे. 'एक नेता – एक कार्यक्रम' असे चागले चित्र घेऊन हे लोक उभे आहेत. त्यामुळे येथील मतदारांना योग्य पर्याय मिळाला आहे. पुणे शहरात पुलोदतर्फे जे उमेदवार उभे आहेत त्याची सार्वजनिक सेवा, सार्वजनिक चारित्र्य उत्तम आहे जनसपर्क, बडखोरीचा पूर्णत: अभाव ही विरोधकाची जमेची बाजू – जी कॉंग्रेसच्या बाबतीत दिसत नाही. कॉंग्रेसच्या 'मनीफॅक्टर' विरोधक 'मॅनफॅक्टर' नी भरून काढतील का, हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. सुदैवाने पुणे हे जागरूक शहर आहे आणि काही मूल्याना कमिटेड असे पुलोदचे उमेदवार आहेत.'

–या सर्व मुलाखती
–गिरीश प्रभुणे


मराठीतील एक सच्चे
आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती
मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

# लादलेली व्यंगं

मुलांच्यात वावरताना जेव्हा अपंग, मतिमंद, मूक बधीर, अंध मुलांशी वागण्या बोलण्याची वेळ येते तेव्हा अनेक गोष्टींची नव्यानं ओळख पटते. मतिमंद मुलांची माया, अंध मुलांचा सावधपणा, मूक बधीरांचा चलाखपणा, अपंगांची जिद्द जेव्हा प्रसंगाप्रसंगांनी अनुभवायला मिळते तेव्हा नव्यानं डोळे उघडतात.

वरवर दिसायला कोणतंही शारीरिक व्यंग नाही, जन्मजात वैगुण्य नाही अशा मुलांचे पालक अनेकदा असंही म्हणताना ऐकू येतात ' चला बुवा, आपली मुलं हातीपायी धड निघाली. काही दोष नाही.'

मुलांचं हे जन्मजात देणं आपण पालक सांभाळून ठेवू शकतो का हा प्रश्न मात्र अनेकदा पडतो.

परवाच एक वीस–बावीस वर्षांचा मुलगा आला होता भेटायला. बरोबर त्याची आई पण. हाती पायी धडधाकट, शरीरानं मजबूत, दिसायलाही बऱ्यापैकी दिसणारा मुलगा पण चेहऱ्यावर तरुणपणाची नावनिशाणी नाही. उत्साह नाही. आत्मविश्वास नाही. हातापायांच्या सतत अस्वस्थ हालचाली. बोलणं अर्धवट, गुळमुळीत. मुलाशी आणि आईशी बोलता बोलता लक्षात आलं की, मुलाचे वडील अतिशय संतापी आहेत. रागीट आहेत. कटकट करणारे, अरेरावी करणारे आहेत. बायकोला तर अगदी पायातली वहाण म्हणूनच वागवतात. मुलाच्याही नेहमी चुकाच काढत असतात. त्यानी काही चांगलं केलं तर तोंडातून एक चांगला शब्द काढत नाहीत येणाऱ्या–जाणाऱ्याजवळही मुलाला नावं ठेवणं चालू असतं.

या वागण्याचा फार लहानपणापासून मुलावर परिणाम झालाय. त्याला आत्मविश्वासच नाही सारखी भीती वाटते. छातीत धडधडतं. कुठलीही नोकरी लागली तरी तिथे तो टिकत नाही. घाबरतो.

या मुलाकडे बघून असं वाटतं की, याला का म्हणून तरुण धडधाकट मुलगा म्हणायचं ? हा तर मनानं अधू, अपंग झालाय. अर्थात प्रत्येक व्यंगावर काही प्रमाणात उपाय असतात तसं याचं मन सुधारता येईल. फार वेळ लागेल त्याच्यातला आत्मविश्वास जागा करायला.

कधी असं वाटतं की, याच्यापेक्षा याच्या वडलांवरच फार पूर्वी इलाज व्हायला हवा होता. बदुकीनी गोळी झाडून माणसं मारणाऱ्यांना आपण मारेकरी म्हणतो, गुन्हेगार ठरवतो, खुनी म्हणतो. आपल्या मुलांमधला आत्मविश्वास मारणाऱ्यांना काय म्हणायचं ? कोणती शिक्षा द्यायची त्यांना ?

पालकांचं मुलांशी असं हिंसक वागणं हा गुन्हा वाटायला हवा. मांजर जसं उंदराला खेळवत खेळवत मारतं, तसे हे पालक आपल्या मुलांची व्यक्तिमत्त्वं पालकत्वांच्या प्रेमळ मुखवटयातून हळूहळू मारत असतात.

वर उल्लेख केलेल्या पालकांना तर प्रेमळ मुखवटाही नाही. त्यांचा चेहरा सदा त्रासलेला न् रागीटच असतो. पालकांच्या ह्या वागण्याचं मूळ शोधत गेलं तर कदाचित ते त्यांच्या पालकांशीही पोचेल. कारण अशी अरेरावी करणं, दुसऱ्याचा अपमान करणं हेही एक प्रकारे आत्मविश्वास नसल्यामुळेच घडतं.

तुम्ही म्हणाल म्हणजे मुलं बिघडली की सगळं खापर पालकांच्याच माथी मारायचं का ? शाळा, शिक्षक, संगत, समाज, इतर शेजारी, नातेवाईक, मुलाचा स्वभाव ह्या मुळेच परिणाम घडतातच ना !

खरं आहे; पण यातल्या बऱ्याचशा लाटा थोपविण्याइतकं मनोबल मुलात निर्माण करणं पालकांनाच शक्य असतं. आपल्या ह्या कर्तव्याची पालकांना अनेकदा जाण नसते. आपल्या आयुष्यातल्या कर्तबगारीच्या मुकुटातला आणखी एक तुरा म्हणून मुलांकडे पाहिलं जातं. त्यांचा विकास, त्यांचं व्यक्तिमत्त्व जोपासणं, एक चांगलं माणूस निर्माण करणं ही कर्तव्यं विसरली जातात.

कधी कधी असं वाटतं की, अशा पालकांवर आजूबाजूच्या सुजाण माणसांचा अधिकार चालायला हवा. फ्रेंड्स् ऑफ ॲनिमल्स असतात असे फ्रेंड्स् ऑफ चिल्ड्रन घरोघरी हवेत आणि तुमच्या मुलात तुम्ही असं काही अपंगत्व निर्माण करताना दिसलात तर तुम्हाला वेळेवर थांबवणारे सुजाण मित्र हवेत.

कित्येकदा मुलांसंबंधीचे प्रश्न पालकांच्या लक्षातही येत नाहीत लवकर. आले तरी प्रश्नांच्या प्राधान्यांच्या यादीत मुलांना फार वरचा नंबर नसतो. हे प्रश्न कुणाशी मोकळेपणानं बोलावेत, आपल्या शंकांना उत्तरं शोधावीत, मुलांचं न् आपलं वागणं–जगणं सुसह्य बनवावं यासाठी वेळ नसतो. पुरुष पालकांची या विषयातली अनास्था तर अवर्णनीयच असते.

ह्या अनास्थेमुळे, आपलं वागणं वेळेवर तपासून न पाहिल्यामुळे, आपलं मूल कसं घडतं आहे त्याबद्दल जागरूक न राहिल्यामुळे जन्मतः अव्यंग मुलात आपण अनेक व्यंगं निर्माण करून ठेवतो. त्याला अपंग बनवतो. थोडं अतिशयोक्तीनं लिहिते आहे ते गांभीर्य पटावं म्हणूनच.

कान असून धड ऐकता येत नाही, डोळे असून दिसत नाही, तोंड असून मोकळं बोलता येत नाही अशी अवस्था का होते ? हात असून कामाची सवय नाही, पाय असून चालायची सवय नाही, डोकं असून वापरता येत नाही अशी प्रकृती का बनते ?

मुलांमध्ये शारीरिक, मानसिक, भावनिक कणखरपणा नसणं, ताकदीनं आनंदानं त्यांना जागता न येणं हे अपंगत्वच आहे.

व्यंगं नैसर्गिक असतात, अपघाती असतात ही कल्पना खोटी आहे नाही का ? व्यंगं कित्येकदा आपण निर्माण करतो. कधी आपल्या रागानी. कधी प्रेमानी सुद्धा !

थोडं अंतर्मुख होऊन विचार करू या आपण अशी व्यंगं निर्माण करतो आहोत का ?

□

सांस्कृतिक दिल्ली

# लालन सारंगशी गप्पा

गेल्या आठवड्यात 'ग्रंथाली'कडून अचानक एक पत्र आले. 'मराठी नाटकातील आजच्या प्रख्यात अभिनेत्री लालन सारंग दिल्लीला आल्या आहेत. त्यांच्याशी गप्पा मारण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. अवश्य उपस्थित रहावे' दिल्लीत मराठी नाटके आणि अभिनेते पहायला किंवा बोलायला मिळणे दुर्मिळ त्यामुळे कार्यक्रमाला आवर्जून गेलो.

नूतन मराठी विद्यालयाच्या तळघरात कार्यक्रम होता. छोट्या जागेत गप्पांना खरे अनौपचारिक स्वरूप येण्याची शक्यता अधिक होती. 'ग्रंथाली'चे दिल्ली शाखेचे प्रतिनिधी आणि 'महाराष्ट्र टाईम्स'चे वार्ताहर श्री. अशोक जैन यांनी कार्यक्रमाचे सूत्रचालन केले. साहित्य आणि नाटकात रस असणारा मोजका श्रोतृवर्ग होता. गादीच्या बैठकीवर लालन सारंग आणि सूत्रचालक अशोक जैन.

'नाटकात आपण एखाद्या नट-नटीची भूमिका पाहून त्या व्यक्तीबद्दल आपले मत बनवीत असतो. वास्तविक आपण ती नाटकातील व्यक्तिरेखा आणि भूमिका करणारी व्यक्ती यांची गल्लत करीत असतो. नाटकातील भूमिका पाहून आपण त्या व्यक्तिविषयी आपल्या मनात काही कल्पना रचतो. तथापि नेहमीच्या जीवनातील ती व्यक्ती आणि नाटकात काम करणारी ती व्यक्ती ही भिन्न असू शकतात...असतात. तेव्हा जवळून समजून घेण्याच्या दृष्टीने असा गप्पांचा कार्यक्रम उपयुक्त ठरेल' अशी प्रस्तावना करून अशोक जैन यांनी काही प्रश्न विचारले–

'...लालन, आपण नाटकात कसा प्रवेश केला ? एखाद्या कलेची आवड ही लहानपणापासूनच असते, तशी तुम्हाला होती का ?'

'...तशी मी नाटकात सहजच आले. पूर्वी मला नाटकाबद्दल काही विशेष आवड होती, असे काही नाही. किंबहुना महाविद्यालयीन जीवनातही मी कुठल्या भाषणात किंवा स्पर्धेत भाग घेत नसे. माझ्या बहिणी नाटकात चांगले काम करतात; पण मला त्याचे अंग असेल असे मला कधीच वाटले नाही. परंतु बहिणींच्या तुलनेत आपण कशातच नाही हा सल कुठेतरी अंतर्मनात असावा. त्यामुळे कदाचित मी नाटकात काम करायला सुरुवात केली. ते जमत गेलं. त्या दरम्यान कमलाकर सारंग यांची गाठ पडली आणि आम्ही विवाहबद्ध झालो. पूर्वी करीत असलेली नोकरी सोडली आणि सुमारे वर्षभर नवऱ्याने कमवावे आणि आपण खावे अशा शंभर टक्के गृहिणीपदात घालवले. पण नंतर नाटकात काम करायला सुरुवात केली आणि नकळतच त्यात मी गुंतत गेले. ते चांगलं जमतही गेलं.'

'...आपल्याला आपली कुठल्या नाटकातली भूमिका अधिक आवडली ? ...ती का आवडली ?'– अशोक जैन.

'...तशी माझी 'रथचक्र'मधील भूमिका काही बरीच गाजली. परंतु त्यातील भूमिकेने माझ्यातील बऱ्याच गोष्टी काढून घेतल्या. ह्या भूमिकेने मला दुबळं केलं. वैयक्तिक जीवनात मी फार हळवी बनत गेले. नवरा, मुलगा, आई, सर्वांच्या बाबतीत माझ्या मनात हळवे विचार येऊ लागले. या उलट 'सखाराम बाईंडर'मधील 'चंपा' या भूमिकेने मला माझ्या वैयक्तिक जीवनात खूप काही दिले. कुणाशीही बोलून माझे विचार मांडण्याचा, भूमिका स्पष्ट करण्याचा धीटपणा मला चंपाच्या भूमिकेने दिला.'

'...नाटकातील भूमिकांशी आपण इतके समरस होतो का, की ज्यामुळे आपल्या आयुष्यातसुद्धा त्याचा परिणाम व्हावा.'– अशोक जैन.

'काही वेळा त्याचा परिणाम होतो. कमला नाटकात काम करताना त्या भूमिकेशी आपल्या जीवनाचे जवळचे नाते असल्याची जाणीव मला नेहमी होत असे. त्याचा परिणाम दैनंदिन जीवनातील व्यवहारावर सुद्धा होऊ लागला. नवऱ्याचे कपडे आपण धुतो. पण त्यात काही विपरीत वाटत नाही. तथापि नवरा कधी आपले कपडे धूत नाही. वास्तविक तसे धुण्याला काही हरकत नाही. कारण दोघेही सारखेच काम करतो...कदाचित आपण त्याच्यापेक्षा जास्तच काम करतो. पण तसे होत नाही ... यासारखे विचार मनात घोळू लागले.'

श्रोत्यांनीही अनेक प्रश्न विचारले आणि गप्पा रंगत गेल्या. कुणी विचारले की 'तुमचा आवडता नाटककार कोण ?' लालन म्हणाल्या की 'विजय तेंडुलकर हे माझे तसे सर्वात आवडते नाटककार. आम्ही नाटक बसवताना पुष्कळदा त्यातील काही वाक्ये बदलतो आणि आम्हाला अनुकूल अशी रचना करवून घेतो; परंतु तेंडुलकरांच्या नाटकातील वाक्ये आम्ही बदलूच शकत नाही. त्यांच्या नाटकातील एखादा शब्द जरी बदलला तरी त्या नाटकाचा सगळा तोलच जातो. इतकी त्यांची वाक्यरचना चपखल असते. त्यातील कर्ता, कर्म, क्रियापद आपण बदलूच शकत नाही. इतर नाटककारांच्या बाबतीत तसे होत नाही. थोड्याशा फेरबदलाने त्यांच्या नाटकांना बाधा येत नाही.'

'पण सखाराम बाइंडरमधील एक दोन वाक्ये बदलली असे समजते.'

'त्यातील फक्त एक दोन शब्द परीक्षक मंडळाने बदलले. 'भलत्या ठिकाणी' हे शब्द फक्त बदलले आणि ते शब्द कर्ता, कर्म, क्रियापद यांपैकी नव्हते.'

'तुम्हाला चित्रपट आणि नाटकात काम

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

करताना काय फरक जाणवला ?'

.. 'चित्रपट हे ही आव्हान देणारे, समर्थ माध्यम असले तरी त्यातील फोलपणा मनाला समाधान देत नाही. तिथे तुकड्या-तुकड्यांनी अभिनय होतो आणि एखादा क्लोजअप् किंवा एखादा सीन कुठे वापरला जाणार हे आपल्याला कळत नाही. त्याउलट नाटकात आपण समरस होतो. त्यात जिवंत अभिनय असतो, '

'उंबरठा या चित्रपटातल्याप्रमाणे एखाद्या स्त्रीने आपल्या विचारांना कृतीत आणण्यासाठी किंवा एखादे कार्य करण्यासाठी घर सोडून निघून जाणे याविषयी आपली धारणा काय ?'

'त्या स्त्रीला जर प्रामाणिकपणे तसे वाटत असेल तर तिने खुशाल घर सोडून निघून जावे; परंतु मग नवऱ्याने कुणाशी संगनमत केले किंवा झाले तर त्याला दोष देऊ नये माझ्यापुरते बोलायचे तर आपले कर्तव्य हे ही आपल्या जीवनात महत्त्वाचे अंग असते. तेव्हा कर्तव्य लाथाडून, कुटुंबाची हेळसांड करून आपले कार्य साधण्याची माझी वृत्ती नाही. ते मला पटत नाही. अर्थात ह्यात व्यक्तीपरत्वे भिन्नता असू शकते !

'लालन सारंग, आपल्या नाटचजीवनात असा एखादा प्रसंग आला का की जेव्हा तुम्ही 'आता कसे होईल' अशा परिस्थितीत सापडला ?' अशोक जैन.

'हो. असे एक दोन प्रसंग आठवतात. सखाराम बाइंडरमध्ये मी दारू पिऊन झिंगल्याच्या अभिनयानंतर निळू फुले येतात असा प्रसंग आहे; परंतु एकदा रंगमंचावर काळोख असताना आपली नंतरची एंट्री विसरून आधीच ते स्टेजवर येऊन झोपले. हळूहळू प्रकाश वाढू लागला तेव्हा मी झिंगण्याचा—वरळण्याचा अभिनय करताना ते ही स्टेजवर दिसले. तेव्हा त्यांना हळूच 'निळूभाऊ' दसरा दसरा' असे म्हणून त्यांची नंतरची एंट्री सूचित केली तेव्हा ते हळूच सटकले. तेव्हापासून त्यांच्याकडून प्रसंगांचा क्रम घोकून घेऊनच मी नाटकाला सुरुवात करू लागले.

दुसरा प्रसंग स्टेज वर्कर्समुळे गुदरलेला. एकदा एका नाटकात व्हिस्कीला रंग आलेला नव्हता. बाटली पांढरीच दिसत होती. तेव्हा प्रेक्षकांच्या लक्षात येऊ नये म्हणून ग्लासाचा हाताने झाकलेला भाग पुढे करून 'चिअर्स' केले; पण पुन्हा ती ग्लासात ओतायची होती. तेव्हा विंगमध्ये उभ्या असलेल्या पोराला हाक मारून म्हटले 'अरे, या व्हिस्कीत काहीतरी गडबड दिसते. जरा पहा बरं' हे नाटकात नसलेले वाक्य घुसडून त्याच्याकडून बाटली बदलून मागवली.' असे काही प्रसंग आणि आयत्या वेळी सुचलेल्या गोष्टी सांगून लालननी श्रोत्यांची छान करमणूक केली.

त्यांनी अनेक गुजराती नाटकांतूनही कामे केली. गुजराती येत नसले तरी संभाषणे देवनागरीत लिहून घेऊन पाठ केली आणि गुजराथी रंगभूमीही गाजवली. तथापि गुजराथी प्रेक्षकांविषयी त्यांनी सांगितलेले अनुभव मजेशीर वाटले.

गुजराथी प्रेक्षक हे नाटकाला खूप नटून—थटून येतात. नाटकापेक्षा त्यांना एकमेकांचे कपडे, त्यांच्या किंमती, दागिने यांच्या चर्चेत आणि गप्पात अधिक रस असतो. नाटक चालू असतानाही त्यांचे नाटकाकडे थोडे आणि अशा गप्पांमध्येच अधिक लक्ष असते, असे त्यांनी सांगितले. त्याहीपेक्षा प्रत्यक्ष नाटकाविषयी त्यांनी सांगितलेला एक अनुभव अजब वाटला.

सामान्यतः गुजराती प्रेक्षक भावनांच्या तीव्र अविष्काराला अथवा अनुभवाला सामोरे जाण्यास कचरतात. ते त्यांना सहन होत नाही. एका नाटकात घरातील पंधरा—सोळा वर्षांचा मुलगा अपघातात निधन पावतो असा प्रसंग आहे. त्यामुळे त्याच्या मात्या-पित्यांची दुःखी, शोकाकुल मनःस्थिती गुजराती प्रेक्षकांना पेलवत नाही. तेव्हा त्या घरातील नोकर घरात कुंड्यांमधून फुले लावत गात आहे असा हलका-फुलका भाग ते नाटकात घुसवतात. किंबहुना अत्यंत गंभीर नाटकातही केवळ प्रेक्षकांना सुसह्य होण्यासाठी विदुषकी चाळेही करमणूक म्हणून (विसंगत असूनही) घातले जातात असे त्यांनी सांगितले. त्यादृष्टीने मराठी प्रेक्षकांची अभिरुची ही कितीतरी पटीने उच्च असून असला भाग ते मुळीच खपवून घेत नाहीत. त्यावर टीकेची झोड उठते, असे त्या म्हणाल्या कधी कधी तर हे प्रेक्षक विंगमध्ये येऊन काही मौलिक सूचनाही करतात आणि त्या आम्ही स्वीकारतोही, हे लालननी मोकळेपणाने सांगितले.

लालन यांच्या गप्पांतून नाटकांविषयी नवे अस्सल, अनुभव समजण्याची संधी लाभली त्याचबरोबर त्यांच्या प्रामाणिक, जीवनाभिमुख आणि संस्कारक्षम अशा अनुभवसंपन्न व्यक्तिमत्वाची खरी ओळख पटली.

— ललिता मिरजकर


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

डॉ.
आयडा स्कडर
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

एक होता
कार्व्हर
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

## रंगभूमी

# ड्रॉपर्सनिर्मित ‘ तुघलक ’

वि. भा. देशपांडे

गेल्या पंधरा-वीस वर्षांत भारतीय स्तरावरच्या रंगभूमीवर जी आदान-प्रदान क्रिया चालू आहे, त्यामध्ये अनेक अमराठी नाटके मराठीत आली. अर्थात मराठी नाटकेही अन्य भाषांमध्ये जाऊन प्रतिष्ठित झाली. या प्रक्रियेत गिरीश कर्नाड यांचे ‘तुघलक’ विजय तेंडुलकरांनी अनुवादीत करून मराठीत आणले. तेंडुलकरांसारख्या त्रिनीच्या नाटककाराला ‘तुघलक’ अनुवादीत करावेसे वाटणे ही स्वाभाविक गोष्ट आहे. कारण ‘ तुघलक ’ हे अभिजात नाटकांच्या कुळीतील आहे. याच मराठी पेहेरावी तुघलकचा एक प्रयोग काही वर्षांपूर्वी झालेला अनेकांच्या स्मरणात असेलही ! अरविंद देशपांडे यांचे दिग्दर्शन, दामू केंकरे यांचे नेपथ्य, कलकत्त्याच्या तापस सेन यांचे प्रकाशयोजन आणि तुघलकच्या भूमिकेत अरूण सरनाईक ही श्रेयनामावली त्या प्रयोगाला लाभली होती. यावरून प्रयोगाच्या गुणवत्तेची कल्पना येऊ शकेल !

परंतु या प्रयोगापेक्षा ‘ ड्रॉपर्स ’ या नाटचसंस्थेने अलिकडच्या काळात केलेला प्रयोग अगदी वेगळ्या पद्धतीचा आहे. आरंभीच एक गोष्ट जाणवते की, या नाटकाच्या लेखनात काही बदल दिग्दर्शकाने करवून घेतले आहेत. बरनीनामक इतिहासकाराची जी व्यक्तिरेखा आहे, त्यालाच सूत्रधाराचे काम दिले आहे. तो प्रसंग घडण्यापूर्वी किंवा घडल्यानंतर अनेकदा निवेदन करतो. तो केवळ प्रवेशजोडणीसाठी जोडनिवेदन पद्धतीने ते करीत नाही तर तो घटितावर भाष्यही करतो. इतिहासकाराने घडलेल्या किंवा घडणाऱ्या घटनांवर भाष्य करणे अर्थपूर्ण आहे. कारण त्यातून तो काही अन्वयार्थ आपल्यापुढे ठेवू इच्छितो, जे आपल्याला विचार करायला लावणारे ठरतात. या पद्धतीमुळे मूळ घटिताचे, व्यक्तिरेखनाचे काही अर्थ अधिकतेने समजणे शक्य होत असले किंवा त्या कथन–निवेदन–भाष्य यांचे नाते वर्तमानाशी जोडून सार्वकालिक करण्याचा यत्न असला तरी त्यातील तुटकपण, जोडभाग खटकल्याशिवाय रहात नाही. अशा प्रकारच्या विचारनाटचात सर्वच अर्थ किंवा अन्वयार्थ उलगडून दाखवण्याचा प्रयत्न निवेदकाने केलाच पाहिजे असे नाही. प्रेक्षकांच्या कल्पकतेवर त्यातला काही भाग सोडून दिला तरी चालू शकेल अशी स्थिती निश्चितच आहे ! त्या मागे कदाचित असाही भाव असू शकेल की, गतकालात होऊन गेलेला महंमद तुघलक हा केवळ विक्षिप्त, लहरी, वेडा नव्हता तर त्याहीपेक्षा त्याच्या व्यक्तिरेखेत आणखी काही खोलवर अर्थ होता, नवे स्वभाव पदर होते. विशेषत: त्याने आपल्या कारकिर्दीत जे अनेक निर्णय घेतले आणि प्रजेला ते अमलात आणायला लावले ते दर्शनी वेडेपणाचे वाटणारे होते; पण त्या वेडेपणातही शहाणपणाची एक दिशा आहे किंवा होती हे सूत्रधाराकडून किंवा इतिहासकार बरनीकडून नाटककाराने सांगण्याचा यत्न केलेला दिसतो; पण हा यत्न नाटकाच्या माध्यमात निवेदनातून येण्यापेक्षा दर्शनातून भावला असता तर अधिक आवडले असते. या निवेदन–भाष्यांमुळे अनेक नाटचमय प्रसंगांचे प्रत्यक्ष दर्शन कमी प्रमाणात घडले. त्याचा परिणाम प्रयोगरंगतीवरही झाला. तो स्वाभाविकच होता, कारण नाटक अखेरी शब्दांमध्ये नको इतक्या प्रमाणात अडकून राहिले. ( तुलनेने जुना प्रयोग असा वाटला नव्हता हेही स्मरते. ) अशा नाटकाची जात शब्दप्रधान असते हे मान्य करूनही तो शब्द इतका का जाणवत रहावा हा खरा प्रश्न आहे !

‘ ड्रॉपर्स ’ संस्थेने तुघलक प्रयोगित करण्याचा केलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. तो निर्णय घेताना नेहमीच्या पद्धतीने त्वरीत प्रयोग उभा न करता तो नाटचशिक्षणाच्या उपक्रमातून व्यक्त करण्याचा यत्न केला. सत्यदेव दुबेसारखा सृजनशील दिग्दर्शक या संस्थेच्या कलाकारांना लाभला हे सुचिन्हच होते. दुबेने आपल्या शिस्तीने किंवा पद्धतीने आठ-दहा महिने या प्रयोगाशी संबंधित अशा कलाकारांना नाटचविषयक अनेक अंगाउपांगांचे विस्ताराने प्रशिक्षण दिले. विशेषत: रंगभूमी माध्यमात शरीराचा वापर किती प्रकाराने करता येतो, त्यातही वाचिक अभिनय कसा करावा याचे तपशिलवार ‘शिक्षण दिले गेले. त्यातून हा प्रयोग उभा राहिला.

ही सारी पार्श्वभूमी माहीत असल्याने आणि तशी ती एका छोट्या पुस्तिकेत संस्थेने प्रकाशितही केली असल्याने प्रयोगाबद्दलच्या अपेक्षा अधिकच वाढत्या राहिल्या; पण प्रत्यक्षात त्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात पूर्ण झाल्या नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे यातले बहुसंख्य कलाकार प्रशिक्षणाच्या छायेतून दूर झालेले जाणवले नाहीत. दिग्दर्शकाने वाचिक अभिनयाच्या निमित्ताने सांगितलेला स्वराचा वापर, उच्चारातील आघात, शब्दसंवादांची लय, एकूणच आवाजातील चढउतार आदी गोष्टी आपापल्या ताकदीनुसार प्रत्येकजण करण्याचा यत्न करीत होता; परंतु हे सारे प्रशिक्षण किंवा त्यातली दिशा घेऊन आपल्याला नाटकाचा आशय समोरच्या प्रेक्षकांपर्यंत समर्थपणाने पोहोचवायचा आहे हे कळत असूनही तितक्या ताकदीने व्यक्त झाला नाही. एकतर सूत्रधाराचे आणि बरनीचे बोलणे एकसुरी वाटल्याने पुढे पुढे ते कंटाळवाणे–नीरस झाले. त्याचे बोलणे

प्रेक्षकाशी सवाद साधणारे, त्याना विश्वासात घेऊन पुढे जाणारे असे हवे होते, तसे घडले नाही दुसरे म्हणजे यातली अनेक कलाकार-मडळी आपापसात त्याच्यासाठीच बोलत आहेत असे भासत होते. त्याचे बोलणे हे त्याचे आणि त्याच्यातले असले तरी नाटचाशय कळण्यासाठी ते आमच्यापर्यंत यायलाच हवे होते, ते अनेकदा आले नाही वाचिक अभिनयातील बळ हे दुबे दिग्दर्शित नाटकाचे लक्षणीय वैशिष्टच असते असते हे मी त्याच्या अनेक हिन्दी-मराठी नाटचप्रयोगातून अनुभवले आहे. तसेच ते इथेही होते; पण वाचिक अभिनयावर विशेष भर देणे याचा अर्थ आगिक अभिनय किंवा मुद्राभिनय-भाषाविष्कार याकडे दुर्लक्ष करणे, त्याचे महत्त्व कमी लेखणे असा व्हायचे कारण नाही. या प्रयोगात तसे जाणवले. या प्रकारचे नाटक भावुक नाही हे तर आहेत; पण अशा विचारगर्भ नाटकात अंतर्गत जी भावात्मकता असते त्याचे दर्शन घडणे नक्कीच अभिप्रेत आहे. उदाहरणार्थ तुघलक आणि त्याच्या आईच्या भेटीचा प्रसग, शिहाबउद्दीनला मारण्याचा प्रसग आदी सांगता येईल. सर्वात खटकणारी गोष्ट की, जी लेखनात मुळात आहे, ती म्हणजे दोन तुघलकांचा केलेला वापर. तुघलकच्या चेहऱ्यामोहऱ्याशी साम्य जुळणाऱ्या व्यक्तीचा केलेला वापर. या कल्पनेमुळे नेमके काय साधायचे होते ते सपूर्ण नाटक पाहताना कोठेच ध्यानी आले नाही. या कल्पनेमुळे प्रेक्षकाची मन:स्थिती अधिकच द्विधा झाली या कल्पनेमागचे प्रयोजन शोधत राहिली. परिणामी मूळ नाटचाशयापासून तो प्रेक्षक दूर होत गेला. त्याचा दोष लेखक आणि दिग्दर्शक ह्या दोघांवर जातो!

हा प्रयोग पाहताना एका बाजूला जाणवत होते की, सुहास कुलकर्णी, आनद लागू, सुधीर मुगी, सजय गर्गे, राजेंद्र खडागळे, सजय लोणकर, मिश्रा, रबडे आणि ज्योती सुभाषचद्र ही कलाकार मडळी अतिशय गाभीर्याने, प्रामाणिकपणाने आपली कामे चोख बजावीत होती दिग्दर्शकाने जे काही सागितले आहे ते करीत होती. त्याचवेळी दुसऱ्या बाजूने जाणवत होते की, ते समर्थपणाने आपल्यापर्यंत भिडत नाही. आपल्याला बरोबर घेऊन अस्वस्थ करीत नाही, विचार करायला लावीत नाही. तरतमभावाने सागायचे तर सुहास कुलकर्णी तुघलक म्हणून अधिक आवडला. त्याचे दिसणे, चालणे, बोलणे आणि एकूणच बाज मूळ व्यक्तिरेखेच्या दिशेने होता. त्या तुलनेत आनद लागूचा आवाज शब्द प्रभावित करू शकला नाही. सजय लोणकर, सदानद लिमये यांची प्रकाशयोजना, नचिकेत-जयू पटवर्धनांनी करून दिलेली वेशभूषा, नेपथ्यातील सूचकता विशेषन 'सतत टागती तलवार' इत्यादी गोष्टी नाटचाशय व्यक्त करण्याला पूरक होत्या.

'ड्रॉपर्सने केलेले धाडस पूर्णत: यशस्वी झाले नाही तरी नाटचप्रशिक्षणातून प्रयोग ही उपक्रमशीलता आणि तीही दुबेसारख्या जाणकाराला घेऊन प्रवास करण्याची कल्पना याचे महत्त्व कोठेच उणावत नाही!

---

## पंढरपूरच्या उत्पातांची भुलवणारी लावणी

---

लावणी गायन म्हटले म्हणजे आकर्षक चेहऱ्याची, सुडौल बाध्याची, अदाकारीने घायाळ करणारी स्त्री नजरेसमोर येते. त्यात नृत्याची मोहक हालचाल असली तर ते सारे रूप डोळा भरून पाहावेसे वाटते, दीर्घकाळ मनात साठवून ठेवावेसे वाटते. यात गैर काहीच नाही; पण लावणीची एक न्यारी तऱ्हा म्हणजे बैठकीची लावणी. तीही एखाद्या बाईने न गाता चक्क मध्यमवयीन पुरुषाने भरदार आवाजात गायलेली ऐकायची अशी आपल्याला सवय नाही!

नुकताच भरत नाटच मदिरमध्ये पंढरपूरच्या उत्पात नामक मडळीनी लावणी गायनाचा कार्यक्रम पेश केला तो ऐकल्यावर आश्चर्यमिश्रित आनद झाला. ही उत्पातमडळी पढरपूरच्या देवळातील रुक्मिणीचे पुजारी. त्यातले काहीजण आता व्यवसायपरत्वे शिक्षक झाले, शेतकरी बनले पुजारीपण चालूच आहे. ते जितक्या निष्ठेने आणि परपरेने चालू आहे तितकेच लावणी गायनही निष्ठापूर्वक चालू आहे.

तीन वर्षांपूर्वी मुबईच्या इंडियन नॅशनल थिएटर या संस्थेने पढरपूरला 'भक्ती सगीत या विषयावर चर्चासत्रे आणि प्रात्यक्षिके असा कार्यक्रम ठेवलेला होता. त्या वेळी या उत्पातांच्या लावणी गायनाची झलक मी अनुभवली होती, पण त्यामध्ये त्यांनी लावणीतील 'भक्ती' यावर भर देऊन त्याच पद्धतीच्या लावण्या पेश केल्या. तेव्हा थोडा वेळ ऐकलेल्या लावण्यानी अनामिक उत्सुकता निर्माण झाली होती. कारण शृंगाराशिवाय लावणी ऐकणे हे काही खरे वाटत नव्हते. त्या वेळी शक्य झाले नाही ते पुण्यातल्या कार्यक्रमात मनसोक्तपणाने शक्य झाले-पढरपूरच्या भक्तीसगीत सोहळयानतर काही दिवसानी डॉ. वसतराव देशपाडे आणि पु.ल. देशपाडे याची काही निमित्ताने भेट झाली असता त्यानी उत्पाताच्या लावणीची भरभरून स्तुती केली होती पु लं. च्याच नाटकातल्या शब्दात सागायचे तर 'ताजमहाल पाहायला आगऱ्यालाच जायला हवे.' त्याप्रमाणे वसतराव आणि ते खुद्द पंढरपूरला जाऊन मुक्काम ठोकून उत्पाताच्या लावण्या ऐकून आले. पुढे अशोक रानडे यानी दूरदर्शनवर उत्पाताची मुलाखत प्रात्यक्षिकासह घेऊन त्याचा परिचय घडवून दिला. असे काही काळाने प्रसिद्धीच्या प्रकाशात आलेले उत्पात पुण्यात प्रथमच जाहीर कार्यक्रमासाठी आले. ते आले आणि त्यानी श्रोत्याची मने पहिल्याच भेटीत जिंकली असे म्हटले तर अतिशयोक्त होणार नाही. लावणी प्राधान्याने पेशवाईच्या काळात आणि पुण्याच्या परिसरात जन्माला आली. त्या व्यतिरिक्तही ती होती; पण ते प्रमाण पुण्यात अधिक होते जनसामान्य आणि दरबारी अशा दोघानाही या लावणीने सुखावले, नादावले आणि वेडावले असेही म्हणता येईल उत्पातांनी अशाच नादावणाऱ्या, सुखावणाऱ्या लावण्या म्हटल्या. विशेषत: शृगाराच्या. कधी शृंगारासाठी आसक्त झालेली, कधी पतीची, प्रियकराची वाट पाहणारी.पण तो न आल्याने किंवा उशिरा आल्याने व्यथित झालेली अशी शृगाराची विविध रूपे उत्पातानी आपल्या गायनातून व्यक्त केली. त्यातल्या काही लावण्याची तोंडे वानगीदाखल पाहण्यासारखी आहेत. 'शहर पुण्यामध्ये उभी ग सुदरा', 'गोड मजशि बोला', 'सत्यवचन तू मान', 'चद्रकोरी परि मुखाकडे पाहते' इत्यादी. लावणीत

शृंगार तर हवाच आणि तो विपुल प्रमाणात आहेच; पण त्याच बरोबरीने भक्ती, अध्यात्म हेही तितक्याच प्रमाणात होतेच. लावणीत द्वयर्थी शब्दरचना अथवा त्यातला एक अर्थ चावटपणाकडे झुकणारा, अनेक श्रोत्यांना आतून हवाहवासा वाटणारा असा शब्दही असतोच. उत्पातांनी अशाही काही रचना म्हटल्या. त्यातली दोन उदाहरणे पाहण्यासारखी आहेत.

'पति ग दिसण्यात दिसे फाकडा
अंगावर रेशीम धोतरजोडा
शिरी ग मदिल मोत्यांचा तुरा
सर्व खुणानी (गुणांनी) बरा
परंतु ..... ................ '

ह्या 'परंतु' वर उत्पातांनी निरनिराळ्या हरकती, मुरकती घेऊन श्रोत्यांची उत्सुकता इतकी ताणली की आता हे पुढील ओळ कोणती म्हणणार यासाठी सार्‍यानी श्वास रोखले आणि अशा ताणलेल्या अवस्थेत पुढे ते म्हणाले–

'त्याला 'हे' नाही ग......'हे' नाही ग !' सर्वांचे श्वास मोकळे झाले आणि सारे प्रेक्षागार हास्याच्या कल्लोळात बुडून गेले. आता दर्शनी ही लावणी चावट, अश्लील वाटणारी आहे; पण तितकीच ती भेदिक आहे, अध्यात्म सांगणारी, अलौकिक सागणारी पण आहे. ज्याला जसा अर्थ भावेल तसा घ्यायचा. तशीच परशुरामाची प्रसिद्ध रचनाही त्यानी गाऊन लोकांना अर्थबोध आणि शोध घ्यायला लावला. त्या लावणीचे शब्द होते–

'दहा शिदळक्या करीन, पण एक लग्नाचा नवरा नको !' लग्न रूपकातून अनेक शाहिरानी अध्यात्म विचार व्यक्त केला आहे. त्यापैकी ही एक महत्त्वाची रचना.

अनंतफदीचा फटका गाऊन तर उत्पातांनी सर्व श्रोते आपल्याबरोबर आनंदात–हास्यात तरंगत ठेवले. ते रचना गात होते– 'मुंबई–पुण्याची बढाई सागता, परी पंढरपूरची सर येईना' आता हे ऐकताना तेव्हाचे पंढरपूर आणि मुंबई–पुणे डोळ्यासमोर आणायचे अशी पुस्तीही निवेदकाने जोडल्याने आणखीच एक परिमाण लावणीला आले.

या लावणी गायनाच्या कार्यक्रमात अनेक उत्पात मंडळी होती. सर्वांची नावे आठवणे अवघडच आहे. त्यातले मुख्य गायक होते ज्ञानोबा उत्पात. त्यांचा आवाज गोड, मुलायम आहे, त्या आवाजाला फिरत आहे. लावणीला ज्या प्रकारचा नखरा लागतो तो आहे. शब्द घोळवून घोळवून श्रोत्याला आंदोळत ठेवून योग्य वेळी समेवर येऊन दाद घेण्याची कला आहे. अर्थात संपूर्ण लावणी गायन हे त्यांनी शास्त्रीय गायनावर आधारीत ठेवलेले आहे. विशेषतः ठुमरी गायनाच्या अंगाने सारी पेशकारी आहे. त्यांची ही लावणी बैठकीची असल्याने ठुमरी पद्धतीने गाणे त्यांना अधिक सोयीचे आणि सवयीचे झाले आहे; पण त्याचबरोबर जाणवले असे की, या लावणी गायनाला भजनी अंगाचाही बाज आहे. तो अशा अर्थाने, की, ज्ञानोबा उत्पातांनी लावणीचा मुखडा म्हटला किंवा पुढचा भाग म्हटला की, त्याच्या साथीला जे चार–पाचजण होते ते त्या पंक्तीतला काही भाग वरच्या पट्टीत पुन्हा एकदा म्हणायचे. जसे पारंपारिक भजनात असते त्या पद्धतीने ते म्हणणे चालले होते. साथीला टाळ, तंबोरा, पेटी, तबला आणि ढोलकी होती. पण ढोलकीचा वापर पूर्वार्धात कमी झाला. वास्तविक लावणीला ढोलकी ही अधिक जवळची आणि खुलवणारी. मध्यंतरानंतर ढोलकीचा वापर थोडा वाढला त्याचक्षणी श्रोत्यामधून उत्स्फूर्त दाद आली.

एका पुरुषाने तीन–चार तास आपल्या लावणी गायनाने मंत्रमुग्ध करणे हा अनुभव शब्दात सांगण्यापेक्षा साक्षात स्वतः घेण्याजोगा आहे. या कार्यक्रमाला शिलेदार कुटुंबीय, छोटा गंधर्व आणि जुनेजाणते पंच्याऐंशीच्या घरात असलेले बापूसाहेब जितीकर आदी मान्यवर मंडळी होती. ही सारी मंडळी ज्या पद्धतीने रंगून दाद देत होती ते पाहण्यासारखे होते. ही दाद जशी उत्पात मंडळीना होती तशीच ज्या शंकरअण्णा मंगळवेढेकरांकडून त्यांनी गायकी घेतली त्यांच्या गायकीलाही होती !

ही उत्पात मंडळी प्रत्येक वर्षी होळी पौर्णिमा ते रंगपंचमी या काळात दररोज रात्रभर असख्य लावण्यांचे भांडार सर्वांसाठी खुले करतात. यंदा हा सोहळा ६ ते ११ मार्चला पंढरपुरात उत्पाताच्या घरी होणार आहे तो सोहळा डोळा भरून पाहण्यासारखा असणार. कानामनात साठवून ठेवणारा असणार यात शंकाच नाही. ज्यानी आजवर फडातली, बोर्डावरची लावणी ऐकली, पाहिली असेल त्यांनी या अगदी वेगळ्या प्रकारच्या बैठकीच्या पुरुषी मुखातून येणाऱ्या लावणीचा आस्वाद घ्यायला काहीच हरकत नाही. असा हा आगळा कार्यक्रमाचा वानोळा बालमोहन नाटकमंडळीच्या काही कलाकारांनी मिळवून दिला ☐


## राजहंसचे नवे प्रकाशन

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले

वीस रुपये

बाईचं सुख ? तिला दुःख आहेच कुठे ?
हा युक्तिवाद एकीकडे आणि
आपल्या सांस्कृतिक, सामाजिक संदर्भात
बाईला सुख मिळणं शक्य नाही
ही भूमिका दुसरीकडे
खरं तर या दोन टोकांमध्येच
स्त्रीजीवनाच्या अमर्याद शक्यता,
सामर्थ्य आणि मर्यादा असण्याची
शक्यता आहे. त्या शोधण्याचा
एक प्रयत्न !

मराठी चित्रपट

# ठकास महाठक

लहानपणी नेहमी एका राजपुत्राची गोष्ट सांगितली जायची—राजपुत्र ठकसेन. हा ठकसेन राजघराण्यातला; पण श्रीमतींचं वेड, गर्व नसलेला. उलट त्याला गरीबांविषयी, अडल्यानडल्याविषयी अपार कळवला. त्यासाठी मग तो आपल्यासारखेच चार मित्र हाताशी धरतो. हा कंपू आपलं धोरण निश्चित करतो की, गावातल्या श्रीमताना लुटायचं आणि तो पैसा गोरगरीबाच्या उद्धारासाठी वापरायचा. राजवाडा सोडून बाहेर पडलेला ठकसेन गावातल्या लोकांच्यात मिसळायला लागतो. त्यांचे प्रश्न सोडवतो. समाजविघातक प्रथांविरुद्ध लोकांना जागृत करतो. नंतर या गोष्टीवरचं नाटक बघायला मिळालं तेव्हा कोण आनद झाला होता. 'राजपुत्र ठकसेन' म्हणजे अगदी 'हीरो' वाटायला लागला होता. त्यानंतर किती तरी दिवस 'राजपुत्र ठकसेन' च्या गोष्टीशिवाय इतर कुठलीच गोष्ट ओठांवर यायला तयार नसायची. हळूहळू विस्मरणात गेलेल्या या ठकसेनाची पुन्हा एकदा आठवण आली ती यशवंत विलास चित्रचा 'ठकास महाठक' हा चित्रपट बघताना.

कै. नाथमाधव याच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानं या चित्रपटासाठी कै. नाथमाधव यांच्या 'सोनेरी टोळी' या कादंबरीची निवड करण्यात आली आहे. निव्वळ तमाशाच्या अंगानं जाणाऱ्या कथा न निवडता मराठीतील समृद्ध साहित्यावर आधारीत चित्रपट निर्माण करण्याचे प्रयत्न अलीकडच्या काळात थोड्याफार प्रमाणावर होत आहेत. या प्रयत्नास मोठ्या प्रमाणावर हातभार लागला. या साहित्यसमृद्धीचा चांगल्या प्रकारे उपयोग करून घेतला तर 'लाखाची गोष्ट', 'कुंकू', 'सुवासिनी', 'साधी माणसं' या चित्रपटाचा काळ पुन्हा येणं अवघड जाणार नाही *आणि एका ठराविक साच्याच्या* मराठी चित्रपटांमुळे मराठी चित्रपटापासून दुरावत चाललेला प्रेक्षकवर्गही पुन्हा वळवणं शक्य होऊ शकेल. अर्थात आजच्या काळात ही वाट अवघड आहे, ही गोष्ट खरी असली तरी निदान कुठे तरी सुरुवात होते आहे, कुणी तरी या बाबतीत पुढाकार घेतो आहे- ही गोष्टही पुष्कळ अपेक्षादायी आहे.

कै. नाथमाधव यांनी 'सोनेरी टोळी' त वर्णन केलेल्या वातावरण आणि परिस्थितीशी आजचा काळ जुळत नसला तरी प्रश्न मात्र तेच आहेत. बेरोजगारीचा प्रश्न, बलात्कारीत स्त्रीच्या आयुष्याचा प्रश्न, भेसळीचा प्रश्न, वरच्या थरांकडून होणाऱ्या गरीबांच्या गळचेपीचा प्रश्न, गलिच्छ राजकारणाचा प्रश्न... हे सारे प्रश्न तितकेच किंबहुना जास्तच तीव्र आहेत. राया आणि त्याचे चार पदवीधर बेकार मित्र बेरोजगार तरुणाचे प्रतिनिधी. नोकरीच्या दृष्टीनं त्याच्या पदव्या कुचकामी ठरल्या आहेत. तरीही मनावर झालेले संस्कार त्याना वेडंवाकडं वागू देत नाहीत; पण जेव्हा खानावळवाला उधारी नाकारतो, घरमालक भाड्यासाठी तगादा लावतो, तेव्हा मात्र ही मडळी पैसे मिळवण्यासाठी ठकसेनी मार्ग स्वीकारतात. *यातला माफक पैसा स्वत:*-साठी वापरून बाकी गरीबाना द्यायचा हा त्याचा खाक्या. ते प्रसंगी बालब्रह्मचारीच्या रूपात फसवणुकीच्या मार्गानं पैसे मिळवतात तर कधी श्रीमंतांची मानसिक पोटदुखी युक्तीनं दूर करून पैसे मिळवतात. श्रीमत लोकांच्या पैशावर उड्या मारणाऱ्या तमासगिर बाईला लुटून तिला आयुष्याचा धडा शिकवतात. एकमेकाशी हातमिळवणी करून गावाला लुबाडणाऱ्या सरपंच, डॉक्टरची सगळी लफडी कुलंगडी बाहेर काढतात. *लग्नाआधी लिहिलेल्या पत्रांचा उपयोग करून* एका ससारी मुलीला ब्लॅकमेल करू पाहणाऱ्या गुंडाचा बदोबस्त करतात. एकूण काय कुठं काही गडबड आहे, याचा सुगावा लागला की, या टोळीनं तिथं हजर होऊन त्या प्रकरणाचा फडशा पाडला की, पुढच्या प्रकरणाचा समाचार घेण्यास टोळी पुन्हा तयार आहेच.

अर्थात या कामगिऱ्या पार पाडताना वेशातर ही अपरिहार्य गोष्ट. तेव्हा राया प्रोफेसर रॉय, इन्स्पेक्टर रायकर, श्रीमंत भाऊसाहेब जहागिरदार होतो. गोपी बालब्रह्मचाऱ्यापासून *गोपिका, शांता अशी मजल* मारतो. इतर तिघंही मवाली, टांगेवाला गायक, पोलीस हवालदार असे वेश बदलत राहतात. त्यामुळे झाल एक की, चित्रपटात पात्रं भरपूर असूनही नायक मंडळींना व्यवस्थित वाव मिळतो. नाहीतर बहुतेक वेळा पात्राची फटावळ वाढली की, नायक-नायिकाच उपेक्षित राहतात; पण या चित्रपटात पात्राची भाऊगर्दी असली तरी इतर पात्राच्या व्यक्तिरेखा नेमक्या आहेत. *त्या अकारण लांबलेल्या* नाहीत आणि म्हणून चित्रपटाचा जास्त वेळ खात नाहीत. अशोक सराफ आणि मोहन गोखले मुख्य भूमिकात दिसतात. अशोक सराफ हे सध्या मराठी चित्रपटसृष्टीतलं चलनी नाणं असल तरी त्याच्या गुणांचा—विनोदी गुणाचा—पुरेपूर उपयोग व्हावा असे 'एक डाव भुताचा' सारखे चित्रपट अपवादानच त्याच्याकडे आले. 'ठकास महाठक'च्या निमित्तानं पुन्हा ही संधी त्याला मिळालीय आणि विनोदी बाजाच्या भूमिका करण्यातला हातखंडा *त्यानं चांगलाच सिद्ध* केलाय. प्रोफेसर रॉय, इन्स्पेक्टर रायकर, भाऊसाहेब जहागिरदार, बाळासाहेब इनामदार ही सारी रूपं उभी करताना वेगळेपण राखण्याची काळजी त्यान घेतली आहे. मोहन गोखलेलाही आतापर्यंत बहुतांशी सामान्य भूमिकाच मिळत गेल्या होत्या. यात मिळालेली 'गोपी' ची भूमिका मात्र वेगळी आणि आव्हानात्मक. या भूमिकेत त्याला बराच काळ स्त्रीवेशातच रहावं लागतं. कारण गोपीला स्त्रीवेश दिल्यानच राय क्लबची बरीचशी *कामं सुरळितपण पार पडतात.* गोपी आणि गोपिका अशा दुहेरी भूमिकेत मोहन गोखलेनं धमाल केलीय. त्याची ही भूमिका पूर्वीच्या काळच्या स्त्रीपार्टी पुरुष कलाकाराची आठवण करून जाते. चित्रपटात एखाद्या पुरुषाला स्त्रीवेश दिल्यानंतर आचरट चाळे, हावभाव याचं जे ओंगळ प्रदर्शन केलं जातं, त्यामुळ या प्रकारच्या भूमिकाविषयी एक प्रकारची तिडीक निर्माण होते. त्या मानानं या भूमिकेतल सोफिस्टिकेशन उल्लेखनीय. तसच बारीक अगकाठी आणि पुरुषांच्या तुलनेत चेहऱ्याची नाजूक ठेवण यामुळंही मोहन गोखलेची ही भूमिका सुसह्य होते. या चित्रपटात नायिकेला खरं म्हणजे वावच नाही. कारण खऱ्या अर्थानं हा नायकप्रधान चित्रपट. त्यामुळं शलाकाचं नायिका म्हणून चित्रपटात असण, कथेच्या दृष्टीनं

फारसं महत्त्वाचं नाही; पण चालू काळाच्या गरजेनुसार ही नायिका अपरिहार्य ठरली असावी. शलाकाचा कृत्रिम अभिनय चित्रपटाच्या सहजतेला बाधा आणतो. माया जाधव तिची नृत्यप्रधान भूमिका नीट पार पाडत असली तरी सर्वस्व लुटलं गेल्यानंतरचा तिचा अभिनय पाहून हसावं का रडावं ते कळत नाही. बाकी निळू फुले, आत्माराम भेंडे, मनोरमा वागळे, मंदाकिनी भडभडे, सुहास भालेकर, मंजू मालुगडे, राजशेखर वगैरे मंडळी छोट्या छोट्या भूमिकात आहेत.

'आजचे गुन्हे आणि मारामारी यावर आधारीत चित्रपटनिर्मिती तरुणांमधील गुन्हेगारी प्रवृत्तीला कारणीभूत होत आहे. अशा वेळी 'करमणूक' हा कलेचा मूलभूत उद्देश न डावलता आजच्या तरुणांतील गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालून त्या प्रवृत्तीला एक समाजोपयोगी वेगळे वळण देता येईल का – हे पाहण्यासाठी 'ठकास महाठक' या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. त्यांच्या गुन्हेगारी प्रवृत्तींना विघातक स्वरूप न देता विधायक स्वरूप देण्याचा प्रयत्न आहे' अशी भाबडी भूमिका या चित्रपटाच्या निर्मितीमागं आहे. साहजिकच हा भाबडेपणा पुढं चित्रपटात पेरला गेला तर नवल नाही. निखळ भाबडेपणा असता तर प्रश्न नाही. ती चित्रपटाची एक वेगळीच जात आहे; पण बालिश भाबडेपणा मात्र चित्रपटाचा एकुणच परिणाम उणावण्यास मदत करतो आणि तो दोष याही चित्रपटात आढळतो. आज प्रश्न बदलले नसले तरी प्रश्नांचं स्वरूप बदललंय. या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललाय. तसंच त्या काळच्या तरुणांत आणि आजच्या तरुणांत जमीन अस्मानाचा बदल झालाय. या बदलत्या तरुणांचे पडसाद चित्रपटात पडायला हवे होते. चित्रपट अधिक चटपटीत झाला असता. रायाचं चार मित्रांना जमवून 'राय क्लब' स्थापन करणं, त्यांचं एकेक मोहीम हाती घेत काम करणं, या साऱ्या प्रकारात आजच्या तरुणपिढीच्या तुलनेत एक प्रकारची बालिश झाक वाटते. मोठ्यांसाठी असलेल्या चित्रपटाला ती नक्कीच मारक ठरते. एवीतेवी चित्रपट विनोदीच होता तेव्हा या व्यक्तिरेखांच्या लवचिकतेचा फायदा घेऊन हा दोष कमी करता येणं सहज शक्य होतं. राजा बारगीर यांच्या दिग्दर्शनात विशेष चमक आढळून येत नसली तरी प्रेक्षकवर्ग सतत हसत राहील एवढी काळजी मात्र त्यांनी घेतली आहे.

चित्रपटात सलगतेच्या बाबतीत झालेला घोळ आक्षेपार्ह. बालब्रह्मचारी मठाच्या बाहेर केशरी टी शर्टमध्ये उभा असलेला राय आत येताना पांढऱ्या शर्टमध्ये दिसणं, पापडगावच्या मोहिमेत अदृश्य असणारा गोपी ही मंडळी गावच्या वेशीवर येतात तेव्हा त्यांच्याबरोबर असणं, वगैरे. तसंच श्रेयनामावलीतील ऱ्हस्व दीर्घांच्या चुकाही लक्षात येण्याजोग्या. वेळीच लक्ष दिलं असतं तर या गोष्टी टाळता आल्या असत्या. ☼

---

हिंदी चित्रपट

## 'बालिका वधू'ची कॉपी–अबोध

एखाद्या चित्रपटात, नाटकात किंवा साहित्यकृतीत जुनाच किंवा एकदा हाताळलेला विषय पुन्हा नव्यानं हाताळला जातो, तेव्हा त्यामागं दोन–तीन कारणं संभवतात. एक म्हणजे मूळ कल्पनेच्या प्रस्तुतीकरणाच्या पहिल्या प्रयोगात कदाचित अनेक त्रुटी राहून जातात. ज्यांची जाणीव अर्थातच नंतर होते. त्यामुळं एखादी कल्पना जशी मनात होती, तशी प्रत्यक्षात उतरली नाही, याची एक खंत कलात्मक मनाला सतावत राहते. किंवा जसं जसं अनुभवक्षेत्र विस्तारीत होत जातं, तसा मूळ कल्पनेत असलेल्या पण यापूर्वी लक्षात न आलेल्या गोष्टींची नवी ओळख होते आणि त्या अंगानं प्रवास करावासा वाटायला लागतो. साहजिकच मूळ कल्पना नव्यानं हाताळली जाते– किंवा मूळ कल्पनेत परिस्थितीनुरूप होत गेलेले बदल घालून ती नव्या काळाशी, बदलत्या परिस्थितीशी सुसंगत करून पुन: प्रत्ययाचा आनंद मिळवण्याचा हेतू असतो. अथवा मूळ कल्पनेला मिळालेला प्रतिसाद पाहून बऱ्याच काळानंतर तीच कल्पना हाताळण्यामागे व्यावसायिक दृष्टिकोन असण्याची शक्यता असते. राजश्री प्रॉडक्शनसचा 'अबोध' हा नवा चित्रपटही 'बालिका वधू' या राजश्री प्रॉडक्शन्सच्या चित्रपटाची कल्पना घेऊन निर्माण केलेला चित्रपट.

पूर्वी प्रचलीत असलेली बालविवाहाची पद्धत आणि त्यामुळं विवाह, पती या संकल्पनेविषयी असणारी अनभिज्ञता हा विषय पहिल्यांदा हाताळला गेला तो बंगाली चित्रपटसृष्टीत. 'बालिकाबोधू' या नावानं आलेल्या चित्रपटात अल्लड नायिकेची भूमिका करणाऱ्या मौसमी चतर्जीला चित्रपटसृष्टीची दारं खुली करून दिली ती 'बालिकाबोधू'नंच ! याच बंगाली चित्रपटाचं हिंदी रूपांतर आलं 'बालिका वधू' या नावानं. आणि निर्माते होते राजश्री प्रॉडक्शन्स. त्याच राजश्री प्रॉडक्शन्सनं आता 'अबोध' ची निर्मिती केली आहे. 'बालिका वधू'त कल्पना जशीच्या तशी उतरली नाही म्हणून 'अबोध'-




ची निर्मिती करण्यात आली असावी असं समजावं तर चित्रपटात तसं जाणवत नाही. कारण तसा हेतू असता तर 'अबोध' 'बालिका वधू' पेक्षा वेगळा जाणवायला हवा होता; पण विषय जसाच्या तसा घेतलाय, तसं प्रस्तुतीकरणही त्याच कोनातून केलंय. कित्येक प्रसंगही तेच आणि त्याच पद्धतीचे आहेत. त्यामुळं 'अबोध' वर 'बालिका वधू' ची दाट सावली पडलेली आहे. 'बालिकावधू' च्या वेळेस ही कल्पना नवीन होती. त्यामुळं विषय आजच्या काळाच्या चौकटीत बसणारा नसला तरी वेगळा होता, नवीन होता, प्रेमाच्या त्रिकोण–चौकोनाच्या चाकोरीबाहेरचा होता आणि म्हणूनच प्रेक्षकांना भावला होता. बालविवाहाच्या प्रथेतले दोष या ना त्या कारणानं प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर होतेच. त्यातलाच एक दोष किंवा बालविवाहाकडे निराळ्या दृष्टीनं पाहण्याचा हा एक प्रयत्न होता. 'उपहार' हा जया भादुरीची भूमिका असलेला चित्रपटही या विषयाच्या जवळपास पोचणारा; पण या चित्रपटाला दिलेल्या वेगळ्या ट्रीटमेंटमुळे चित्रपटही वेगळा वाटला. या पार्श्वभूमीवर 'अबोध' आणि 'बालिकावधू' तलं साम्य खटकल्यावाचून राहात नाही. आतापर्यंत राजश्रीच्या चित्रपटांचा घाट, चित्रपटाचा होणारा प्रवास, विषयाची हाताळणी यांची एक विशिष्ट दिशा ठरून गेली आहे आणि 'सारांश' सारख्या चित्रपटाचा अपवाद वगळता राजश्रीचे बहुतेक चित्रपट याच दिशेनं जाणं पसंत करतात. त्यामुळं विषय बदलते असूनही चित्रपटांमध्ये तोचतोचपणा जाणवत राहतो. हा दोष 'अबोध' मध्ये आहेच.

बालविवाहाच्या प्रथेचंच आता उच्चाटन झाल्यानं 'बालिका वधू' च्या विषयात फेरफार करून हा विषय नव्यानं पेश करावा अशा संधी चित्रपटाच्या विषयातच नाही. तेव्हा हा हेतू तर बादच झाला. 'बालिकावधू' चं यश ध्यानी घेऊन व्यावसायिक दृष्टिकोनातून 'अबोध' ची निर्मिती केली असावी असं म्हणावं तर प्रेक्षकवर्ग मिळवण्यासाठी किंवा पैसे वसूल होण्यासाठी अशा प्रकारची गणितं मांडण्याची राजश्री प्रॉडक्शन्ससारख्या बुजूर्ग चित्रपटसंस्थेला काहीच गरज नाही. कारण राजश्रीचे कौटुंबिक चित्रपट अगदी सुपर हीट, मेगॅ हीट अशी एकेक कुंपणं पार करून गेले नसले तरी एक ठराविक प्रेक्षकवर्ग मात्र त्यांनी कायम बांधून ठेवलेला आहे. तेव्हा या चित्रपटाच्या निर्मितीमागच्या हेतूविषयी आपण मात्र 'अबोध' राहतो.

'बालिकावधू' आणि 'अबोध' या दोन चित्रपटांच्या केवळ विषयातच साम्य आहे असं नाही, तर विषयाची हाताळणी, वातावरण, काही प्रसंग यातही साम्य आहे. तेव्हा दोन चित्रपटातली तुलना ही अपरिहार्य आहे आणि या तुलनेत 'अबोध' कमी पडतो. याला महत्त्वाचं कारण म्हणजे नायिका. हा चित्रपट नायिकाप्रधान आहे. 'बालिकावधू' ची नायिका आहे रजनी शर्मा तर 'अबोध' ची नायिका आहे माधुरी दीक्षित. दोघीही नायिका म्हणून पहिल्यांदाच चित्रपटसृष्टीत प्रवेश करणाऱ्या. 'बालिकावधू' त काम केलं तेव्हा जेमतेम अकरा–बारा वर्षांची असणारी रजनी शर्मा या चित्रपटाची नायिका म्हणून एकदम शोभली. हा नायिकेजवळ देखणेपणा नव्हता; पण वयाचा, त्या वयातील बालिश वागणुकीचा, लहानखुऱ्या चणीचा मात्र तिला खूपच फायदा मिळाला. देखणेपणाच्याबाबतीत विचार करायचा झाला तर माधुरी दीक्षित ही 'अबोध' ची नायिका रजनी शर्मापेक्षा किती तरी सरस आहे. सोज्वळ सौंदर्य लाभलेली ही नायिका दिसतही छान आणि कामही समजसपणे, मोकळेपणानं करते; पण 'अबोध' नायिका जशी हवी तशी मात्र ती वाटत नाही. ती निरागस वाटते; पण अबोध वाटत नाही. तशी ती वयानं फार मोठी नाही, पण या भूमिकेच्या अपेक्षेच्या तुलनेत मात्र मोठी वाटते. नायकांच्या भूमिका 'बालिका वधू' त सचिननं आणि 'अबोध' मध्ये तापस पालनं केल्या आहेत. सहज अभिनय हे सचिनचं वैशिष्ट्य. त्याचं सुंदर प्रदर्शन त्यानं 'बालिका वधू' त दिलंच; पण तापस पाल मात्र अभिनयात खूपच कमी पडतो. राजश्रीच्या चित्रपटातील नायक–नायिकांची पुढच्या करियरमध्ये मात्र परवड होते. तेव्हा या नवोदित नायक–नायिकेचं काय होतं बघायचं.

–शुभदा रानडे

विज्ञान

# गणित म्हणजे काय ?

'भूगोल म्हणजे काय ?' किंवा 'रसायनशास्त्र म्हणजे काय ?' असे प्रश्न ते ते विषय शिकताना सुरुवातीला चर्चिले जातात. 'अर्थशास्त्र : व्याप्ती व मर्यादा' अशा प्रकारचे प्रकरणच अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र असल्या विषयांच्या अभ्यासात अंतर्भूत केलेले असते; पण गणित म्हणजे काय ? याचा मात्र आपण कधीच विचार करीत नाही. याचे एक कारण असे असावे की तसा प्रश्न विचारण्याची गरजच वाटत नसावी. गणित आपल्या फार परिचयाचे आहे. कोणत्याही प्रकारच्या शाळेत जायला लागण्याआधीच आपण गणित शिकायला सुरुवात करतो असे म्हणता येईल. पाटी–पेन्सिल आणली की, सर्वात आधी मुलाला एक–दोन असे अंक शिकवले जातात. तीच गणिताची सुरुवात. बालवाडीत किंवा प्राथमिक शाळेत राहो पण पुढे माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शिक्षण संपेपर्यंत कोठेच 'गणित म्हणजे काय ?' या गोष्टीचा कोठेच विचार होत नाही. अगदी 'गणित' विषयातच 'ऑनर्स' सह पदवी मिळेपर्यंतही बहुतेक विद्यापीठातून गणिताच्या स्वरूपाविषयी विचार करावा लागत नाही. याला अपवाद शिवाजी विद्यापीठाचा. त्या विद्यापीठाच्या ऑनर्स पदवीला एक प्रश्नपत्रिका 'गणिताचा इतिहास, संस्कृती, रोमांचकता आणि संदर्भ' या नावाची आहे. तीत 'गणिताची व्याख्या' असा विषय आहे,

'गणित म्हणजे काय ?' हे सांगणे खूप अवघड आहे हेही त्या प्रश्नाचा विचार टाळण्याचे एक कारण असावे. गेल्या अडीच–तीन हजार वर्षांतील लोकांची गणिताबद्दलची कल्पना–अपेक्षा सारखीच नाही. दुसरे असे की, गणिताचे ज्ञान व विस्तार विलक्षण वेगाने वाढतो आहे. अलिकडेच पुण्याला झालेल्या गणित शिक्षकांच्या परिषदेत विख्यात वैज्ञानिक डॉ. जयंत नारळीकर यांनी सांगितले की, गणिताचे ज्ञान दर १० वर्षांनी

दुप्पट होत असते. १९७०-८० या दशकात झालेली वाढ त्याआधीच्या तीन हजार वर्षांत झालेल्या गणिताएवढी आहे. सध्या गणिताच्या दोन हजारापेक्षा जास्त शाखोपशाखा आहेत एवढ्या प्रचंड व सतत वाढणाऱ्या विषयाची सर्वंकष व्याख्या ४/८ ओळीत करणे हे खूपच कठीण काम आहे. तरी भिन्नभिन्न युगात गणितज्ञानी आपल्या विषयाच्या भिन्नभिन्न व्याख्या केल्या आहेत. त्या त्या व्याख्येवर त्या त्या युगातील लोकांची गणितविषयक कल्पना व अपेक्षा याची छाप पडलेली दिसते. अर्थात 'देवाला पहाटे पडलेले स्वप्न' म्हणजे गणित अशी एका तत्त्वज्ञाने केलेली व्याख्या सोडली तरी काही गणितज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा विचार करणे गमतीचे व उद्बोधक ठरेल असे वाटते.

## शास्त्र की कला ?

अरिस्टॉलला (इ. स. पू. ३९० ते ३२२) सर्व शास्त्राचा जनक मानले जाते. 'गणित म्हणजे महत्तेचा अभ्यास' अशी ॲरिस्टॉटलची गणिताची व्याख्या आहे. महत्ता म्हणजे Quantity किंवा कमीअधिकपणा. ॲरिस्टॉटलच्या काळात ग्रीसमध्ये शेती हाच प्रमुख व्यवसाय होता गुलामगिरी होती आणि शत्रुसैन्यावर जळते बोळे टाकण्यासाठी तरफाचा (Cataput) उपयोग करीत असत. मोजणे, मापणे व तज्जन्य आकडेमोड हेच ॲरिस्टॉटलच्याकाळी गणिताचे काम होते. सतराव्या शतकापर्यंत परिस्थिती बदलली होती त्या शतकातील गणितज्ञ रेने देकार्त (१५९६ ते १६५०) म्हणतो . गणन आणि क्रमता (Order) याचे शास्त्र म्हणजे गणित. देकार्तने गणितातच नव्हे तर एकदर मानवी विचारातच विलक्षण क्रांती घडवून आणली. एका आरंभ-बिंदूतून जाणारी एक उभी आणि एक आडवी अशा दोन रेषाची संदर्भ चौकट घेऊन बिंदू, रेष , कोन, वर्तुळ, अंतर अशा भौमितिक आकृत्यांचा अभ्यास केवळ सख्यांच्या सहाय्याने करता येतो हे देकार्तने दाखवून दिले भूमितीच्या अशा अभ्यासाला 'निर्देशक भूमिती' किंवा 'कार्तेसीय भूमिती' असे नाव आहे. गणित किंवा भौतिकशास्त्रातच नव्हे तर ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रात या पृथक्करण पद्धतीचा (Analytical Method) जनक देकार्तच आहे भूमिनीतही क्रमता (Order) असते ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट असल्याने देकार्तने केलेल्या गणिताच्या व्याख्येत क्रमतेचा उल्लेख आला आहे.

एकोणिसाव्या शतकातील गणितज्ञाचे विचार कसे होते हे पीयर्स (१८०९ ते १८८०) याने केलेल्या व्याख्येवरून समजून येते. तो म्हणतो, 'अपरिहार्य' निष्कर्ष काढण्याचे शास्त्र म्हणजे गणित, या सुमारास गणित अधिकाधिक मूलगामी होऊ लागले होते व ते तर्कशास्त्राच्या जवळ जाऊ लागले होते. एकंदर गणितात 'जर क तर ख' ($p \longrightarrow q$) अशी विधाने असतात 'क' व 'ख' हीसुद्धा विधानेच आहेत. 'जर क तर ख' याचा अर्थ असा की 'एखाद्या गोष्टीबद्दल क-विधान सत्य असेल तर त्याच गोष्टीबद्दल ख-विधानही सत्य आहे' मात्र क-विधान सत्य आहे किंवा नाही याची गणित पर्वा करीत नाही. तसेच क-विधान ज्या गोष्टीबद्दल आहे ती गोष्ट अस्तित्वात आहे किंवा नाही याचाही गणिताशी संबध नाही. दिलेल्या विधानावरून तर्कशुद्ध विचाराने अपरिहार्य निष्कर्ष काढणे एवढेच गणिताचे काम या काहीशा एकांगी विचाराचा प्रभाव तत्कालीन गणितज्ञावर असल्याने पीयर्सने वरील व्याख्या केलेली दिसते 'गणित म्हणजे स्वयसिद्ध गोष्टीचे शास्त्र' अशी गणिताची आणखी एक व्याख्या क्लाइव्हने (१८४९-१९२९) केली आहे. आपल्याला माहीत आहेच की युक्लिडने भूमितीची सुरुवात स्वयंसिद्ध तत्त्वापासून केली आहे. बिंदू, रेषा, प्रतल व अवकाश या गोष्टी स्वयंसिद्ध आहेत. त्यांची व्याख्या करीत न बसता ती अव्याख्येय पदे म्हणून स्वीकारली आहेत. 'संच', 'घटक' व 'चा घटक असणे' ही अव्याख्येय पदे व काही गृहीतके यांच्यावर बीजगणिताची सारी इमारत उभी राहिलेली आहे. सिद्ध न करता स्वीकारलेले विधान म्हणजे गृहीतक. क=ख आणि ख=ग असेल तर क=ग असते हे आपण सिद्ध करीत नाही पण ते गृहीतक स्वीकारतो. गृहीतके कमीत-कमी असावीत ती स्वतंत्र असावीत आणि एकमेकाशी विसंगत असू नयेत म्हणूनच कोणीसे म्हटले आहे. जेथून गणिताचा आरंभ होतो ती गृहीतकेच (केवळ) सोपी असतात !

२० व्या शतकातील गणित अधिकाधिक क्लिष्ट, मूलगामी व अमूर्त झालेले आहे या गोष्टीचे प्रतिबिंब हिल्बर्ट (१८६२ ते १९४२) व बर्ट्रांड रसेल (१८७२ ते १९७१) यानी केलेल्या व्याख्यात पडलेले दिसते. हिल्बर्टच्या म्हणण्यानुसार 'गणित हा एक अर्थशून्य औपचारिक खेळ आहे' हिल्बर्टने गणिताची तुलना बुद्धिबळाच्या खेळाशी केली आहे. या खेळात राजा, वजीर, उंट,...अशी मोहरी असतात, प्यादी असतात. त्यांच्या खेळीचे ठराविक नियम असतात. त्या नियमांप्रमाणे खेळाडू खेळतात. या खेळण्यातून मिळणाऱ्या आनंदाखेरीज त्याला काही अर्थ आहे का? बुद्धिबळ खरे आहे का?' हा प्रश्न निश्चितच अप्रस्तूत आहे. 'बुद्धिबळ नियमांप्रमाणे खेळले गेले ना?' हाच प्रश्न योग्य ठरेल. गणितज्ञ कागदावर काही चिन्हे (सफेत) मांडतो त्यांना राजा, हत्ती, घोडा अशासारखीच पण वेगळी नावे असतात. ती कशी हलवायची याचे निश्चित, सुसंगत नियम असतात. 'गणित या नियमांप्रमाणे झाले ना?' हाच एक अर्थपूर्ण प्रश्न संभवतो. 'गणित सत्य आहे का' हा प्रश्न अप्रस्तुत आहे.

हजारो वर्षे मनुष्य सख्या वापरीत आहे पण 'सख्या' ची पहिली व्याख्या रसेलने १९०१ मध्ये केली. रसेल व व्हाइटहेड या दोघानी आपल्या 'प्रिन्सिपिया मॅथेमॅटिका' या ग्रंथात सर्व गणिताला तर्कशुद्ध भक्कम पायावर उभारण्याचे काम केले. बर्ट्रांड रसेलची गणिताची व्याख्या विलक्षण आहे. तो म्हणतो, 'गणित हा असा विषय ज्यात आपण काय बोलतो हे आपल्याला कधीच कळत नाही तसेच जे बोलतो ते खरे आहे की नाही हेही कधी कळत नाही' आश्चर्याची गोष्ट अशी की रसेलने केलेली ही व्याख्या जास्तीत जास्त गणितज्ञाना मान्य असून तिचा वारवार उल्लेख केला जातो. गणिताचे आत्यंतिक अमूर्त स्वरूप या व्याख्येवरून स्पष्ट होते. तसेच गणितज्ञ, शास्त्रज्ञ तत्त्वज्ञ किंवा सामान्य माणूस गणिताचा स्वतंत्र अर्थ लावायला मोकळे राहातात सख्या, मोजमापे, महत्त्वा ही केवळ साधने आहेत, ते म्हणजे गणित नव्हे ही गोष्टही रसेलच्या व्याख्येने अधोरेखित होते

एवढे झाल्यावर एक गोष्ट सागितलीच पाहिजे. गणित विषयाला शास्त्र मानण्याची पद्धत आहे. एखाद्या मुलाचे गणित चागले आहे असे शाळेत दिसून आले तर त्याला पुढे 'सायन्स'ला जाण्याचा सल्ला दिला जातो. गणिताचा प्रगत अभ्यास मुख्यत सायन्स शाखेतच होत असतो; परतु बहुतेक मोठ्या गणितज्ञाचे असे मत आहे की गणित हे शास्त्र नसून ती कला आहे आणि सौंदर्यनिर्मिती हेच गणिताचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे.

— भा. रा. बापट

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

येत आहे ! राजहंसचे एक ताजे प्रकाशन

कुमार नारायण आणि त्याची देशद्रोही टोळी
सतवंतसिंग आणि त्याचे खुनी सहकारी

माणसं वेगळी, वाटा निराळ्या
पण बेइमानीची जात एकच.

सारा देश हादरून सोडणारी ही दोन कारस्थाने शिजली कशी ?
केव्हा ? त्यांचे सूत्रधार कोण ?
त्यांच्या जबान्या आणि पुरावे काय सांगतात ?
यातून त्यांनी कमावलं काय ?
देशानं गमावलं काय ?

या व अशा अनेक प्रश्नांचा सुन्न करणारा शोध–

# वाट चुकलेली माणसं

# वाट चुकलेली माणसं

दोन सचित्र, समग्र कहाण्या एकत्र.
मराठीत प्रथमच !

लेखक : शिरीष सहस्रबुद्धे        किंमत : ?

प्रसिद्धी मार्चमध्ये : तपशील पुढील अंकी.